


# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्च २०२६

# विद्यावार्ता

ई - मासिक



## अर्थसंकल्प
## २०२६-२०२७

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती



**FINANCIAL ESTIMATES (BUDGET)**

**2026-2027**

SANT GADGE BABA
AMRAVATI UNIVERSITY,
AMRAVATI

विशेषांक

# विद्यावार्ता

ई - मासिक


# अनुक्रमणिका




**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**मार्गदर्शक**

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in



- विद्यापीठाचा पर्यावरण २०२४ व २०२५ पुरस्कार प्रदान १
- विद्यापीठाचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर ३
- राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये अमरावती विद्यापीठ आठ कला प्रकारांमध्ये प्रथम ५
- विद्यापीठाच्या सागर जाधव याला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत रौप्य पदक ६
- राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा डिपेक्स -२०२६ मध्ये विद्यापीठाच्या राम रोडेला प्रथम क्रमांक ७
- राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबीर संपन्न ८
- गोडंबी (बिब्बा) प्रक्रिया उद्योग संशोधन प्रकल्पाची राज्यस्तरावर दखल; प्रा. प्रमोद पंडीत यांचा प्रकल्प टॉप १० मध्ये १५
- विद्यापीठात संत गाडगे बाबांची दशसूत्री व ग्रामविकासावर कार्यशाळेचे उद्‌घाटन १६
- विद्यापीठात शहीद दिनानिमित्त व्याख्यान संपन्न १८
- कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन संपन्न २०
- विद्यापीठात उन्नत भारत अभियान कार्यशाळेचे उद्‌घाटन २२
- विद्यापीठात एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न २४
- रसायनशास्त्र विभागाच्यावतीने तपोवन येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा २६
- विद्यापीठामध्ये महिला दिनानिमित्त महिला स्टार्टअप्सचा सत्कार २७
- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न २८
- विद्यापीठात महिलांकरीता आरोग्य तपासणी शिबीर संपन्न २९
- विद्यापीठात स्वामी विवेकानंदांच्या विचारातून व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे उद्‌घाटन ३१
- बुध्द धम्माचे योगदान विषयावर व्याख्यान संपन्न ३३
- विद्यापीठात रोजगार मेळाव्याचे उत्साहात उद्‌घाटन ३४
- विद्यापीठात संस्थांची भूमिका विषयावर कार्यशाळा संपन्न ३६
- विद्यापीठात रक्तदान शिबीर संपन्न ३८
- विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा हरिव्दार येथे अभ्यास दौरा संपन्न ३९
- विद्यापीठात विद्यार्थी संवाद व गटचर्चा कार्यक्रम संपन्न ४१
- विद्यापीठ -महाविद्यालय शैक्षणिक संवाद कार्यक्रम संपन्न ४२
- चांदुर बाजार येथे ज्योतिराव फुले व्याख्यानमाला संपन्न ४३
- बिलासपूर येथे गाडगे बाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांची प्रदर्शनी ४४
- विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती प्रसंगी सन्मानपूर्वक निरोप ४७
- वुमेन्स स्टडीज सेंटर व्दारा बाबा व्यसनमुक्ती व पूर्नवसन केंद्र येथे क्षेत्रभेट ५०
- क्रीडा विशेष ५१
- जयंती विशेष ५२
- बातमी कात्रणे ५३

# पुरस्काराची सर्वांनी प्रेरणा घ्यावी - प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे

## विद्यापीठाचा पर्यावरण पुरस्कार २०२४ व पर्यावरण पुरस्कार २०२५ प्र-कुलगुरुंच्या हस्ते प्रदान



मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

पर्यावरण रक्षण आज गरजेचे झाले आहे आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने त्यासाठी हा पुरस्कार सुरू केला आहे. पुरस्कारातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने पर्यावरण पुरस्कार २०२४ व पर्यावरण पुरस्कार २०२५ ससन्मान प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर पर्यावरण पुरस्कार २०२५ च्या निवड समितीचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.एम. कडू, पर्यावरण पुरस्कार २०२४ च्या निवड समितीचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उद्यान अधीक्षक श्री भिमराव वाठोरे व प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते.

विद्यापीठाच्यावतीने पर्यावरण पुरस्कार २०२४ करीता यावर्षी संस्था गटात हा पुरस्कार **जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती** या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणाचे प्राचार्य डॉ. विजय हिम्मतराव नागरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. पर्यावरण पुरस्कार २०२५ करीता यावर्षी संस्था गटात हा पुरस्कार **मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिम** या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात अमरावतीचे श्री वसंत माणिकराव पाटील (माजी सैनिक) यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांचे शुभहस्ते संस्था गटात पंधराहजार रुपये रोख, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून, तर व्यक्ती गटात दहा हजार रुपये रोख, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून ससन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी पुरस्कारप्राप्त सत्कारमूर्ती डॉ. विजय नागरे, प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, प्राचार्य डॉ. नंदकिशोर ठाकरे, श्री वसंतराव पाटील यांनी केलेल्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून देतांना पुरस्कारासाठी विद्यापीठाचे आभार मानले.

पर्यावरण पुरस्कार २०२४ निवड समितीचे अध्यक्ष डॉ.व्ही.एम. मेटकर व पर्यावरण पुरस्कार २०२५ च्या निवड समितीचे अध्यक्ष डॉ.आर.एम. कडू यांनी सत्कारमूर्तींनी पर्यावरणासाठी केलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांचे हस्ते कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, वृक्ष पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. रोपटं देवून अतिथींचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे यांनी केले. संचालन प्रशासन अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी, तर आभार उद्यान अधीक्षक श्री भिमराव वाठोरे यांनी मानले. पर्यावरण पुरस्कार वितरण कार्यक्रमाला विविध संस्थेचे सदस्य, विद्यापीठातील विविध प्राधिकारिणींचे सदस्य, अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी तसेच पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



व्यक्तीगटात प्राचार्य डॉ. विजय हिम्मतराव नागरे यांना पुरस्कार –२०२४ प्रदान करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



संस्थागटात  जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाला पुरस्कार–२०२४ प्रदान करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



संस्थागटात  मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालयाला पुरस्कार–२०२५ प्रदान करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



व्यक्तीगटात श्री वसंत माणिकराव पाटील यांना २०२५ चा पुरस्कार प्रदान करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ३९०.१६ कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर अर्थसंकल्पात ७६.०२ कोटीची तुट

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा २०२६–२७ चा ३९०.१६ कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे यांनी हा अर्थसंकल्प अधिसभेमध्ये सादर केला. अर्थसंकल्पात ३१४.१४ कोटी रुपये प्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून ७६.०२ कोटी रुपयाची तुट यामध्ये दर्शविण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृति अधिसभा सभागृहामध्ये अधिसभेची बैठक संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तर सभागृहात सर्व सन्माननीय अधिसभा सदस्य उपस्थित होते.

सन २०२६–२७ चा अर्थसंकल्प एकूण तीन भागात विभागलेला आहे. परिरक्षण, विकास आणि स्वतंत्र प्रकल्प/योजना/सहयोग कार्यक्रम अनुदाने या तीन शीर्षात विभागलेला असून परिरक्षणासाठी २०५.४० कोटी, विकासाकरिता ५४.१० कोटी, स्वतंत्र प्रकल्प/योजनांकरिता १३०.६६ कोटी रुपयाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. विद्यापीठाला केंद्र शासन, राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून अनुदान व विविध शुल्क प्राप्त होत असते. यावर्षी अंदाजित एकूण प्राप्ती ३१४.१४ कोटी रुपये होणार असल्याचा अंदाज अंदाजपत्रकात नमूद करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पात परिरक्षणांतर्गत अर्थसंकल्पीय वर्षामध्ये ७४ कोटी २६ लक्ष ५० हजार एवढ्या अनुदान प्राप्तीचा/ तर ७६ कोटी २८ लक्ष २६ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २०२६–२७ या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये परीक्षा शुल्कापासून ५६ कोटी, ३८ लक्ष इतक्या शुल्कप्राप्तीचा तर परीक्षेसाठी ६० कोटी ७३ लक्ष ५० हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पदव्युत्तर शैक्षणिक विभागास अर्थसंकल्पीय वर्षात ४ कोटी २६ लक्ष २४ हजार एवढ्या शुल्कप्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच खर्चाकरिता ५ कोटी ३९ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे.

ज्ञानस्त्रोत केंद्रासाठी अर्थसंकल्पीय वर्षात पाक्षिके, नियतकालिके तसेच प्रशासकीय खर्चासाठी रुपये १ कोटी १९ लक्ष ४५ हजार एवढी तरतूद करण्यात आली आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ४ कोटी १ लक्ष ४४ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वसामान्य सेवा व प्रशासकीय व्ययासाठी या अर्थसंकल्पीय वर्षात रु. ५४ कोटी ६३ लक्ष ११ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विद्यार्थी परिषद कार्यक्रम व विद्यार्थी विकास निधी अंतर्गत ८६ लक्ष १३ हजार, शिक्षक व कर्मचारी कल्याण निधीकरिता ६६ लक्ष १३ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. आपत्ती नियोजन निधीसाठी रु. १ कोटी ३ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. विद्यार्थी सुरक्षा विमा निधी, दान निधी, संत गाडगे बाबा अध्यासन निधी, युएसआर निधी अंतर्गत रु. १ कोटी ८ लक्ष ५ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे.

विकासासाठी रु. ४१ कोटी ३९ हजार एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

विद्यापीठाने निकाय निधी (कॉर्पस फंड) उभारलेला असून या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये १ कोटी ५१ लक्ष एवढा निधी जमा होईल असा अंदाज आहे. घसारा निधीमध्ये या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये प्रत्येकी रु. १८ कोटी १० लक्ष एवढा निधी जमा होईल असा अंदाज आहे. स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदानांतर्गत या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये रुपये १३० कोटी ४९ लक्ष ७० हजार एवढ्या अनुदान प्राप्तीचा अंदाज असून १३० कोटी ६५ लक्ष ७३ इतक्या खर्चाचा अंदाज आहे.

**अर्थसंकल्पाची वैशिष्टे:**

परीक्षा सुधारणासाठी ११ कोटी रुपये, कुलगुरू फेलोशिप पुरस्कारासाठी रु. ५ लक्ष, इक्वल अपॉर्च्युनिटी सेलकरिता रु. १ कोटी ७१ लक्ष २६ हजार आणि प्रशिक्षण, उद्योजकता विकास, कौशल्य विकास, संशोधन इत्यादींसाठी ८८ लक्ष २५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रातील औषधोपचारांसाठी ७ लाख ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ स्तरावरील संशोधन निधी योजनेसाठी ५० लक्ष रुपये आणि आर.जी.एस.टी.सी. अंतर्गत २७ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे संशोधकांना आर्थिक मदत मिळेल. मागासवर्गीय आणि अल्पसंख्यंक विद्यार्थ्यांसाठी नेट कोचिंग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासाठी प्रत्येकी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शिक्षक आणि कर्मचारी कल्याण निधीसाठी ६६ लाख ५७ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी सुरक्षा विम्यासाठी ६० लाख १ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल करिता १९ लाख ८० हजार रुपये आणि शिक्षक–कर्मचारी प्रशिक्षणासाठी ८६ लक्ष ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संशोधक आणि विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सुविधा, पुस्तके, उपचार, उपकरणे, नियतकालिके व पाक्षिकांसाठी अर्थसंकल्पात २ कोटी १९ लाख ४५ हजार रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. बुलढाणा येथील आदर्श पदवी महाविद्यालयाच्या आवर्ती खर्चासाठी १ कोटी ६३ लाख ३७ हजार रुपये आणि अनावर्ती खर्चासाठी १३ लाख ३० हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे. आपत्कालीन नियोजनांतर्गत विविध कार्यक्रम व शिबिर आयोजनासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाने सामाजिक उपक्रमांसाठी ५ लाख ३ हजार रुपयांची तरतूद केली आहे. विद्यापीठाला पीएम–उषा योजनेअंतर्गत बांधकाम, नूतनीकरण आणि उपकरणे खरेदीसाठी २० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे, त्यापैकी १८ कोटी ४६ लक्ष ३७ हजार एवढ्या अनुदानप्राप्तीचा या अर्थसंकल्पीय वर्षात अंदाज आहे.

अकोला येथे उपकेंद्रासाठी शासनाकडे ६ कोटी ८७ लक्ष ३९ हजार, म्युझियमकरिता १ कोटी ९८ लक्ष ५२ हजार, मेळघाट येथे ट्रायबल स्किल डेव्हलपमेंट सेंटरसाठी २९ कोटी ९२ लक्ष, सिंथेटिक टँक, फुटबॉल आदी मैदानासाठी १५ कोटी १० लक्ष ४१ हजार, सी.एम. उषा योजनेंतर्गत ३० कोटी, सायन्स सेंटर १७ कोटी इतक्या रकमेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेले आहेत.

**अर्थसंकल्प एक दृष्टिक्षेप**

१) अर्थसंकल्पात ३१४ कोटी १४ लक्ष प्राप्ती, तर खर्च ३९० कोटी १६ लक्ष अपेक्षित असून ७६ कोटी २ लक्ष तुट दर्शविली आहे.

२) परीक्षा व परीक्षा सुधारणांकरिता ६० कोटी ७३ लक्ष ५० हजाराची तरतूद.

३) विविध प्रशासकीय विभागांकरिता उपस्कर व उपकरणे, संगणक व तत्सम साहित्यकरिता ११ कोटी ८४ लक्ष ७६ हजार, विविध शैक्षणिक विभागांकरिता ८० लक्ष ची तरतूद

३) विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांकरिता ५ कोटी ३९ हजार ची तरतूद

४) ज्ञानस्त्रोत केंद्र आवर्ती व अनावर्ती खर्चाकरिता २ कोटी ७९ लक्ष ४५ हजाराची तरतूद

५) विद्यार्थी परिषद कार्यक्रम निधी व विद्यार्थी विकास निधीकरिता ८६.१३ लक्षची तरतूद

६) विद्यापीठ परिसरात बांधकाम व नुतणीकरणाकरिता मेजर वर्क्स अंतर्गत १८ कोटी ५५ लक्ष ७१ हजारची तरतूद, तर मायनर वर्क्स अंतर्गत ६ कोटी ३ लक्ष ५१ हजाराची तरतूद

७) उद्याने देखभाल करिता १ कोटी ४२ लक्ष २६ हजार ची तरतूद

८) विद्यापीठ परिसरातील विविध दुरुस्त्या, देखभाल अंतर्गत ६ कोटी १३ लक्षची तरतूद करण्यात आली.

विद्यापीठाचा २०२६–२७ चा अर्थसंकल्प काही दुरुस्त्यांसह सर्वानुमते मान्य करण्यात आला.

# राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये अमरावती विद्यापीठ आठ कला प्रकारांमध्ये प्रथम



रासेयो चमूचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार आदिकवी श्री महर्षी वाल्मिकी युनिव्हर्सिटी, सयचूर (कर्नाटक) येथे नुकतेच राष्ट्रीय एकात्मता शिबीर पार पडले. या राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूने बारा पैकी आठ कला प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. शिबिरामध्ये सहा राज्यांच्या विविध विद्यापीठांतील एकूण १५० स्पर्धक सहभागी झाले होते. अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील १० स्वयंसेवक (५ मुले व ५ मुली) व चमू व्यवस्थापक सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूला १२ कलाप्रकारांपैकी कल्चरल, मोनो ॲक्टींग, सिंगिंग, इन्स्टद्रुमेंट, स्कीट, इंडियन फेस्टिव्हल, इंडियन फोक डान्स, प्रोसेशन या आठ कलाप्रकारामध्ये प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. यामधील सिंगिंग इव्हेंटमध्ये सादर केलेल्या पोवाड्याच्या सादरीकरणावर रूपये अकरा हजारचा रोख पुरस्कार सुध्दा प्राप्त झाला आहे.

चमूमध्ये श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा ऋषिकेश खरडे, भारतीय महाविद्यालय, मोर्शीचा कमलेश तंतरपाळे, सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळचा प्रणय अरुथे, नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिडचा ओम पवार, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावतीचा जय चत्रेश्वर, भारतीय महाविद्यालय, अमरावतीची कु. भक्ती गायकवाड, श्री तुळशीरामजी जाधव कला आणि विज्ञान महाविद्यालय, वाशिमची कु. सागर आठवले, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळची कु. सुहानी राठोड, श्री पुंडलीक महाराज महाविद्यालय, चांदुररेल्वेची कु. राधिका पांडव व शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची कु. साक्षी स्वर्गीय यांचा, तर स्वयंसेवक व चमूव्यवस्थापक म्हणून इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगावचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्वप्निल गोरे यांचा समावेश होता.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या सर्वोच्च यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व चमू व व्यवस्थापक यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

# अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा; सागर जाधव याला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत रौप्य पदक

चंदीगड युनिव्हर्सिटी, मोहाली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो



स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत दिग्रस येथील बी.बी. आट्‌र्स, कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू श्री. सागर जाधव याने ६० किलो वजन गटात रौप्य पदक (Silver Medal) पटकावून विद्यापीठाच्या नावलौकिकात मोलाची भर घातली आहे. सागरच्या या यशामागे प्रचंड मेहनत आणि योग्य नियोजनाचा वाटा आहे. त्याला अमरावती येथील डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्रसिद्ध प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोले यांचे बहुमूल्य तांत्रिक मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सागरने स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत धडक मारली.

### विद्यापीठ प्रशासनाकडून कौतुकाचा वर्षाव

रौप्य पदक विजेता सागर जाधव याने मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल विद्यापीठ स्तरावरून त्याचे अभिनंदन होत आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. तुनजा राऊत यांनी रौप्य पदक पटकाविल्याबद्दल सागर जाधव आणि त्याचे प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा आधुनिक मटेरियल सायन्सवरील मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात नुकताच राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण करणे, संशोधनाची प्रेरणा देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्किोन विकसित व्हावा या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून विनायक विज्ञान महाविद्यालय येथील डॉ. प्रशांत खरात, डॉ. जी. जी. मुळे उपस्थित होते.

डॉ. प्रशांत खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना धातु विज्ञान ऑफ मॉडर्न मटेरियल सायन्स या विषयावर सविस्तर माहिती दिली. आधुनिक पदार्थविज्ञान, नॅनो–मटेरियल्स, औद्योगिक उपयोग आणि भविष्यातील तंत्रज्ञान विकासामध्ये धातु विज्ञानाची भूमिका यावर सोप्या व प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप वाघुळे यांनी भारताला पहिले नोबेल पारितोषिक हे सर सी. व्ही. रमण यांच्या संशोधनामुळे मिळाले असून विज्ञान क्षेत्रात भारतीय संशोधकांची परंपरा अत्यंत समृध्द आहे. भौतिकशास्त्र विषयामध्ये संशोधन, उद्योग, तंत्रज्ञान, डेटा सायन्स आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. भौतिकशास्त्र हा केवळ सैद्धांतिक विषय नसून रोजगाराभिमुख विषय असून विभागातील अनेक माजी विद्यार्थी आज विविध प्रतिष्ठित संस्थांमध्ये उच्च पदांवर कार्यरत असल्याचे याप्रसंगी त्यांनी सांगितले. विभागातील प्राध्यापकांनीही शिक्षणाचे बदलते स्वरुप, संशोधनातील संधी आणि आधुनिक तंत्रज्ञानातील भौतिकशास्त्राचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे महान वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. फिजिक्स क्लबच्या माध्यमातून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. फिजिक्स क्लबचे अध्यक्ष आदित्य प्रधान यांनी मनोगत व्यक्त करून प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन कु. चंदन बावनकर, तर आभार श्री सार्थक गाडगे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धा डिपेक्स-२०२६ मध्ये विद्यापीठाच्या राम रोडेला प्रथम क्रमांक; इन्क्युबेशन सेंटरच्या कार्याचा गौरव



सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या डिपेक्स-२०२६ या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थी राम अशोकराव रोडे याने उल्लेखनीय यश संपादन करत सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्याच्या या यशामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इंन्क्युबेशन सेंटरचे नाव राज्यभरात उज्ज्वल झाले आहे.

या स्पर्धेची निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडली. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून आपल्या प्रकल्पाची माहिती सादर केली. दुस-या टप्प्यात विविध भागांमध्ये प्रादेशिक फेरी घेण्यात आली. त्यानंतर अंतिम फेरीमध्ये सेफ्टी थीम अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रातून राम रोडे व चमूची निवड करण्यात आली. हा प्रकल्प जीपीएस आणि जीएसएम तंत्रज्ञानावर आधारित महिला सुरक्षा उपकरण असून आजच्या युगामध्ये महिला सुरक्षेतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे यंत्र ठरेल. या उपकरणामध्ये आपात्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी, यासाठी जीपीएस च्या माध्यमातून अचूक स्थान शोधणे आणि जीएसएम द्वारे कुटुंबीय किंवा पोलिसांना संदेश पाठवण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच स्वसंरक्षणासाठी इलेक्ट्रीक शॉक फिचर देखील या उपकरणामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या प्रकल्पाची कल्पकता, तांत्रिक रचना आणि समाजोपयोगी स्वरुप लक्षात घेऊन परीक्षकांनी त्यांना सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक देऊन गौरविले.

सदर प्रकल्प विकसित करताना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरकडून मोलाचे मार्गदर्शन मिळाले. सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी महिलांना वास्तव जीवनात येणा-या समस्या व आव्हानांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, बीआयएम अमोल हिरुळकर यांनी प्रकल्पाच्या निर्मितीत तांत्रिक मार्गदर्शन करून सहकार्य केले.

दरम्यान, ६ व ७ मार्च रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात डिपेक्स-२०२६ अंतर्गत राज्यस्तरीय सिम्पोजियम देखील आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार,



उद्योजकता व नवोपक्रम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती मनिषा वर्मा, आय-हब गुजरातचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरण्या महंता यांनी इन्क्युबेशन सेंटरद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, स्टार्टअप्स व उद्योजकता वाढीसाठी केलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. या योगदानाबद्दल आनंद यादव व नरेश मोवळे यांनी सन्मानचिन्ह स्वीकारले.

# तरूणांनो ! व्यसनाधिनता आणि सायबर फसवणुकीपासून सावध रहा
# अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक रामनाथ पोकळे यांचे आवाहन




कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते मार्गदर्शन करतांना

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे साहसाचे प्रतीक आहे. त्यांनी त्या काळात अफाट धाडस दाखवून गडकिल्ले बांधले आणि आरमाराची स्थापना केली. हाच वारसा जपण्यासाठी आजच्या तरुणांनी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी व्यसनाधिनतेपासून दूर रहा, सायबर फसवणुकीपासन सावध रहा, असा मौलिक सल्ला अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक श्री रामनाथ पोकळे यांनी युवकांना दिला. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक श्री रामदास पोकळे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय, मुंबई येथील राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी डॉ. मिलींद काळे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, सौ. स्वाती पोकळे, रा.से.यो. चे संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर तसेच पाचही जिल्हांचे रा.से.यो. चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

श्री रामनाथ पोकळे म्हणाले, महाराष्ट्रातही ड्रग्जचे जाळे पसरत असून, तरुण पिढी या विळख्यात अडकत आहे. 'अमली पदार्थांमुळे केवळ एका व्यक्तीचे वा कुटुंबाचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण पिढी उद्ध्वस्त होऊन देशाच्या प्रगतीला खिळ बसते. हा धोका लक्षात घेता रासेयोच्या स्वयंसेवकांनी समाजात याविषयी जनजागृती करावी. सायबर फसवणुकीचे प्रमाण आज मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. २०२२ मध्ये भारतात २२०० कोटी रुपयांची सायबर फसवणूक झाली होती, जी २०२५ पर्यंत २० हजार कोटींच्या पुढे गेली आहे. सोशल मीडियाचा वापर करताना आपण अनवधानाने अनेक परवानग्या देतो, ज्यामुळे आपली खासगी माहिती असुरक्षित होते. फेसबुक, इंस्टाग्राम सारख्या ॲप्समुळे आपण आपल्या हालचालींवर स्वतःच 'सीसीटीव्ही' लावून घेतल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. एन.एस.एस. चे ब्रिदवाक्य 'प्रथम समाज, नंतर मी' हे लक्षात ठेवून आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण क्षेत्रात रासेच्या विद्यार्थ्यांनी काम करणे आवश्यक आहे. सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करणे आणि सायबर गुन्ह्यांपासून सावध राहणे ही काळाची गरज असल्याचा मोलाचा सल्ला श्री पोकळे यांनी याप्रसंगी दिला.

**साहसी वृत्तीसोबतच समाजसेवेचा वसा जपा – कुलगुरू**




पो. महा. रामनाथ पोकळे मार्गदर्शन करतांना

अध्यक्षक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, शौर्य आणि सेवा या मंत्राचा अवलंब करुन विद्यार्थ्यांनी समाज आणि देशासाठी योगदान द्यावे. तुम्ही केवळ रासेयोंचे स्वयंसेवक नसून समाज परिवर्तनाचे दूत आहात. तुम्ही घेतलेला समाजसेवेचा वसा जपा, असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, या शिबिरात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी केवळ साहसी खेळांचा आनंद न घेता, समाज परिवर्तनाचे दूत म्हणून काम करावे. विद्यार्थ्यांनी व्यसनाविरुध्द लढा देऊन समाजाला जागरूक करावे. आज तरुणाईमध्ये मोबाईलचे वाढते व्यसन आणि त्यातून उद्‌भवणा–या आत्महत्येसारख्या गंभीर घटनांवर त्यांनी प्रकाश टाकला. मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे मानसिक आजार रोखण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढाकार घेण्याची गरज कुलगुरूंनी व्यक्त केली. तसेच हवामान बदल, पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, स्वयंसेवकांनी 'वसुधैव कुटुंबकम्' या भावनेतून पर्यावरणाचे रक्षण करावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

रासेयो राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी डॉ. मिलींद काळे मार्गदर्शन करतांना म्हणाले, बाह्य शक्तीपेक्षा आंतरिक शक्ती फार मोठी असते. त्याची जाणीव आपल्याला झाली पाहिजे आणि त्यासाठीच अशाप्रकारच्या शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. शिबिराच्या माध्यमातूनच आपल्यातील आंतरिक शक्ती कळत असते व आपण ती शक्ती जागृत करीत असतो. त्यामुळे आपल्यातील सुप्त शक्ती जागृत करावी, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.




डॉ. मिलींद काळे मार्गदर्शन करतांना



दीपप्रज्वलन करतांना मान्यवर

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पारंपरिक पोशाख परिधान करून आदिवासी बांधवांनी आदिवासी गदली नृत्य सादर करीत मिरवणुकीद्वारे प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनतर संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत आणि रासेयो लक्ष गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह आणि ग्रामगीता देऊन सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्य कार्यक्रमाला विशेष उपस्थित सौ. स्वाती पोकळे यांचा सन्मानचिन्ह देऊन सस्नेह सन्मान करण्यात आला. शिबिराकरीता राज्यभरातील १९ विद्यापीठातील ९८ विद्यार्थी व १५ संघ व्यवस्थापक सहभागी झाले आहेत. सूत्रसंचालन डॉ. हर्षाली वानखडे, तर आभार डॉ. हनुमंत भोसले यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



साहसी क्रीडा शिबीराला उपस्थित रासेयो विद्यार्थी



# विद्यार्थ्यांनी अनुभवला तब्बल ८ किलोमीटरचा ॲडव्हेंचर ट्रेक
## राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या गाविलगड ॲडव्हेंचर ट्रेक ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. सोमवारी सकाळी ७ वाजता डॉ. जयंत वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी गाविलगडावर चढाई सुरु केली. यादवकाळातील असलेला गाविलगड किल्ल्याबद्दलची माहित्ती जाणून घेण्यात विद्यार्थ्यांमध्ये कमालीची उत्सुकता दिसून आली.

साहसिक क्रीडा शिबिराचा एक भाग म्हणून ट्रेकिंग चा समावेश शिबिरात करण्यात येतो. गाविलगड किल्ल्याचा मछली दरवाज्यातून विद्यार्थ्यांनी प्रवेश केला , त्यांनतर वीरभान द्वारातून प्रवेश करताना त्यांनी अचलपूर येथील नवाब याच्या राजचिन्ह असलेल्या दगडी शिल्पाची पाहणी केली. किल्ल्याच्या शार्दूल दरवाजावरील कोरीव नक्षीकाम , प्रवेश द्वारावरील टेहळणी बुरुजे पाहून त्या काळातील सुरक्षा व्यवस्थेची माहिती डॉ.जयंत वडतकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.



इसवी सन १८०३ साली मराठे विरुद्ध इंग्रज यांच्यातील झालेल्या लढाईची साक्ष असलेल्या दिल्ली दरवाज्याचा ऐतिहासिक इतिहास ऐकताना विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते. त्या काळातील जलव्यवस्थापन आणि सद्यस्थितीत किल्यावर असेलेले जिवंत तलाव , पाणी शुद्धीकरण पद्धतीचे अवशेष , दारुगोळा कक्ष , प्राचीन शिवमंदिर, मोठी म्शजिद ,बांगडी तोफ इत्यादी ठिकाणींनीही विदयार्थ्यांनी भेटी दिल्या. जंगलातून चालताना प्रत्येक विद्यार्थाने ऍडव्हेंचर ट्रेक चा थरार अनुभवला.

या शिबिरामध्ये राज्यभरातील १९ विद्यापीठातील ९८ विद्यार्थी व १५ संघ व्यवस्थापक सहभागी झाले होते. त्याचबरोबर भारत सरकार युवा व खेल मंत्रालय पुणे रा.से.यो. चे क्षेत्रीय संचालक डॉ. अजय शिंदे यांनी सदर शिबिराला प्रत्यक्ष भेट दिली . आणि ऍडव्हेंचर कॅम्प मध्ये सहभागी होऊन त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह आणखीनच वाढविला. या यासोबतच विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू , डॉ. जयंत वडतकर , विद्यापीठा चे सोशल मीडिया समन्वयक श्री अनिकेत ठाकरे तसेच पाचही जिल्ह्यांचे रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.



ट्रेकींग करतांना विद्यार्थी

# राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचा समारोप उत्साहात संपन्न
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ठरले उत्कृष्टविद्यापीठ

## मेळघाटातील निसर्ग अनुभव युवकांसाठी एक जीवनदायी शिक्षण - डॉ. रविंद्र कडू



मार्गदर्शन करतांना डॉ. रविंद्र कडू

निसर्ग आणि मानवाचे नाते उलगडण्यासाठी ट्रेकिंग हे एक उत्तम माध्यम असून, त्यातून मिळणारा अनुभव हा खऱ्या अर्थाने जीवनाचे शिक्षण देणारा असतो, असे प्रतिपादन राज्यपाल नामीत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू यांनी साहसी क्रीडा शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात केले. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, सुप्रसिद्ध आर्किटेक्ट श्री. उमेश पाटणकर, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदराचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री राघवेंद्र मुन व सौ. वंदना मुन तसेच पाचही जिल्ह्यांचे रा.से.यो. चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

पाच दिवस चाललेल्या या साहसी क्रीडा शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध ॲक्टिव्हिटी मध्ये सहभाग घेतला होता. यामध्ये विद्यार्थ्यांचा ॲडव्हेंचर प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग, सांस्कृतिक सहभाग , शिस्त व वागणूक आणि लेखी परीक्षा या प्रकारावर मूल्यांकन करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार पटकाविला , तसेच उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. सचिन चव्हाण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व प्रा.अर्चना श्रीचिपा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले . तर उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रथमेश चाटे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी व रंजित जाधव मुंबई विद्यापीठ , कु. श्रुष्टि राणे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला , कु. पारुल तिवारी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई याचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच १९ विद्यापीठातील सहभागी कार्यक्रम अधिकऱ्यांचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ॲडव्हेंचर हब चे मनीष ढाकुलकर व त्यांच्या संपूर्ण टीमचा देखील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. रवींद्र कडू आपल्या भाषणात म्हणाले, मेळघाटातील जैवविविधतेचा अनुभव घेण्यासाठी आलेल्या युवकांच्या तुकडीला मार्गदर्शन करताना त्यांनी निसर्ग संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. मेळघाटातील जंगलात आजही अशा अनेक वनस्पती आहेत, ज्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. संशोधकांसाठी हे क्षेत्र मोठे आव्हान आणि संधी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ट्रेकिंगमुळे व्यक्तीचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्व घडण्यास मदत होते. विकसित भारताकडे वाटचाल करताना युवकांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.




रासेयो संचालक डॉ. निलेश कडू विचार मांडतांना

**नियोजन आणि सळसळते रक्तच घडवेल देशाची प्रगती – डॉ. निलेश कडू**

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. निलेश कडू म्हणाले , दैनंदिन जीवनात शिस्त, केलेले नियोजन आणि युवकांमधील सळसळते रक्तच देशाच्या प्रगतीसाठी आणि सामाजिक सुधारणेसाठी कारणीभूत ठरेल अस मत त्यांनी राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराच्या समारोपिय कार्यक्रमात व्यक्त केला. ते पुढे म्हणाले यशस्वी जीवनासाठी शांत डोक्याने विचार करून आपल्या कामाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही कार्यासाठी सळसळते रक्त असणारे उत्साही स्वयंसेवक ही देशाची मोठी ताकद आहेत. शिबिराच्या यशासाठी आयोजक आणि सहभागी दोघांचेही सहकार्य महत्त्वाचे असते.'विद्यार्थ्यांची साथ आणि आमचा प्रयत्न' यातूनच विकासाचे ध्येय गाठता येईल, असेही ते म्हणाले.

**साहसी खेळांच्या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडणार – डॉ. जयंत वडतकर**

विद्यार्थ्यांमध्ये साहसी वृत्ती निर्माण करण्यासाठी आणि त्यांना विविध खेळांची तांत्रिक माहिती देण्यासाठी चिखलदरा येथे आयोजित पाच दिवसीय साहसी क्रीडा शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. चिखलदऱ्याच्या या भूमीवर उपलब्ध असलेल्या भौगोलिक परिस्थितीचा वापर करून विद्यार्थ्यांना साहसी खेळांचे उत्कृष्ट प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपकरणांची ओळख आणि त्यांच्या वापराचे तंत्र आत्मसात केल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे चित्र पाहायला मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत आणि रासेयो लक्ष गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिबिराकरीता राज्यभरातील १९ विद्यापीठातील ९८ विद्यार्थी व १५ संघ व्यवस्थापक सहभागी झाले आहेत. पाचही दिवसाचे अहवाल वाचन डॉ. विशाल गजभिये यांनी केलेसूत्रसंचालन डॉ. सुधीर कोहचाळे , तर आभार डॉ. विकास देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, स्वयंसेवक, संघ व्यवस्थापक, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# गोडंबी (बिब्बा) प्रक्रिया उद्योग संशोधन प्रकल्पाची राज्यस्तरावर दखल
## प्रा. प्रमोद पंडीत यांचा प्रकल्प टॉप १० मध्ये



सत्कार प्रसंग

उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी २००८ मध्ये महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी 'आविष्कार' स्पर्धेची सुरुवात केली. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर आणि पी.पी.जी. (पीएच.डी) या गटांमध्ये जिल्हास्तर, विद्यापीठ स्तर आणि आंतर विद्यापीठ (महाराष्ट्र राज्य) स्तरावर घेण्यात येते. यावर्षी १८ वी आविष्कार स्पर्धा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री आचार्य देवव्रत यांच्या आदेशान्वये आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठद्वारा संचालित मॉडेल डिग्री कॉलेज बुलडाणा येथील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत यांनी पी.पी.जी. (पीएच.डी) गटामध्ये आपला संशोधन प्रकल्प बुलडाणा जिल्हा स्तरावर सादर केला. त्यांच्या गोडंबी (बिब्बा) प्रक्रिया उद्योग या संशोधन प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळून त्यांची विद्यापीठ स्तरासाठी निवड करण्यात आली. दि. ३० व ३१ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे त्यांनी आपला संशोधन प्रकल्प सादर केला व प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला. याबद्दल त्यांना विद्यापीठ स्तरावर अत्यंत मानाच्या समजला जाणारा 'कलरकोट' ने सन्मानित करण्यात आले व आंतर विद्यापीठ (राज्य) स्तरावर त्यांची निवड झाली. राज्यस्तरावरील ही स्पर्धा २८ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांनी सहभाग घेऊन पदवी, पदव्युत्तर आणि पी.पी.जी. (पीएच.डी) गटात संपूर्ण महाराष्ट्रातील ९१० संशोधक विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले. यामध्ये पी.पी.जी. (पीएच.डी) गटामधून प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत यांच्या संशोधन प्रकल्पाची राज्यस्तरावरील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये निवड करण्यात आली.

प्रा. प्रमोद विश्वनाथ पंडीत हे मॉडेल डिग्री कॉलेज बुलडाणा येथे कार्यरत आहेत. त्यांचे श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथील संशोधन केंद्रात डॉ. सुनिता कलाखे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विषयांमध्ये संशोधन (पीएच.डी.) सुरू असून त्यांनी चिखली तालुक्यातील भानखेडे येथील महादेव कोळी या जमातीतील आदिवासी महिला करीत असलेल्या बिब्ब्यापासून गोडंबी प्रक्रिया उद्योग डोळ्यासमोर ठेवून पश्चिम विदर्भाच्या संदर्भात संशोधन प्रकल्प राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत सादर केला. या प्रकल्पासाठी त्यांना आचार्य पदवीच्या मार्गदर्शिका डॉ. सुनिता कलाखे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे आणि भानखेडे येथील पोलीस पाटील मिलींद इंगळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रा. प्रमोद पंडीत यांच्या गोडंबी प्रक्रिया उद्योग संशोधन प्रकल्पाची महाराष्ट्रातील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचे डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी अभिनंदन करुन यशाच्या शुभेच्छा दिल्या.



# लोकशाही सक्षम करण्यासाठी ग्रामसभा प्रभावी होणे आवश्यक - डॉ. हर्षवर्धन देशमुख

## विद्यापीठात संत गाडगेबाबांची दशसूत्रे व ग्रामविकासावर कार्यशाळेचे उद्‌घाटन




डॉ. हर्षवर्धन देशमुख विचार मांडतांना व विचारपीठावर उपस्थित मान्यवर

जर या देशाची लोकशाही सक्षम करायची असेल, तर ग्रामसभा सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत गावातील प्रत्येक नागरिकाला ग्रामसभेचे महत्त्व उमजत नाही, तोपर्यंत खऱ्याअर्थाने ग्रामीण विकास साधला जाणार नाही, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केले. 'संत गाडगेबाबांची दशसूत्रे आणि ग्रामविकास' या विषयावर आयोजित सरपंच कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक आचार्य श्री हरिभाऊ वेरूळकर गुरूजी, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, जेष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना संस्थापक अध्यक्ष श्री गजानन बोंडे, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना अध्यक्ष श्री राजेंद्र कराळे व संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केली. ते पुढे म्हणाले, अधिकारांसोबत सरपंच व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव सुद्धा ठेवली पाहीजे, त्यामुळे सरपंचांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. ग्रामपंचायतीमध्ये होणारे सर्व व्यवहार आणि खर्च गावातील प्रत्येक नागरिकाला समजले पाहिजेत. कारभार पारदर्शक असला पाहीजे. फाळणी आणि निर्वासितांच्या प्रश्नांमुळे सुरुवातीच्या काळात ग्रामीण विकासाकडे पूर्णतः लक्ष देता आले नाही.

१९५७ मध्ये बळवंतराय मेहता समितीच्या शिफारसींनंतर आणि पुढे १९९३ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर देशात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था खऱ्याअर्थाने लागू झाली. गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार ग्रामविकास करणे ही प्रत्येक पदाधिकायाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.


डॉ. सतिश तराळ म्हणाले, संत गाडगे बाबांनी समाजाला दिलेली दशसूत्री केवळ आध्यात्मिक उपदेश नसून तो ग्रामविकासाचा एक परिपूर्ण कृती आराखडा आहे. विज्ञानाची जोड देऊन या दशसूत्रीची अंमलबजावणी केल्यास गावे खयाअर्थाने स्वयंपूर्ण होतील. दशसूत्रीतील प्रत्येक सूत्राचा आधुनिक ग्रामविकासाशी संबंध आहे. शिक्षण नसेल तर प्रगती खुंटते. बाबांनी रंजल्या-गांजल्यांसाठी शाळा आणि वसतिगृहे उभारली, कारण त्यांना माहित होते की, विचारांचे परिवर्तन शिक्षणाशिवाय शक्य नाही. केवळ परिसर स्वच्छ ठेवणे म्हणजे स्वच्छता नव्हे, तर विचारांची स्वच्छता राखणे हे ग्रामविकासाचे पहिले पाऊल आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला खिळिखळी करणाया व्यसनाधिनतेवर प्रहार करताना, सरपंचांनी आपल्या गावातून व्यसनमुक्तीची चळवळ सुरू करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात आचार्य वेरूळकर म्हणाले, संत गाडगे बाबांनी दिलेली दशसूत्री हा केवळ उपदेश नसून तो गाव सुखी आणि समृद्ध करण्याचा एक कृती आराखडा आहे. जोपर्यंत गावातील शेवटच्या माणसापर्यंत या दशसूत्रीचा लाभ पोहोचत नाही, तोपर्यंत ग्रामविकास अपूर्ण आहे. गाडगे बाबांनी हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा मंत्र दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महारांनी ग्रामगीतेतून ग्रामविकासाठी संकल्पना मांडली. आजच्या सरपंचांनी आणि युवकांनी केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता श्रमदानातून गावे स्वच्छ आणि सुंदर करावीत. दशसूत्रीतील प्रत्येक सूत्र ग्रामविकासासाठी महत्वाचे समजून त्यावर सरपंचांनी कामे करायला हवीत. विद्यापीठ जेव्हा अशा कार्यशाळा घेते, तेव्हा त्याचा उद्देश केवळ चर्चा करणे नसून, इथून जाणारा प्रत्येक प्रतिनिधी आपल्या गावात 'गाडगे बाबा व राष्ट्रसंतांचे विचार' प्रत्यक्ष राबवेल हा असावा. त्यांनी शिक्षण, व्यसनमुक्ती आणि आरोग्य या त्रिसूत्रीवर भर देऊन ग्रामविकासाचे मॉडेल उभे करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमामध्ये संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी, तर श्री गजानन बोंडे यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन डॉ. राजेश मिरगे यांनी केले. कार्यशाळेला विदर्भातील सरपंच तसेच विद्यापीठाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारच्या सत्रात ग्रामपंचायतीमध्ये नियुक्त झालेल्या प्रशासकाची जबाबदारी व भूमिका यावर सौ. लिनाताई तुरकर यांनी, तर शासकीय योजना राबवितांना येणाया अडचणी यावर प्रा. राजेंद्र कराळे यांनी माहिती दिली. याप्रसंगी याचिकाकर्ते श्री अरविंद दळवी यांचा सत्कार व मार्गदर्शन तसेच ॲड. देवा पाचभाई व श्री अनिल उर्फ अण्णा पाटील यांनी उपस्थितांचे निराकरण केले.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर



# शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर बुध्दीप्रामाण्यवादी व्हा - प्रा.मधुकर जाधव

## विद्यापीठात शहीद दिनानिमित्त व्याख्यानमाला संपन्न





विषयाची मांडणी करतांना प्रा. मधुकर जाधव

शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर देशहिताचे कार्य करा, राष्ट्रीय एकात्मता, देशाची विविधता जपावी लागेल, वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवावा लागेल आणि त्यासाठी बुध्दीप्रामाण्यवादी व्हा, अनुकरण करा, पण अंधानुकरण नाही, असे मौलिक विचार प्रा. मधुकर जाधव यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनानिमित्त 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, अधिसभा सदस्य श्री नितीन टाले, श्री कैलास चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना प्रा. जाधव म्हणाले, लाला लजपतराय यांच्या विचाराचा भगतसिंह यांच्यावर मोठा प्रभाव होता. लाला लजपतराय यांच्या अकाली निधनाने ते व्यथित झाले व ज्यांच्यामुळे लाला लजपतराय यांना प्राण गमवावा लागला, त्याचा बदला त्यांनी घेतला. अलेम्ब्लीमध्ये बॉम्बस्फोट घडवण्यामागे सुध्दा भारतीयांचे विचार ब्रिटीश सरकारच्या कानापर्यंत पोहचले पाहिजेत, या हेतुने भगतसिंह यांनी बॉम्बस्फोट केला होता, वस्तुत: जीवितहानी करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. चंदनसिंह सारख्या ब्रिटीशांची चाकरी करणा–याला सुध्दा मारण्यात आले होते. भगतसिंह यांनी स्वत:ला अटक करवून घेतल्यानंतर कारागृहामध्ये सुध्दा भारतीयांना दुय्यम वागणूक दिल्या जात होती, त्यासाठी त्यांनी कारागृहातच उपोषण आंदोलन सुरू केले होते. ब्रिटीश काळात प्रत्येक बाबींसाठी भारतीयांना आंदोलन करावे लागत होते. बाबू गेणू यांनी सुध्दा भारतातील कच्चा माल ब्रिटीशांना नेण्यास मनाई केली होती. या सर्व बाबींवरुनच क्रांतिकारक, समाजसुधारकांनी देशासाठी किती लढा दिला हे स्पष्ट होते. त्यामुळे आजच्या युवकांनी आपल्या ज्ञानकौशल्याचा उपयोग समाजहित, देशहितासाठी करावा. शहीदांचे चरित्र वाचा, विचार आत्मसात करा. ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत रहा, नक्कीच यशस्वी व्हाल, असा सल्लाही प्रा. जाधव यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिला.



अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

मार्गदर्शनपर भाषण करतांना अधिसभा सदस्य श्री नितीन टाले म्हणाले, सर्वस्वाचा त्याग करुन तरूण वयातच क्रांतिकारकांनी देश स्वातंत्र्यासाठी लढा दिला. आपण तरुण वयात काय करीत आहोत, हे पाहिले पाहिजे. आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत, त्यांना सामोरे जा. विद्यार्थी सुध्दा परिवर्तन घडवून आणू शकतात, असेही श्री टाले म्हणाले. श्री कैलास चव्हाण म्हणाले, ब्रिटीशांची सत्ता उलथवण्यासाठी क्रांतिकारकांनी मोठे बलिदान दिले आहे. अवघ्या तेवीस वर्ष वयात भगतसिंह यांनी अनेक पुस्तके वाचली, अभ्यास केला. लाला लजपतराय यांच्याकडून देशभक्तीचे धडे घेतले. वीर सावरकर यांनी अभिनव भारत संघटना उभारुन देशासाठी लढा दिला. पुस्तके वाचा, स्वप्न पहा आणि पुढे जा असे आवाहन त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, क्रांतिकारकांचे विचार व कार्य आत्मसात करावे लागेल. इतिहासाचे वाचन करावे लागेल. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिली, त्यांच्या विचाराचा वारसा आपल्याला पुढे न्यावा लागेल. विकसित भारतासाठी युवकांचे महत्वाचे योगदान असून त्यासाठी निरंतर प्रयत्न करा, असेही ते म्हणाले.

संत गाडगे बाबा, शहीद भगतसिंह, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर यांनी, सूत्रसंचालन भगवान किनाके यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


उपस्थित विद्यार्थीनी व विद्यार्थी




# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागरूकता आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न



डॉ. संदीप जोशी विचार व्यक्त करतांना

'ग्रामीण भागातील स्थानिक संसाधनांचा वापर करून समाजाचा विकास करणे आणि तरुणांना उद्योजक बनवणे हेच खऱ्या अर्थाने ग्रामस्वराज्य आहे. यासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग आणि संशोधन संस्थांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन वर्धा येथील महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थेचे सिनिअर सायंटिफिक ऑफिसर श्री. संदीप जोशी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'उन्नत भारत अभियान' अंतर्गत आयोजित जागरूकता आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, एम. जी. आय. आर. आय. चे डॉ. निलेश काटेकर, डॉ. श्रावण चांडक, डॉ. शितल शर्मा, डॉ. स्वानंद कळंबे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तथा कार्यशाळेच्या संयोजक डॉ. वर्षा नाठार व सहसंयोजक डॉ. मनोज कुंभारे उपस्थित होते. डॉ. जोशी यांनी पुढे सांगितले की, १९३४ मध्ये महात्मा गांधींनी वर्धा येथे 'ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन' ची स्थापना केली होती. आज भारत सरकारच्या मंत्रालयांतर्गत एक स्वायत्त राष्ट्रीय संशोधन संस्था म्हणून कार्यरत आहे. खादी आणि कापड, बायो – हर्बल, ग्रामीण रसायन, ग्रामीण हस्तकला आणि, ग्रामीण ऊर्जा आणि पायाभूत, व्यवस्थापन आणि प्रणाली विभाग असल्याचे सांगून विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, विशेष प्रकल्प आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधकांसाठी पदव्युत्तर स्तरावरील प्रबंध आणि भविष्यात पीएच.डी.साठी संशोधन केंद्र म्हणून संधी उपलब्ध आहे. याशिवाय शिक्षकांसाठी 'उन्नत भारत अभियान' आणि विद्यापीठासोबत मिळून संयुक्त संशोधन प्रकल्प राबवण्याची संधी असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले 'केवळ प्रयोगशाळेत संशोधन करून चालणार नाही, तर ते समाजापर्यंत आणि उद्योगांपर्यंत पोहोचले पाहिजे,' असे सांगत त्यांनी लडाखपासून ते भारतीय सैन्यापर्यंत संस्थेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा उल्लेख केला. या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी एक नवे व्यासपीठ निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



डॉ. वैशाली गुडधे अध्यक्षीय भाषण करतांना

**ग्रामीण विकासासाठी तंत्रज्ञानाची 'लॅब टू लँड' अंमलबजावणी काळाची गरज – डॉ. वैशाली गुडधे**

'विद्यापीठातील संशोधनाचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी 'लॅब टू लँड' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील समस्या सोडवण्यासाठी तरुण संशोधकांनी पुढे यावे,' असे आवाहन डॉ. वैशाली गुडधे यांनी केले. त्या पुढे म्हणाल्या की, संशोधकांनी केवळ पदवी मिळवण्यासाठी संशोधन न करता, त्यातून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून यायला हवा. उन्नत भारत अभियानासारख्या उपक्रमांमुळे उच्च शिक्षण संस्था आणि ग्रामीण जनता यांच्यातील दरी कमी होत असून ग्रामीण विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गावपातळीवरील आव्हाने समजून घेण्याची आणि त्यावर तांत्रिक उपाय शोधण्याची संधी मिळेल, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील महिला बचत गटांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे ही त्या म्हणाल्या. प्रादेशिक समन्वय संस्थेचे समन्वयक डॉ. मनोज कुंभार यांनी अभियानाची माहिती देतांना सांगितले की, ग्रामीण विकासासाठी विद्यापीठांचे योगदान महत्त्वाचे असून 'उन्नत भारत अभियाना'तून परिवर्तनाचा संकल्प विद्यापीठाने केला आहे. आय.आय.टी. दिल्ली ही या अभियानाची राष्ट्रीय समन्वय संस्था असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात ५० प्रादेशिक समन्वय संस्था कार्यरत आहेत. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची निवड विदर्भ आणि मराठवाडा विभागासाठी 'प्रादेशिक समन्वय संस्था' म्हणून करण्यात आलीआहे. या अंतर्गतअमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश असून सद्यस्थितीत ११३ संस्था सहभागी संस्था नोंदणीकृत आहेत. या संस्थांमार्फत ५६५ गावे दत्तक घेण्यात आली असून नवीन शैक्षणिक धोरण (NEP २०२०) अंतर्गत या सामाजिक प्रकल्पांसाठी २ क्रेडिट्सची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्मृतिचिन्ह देवून स्वागत करण्यात आले. प्रास्तविक वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तु कार्यशाळेच्या संयोजक डॉ. वर्षा नाठार यांनी केले. याप्रसंगी महात्मा गांधी ग्रामीण उद्योग संस्थेची माहिती देणारी चित्रफीत उपस्थितांना दाखवण्यात आली. संचालन कु. खुशी देवगडे हिने तर आभार कार्यशाळेचे सहसचिव डॉ. के. सी. मोरे यांनी मानले.

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाला सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन फिरके, वनस्पती शास्त्र विभाग माजी प्रमुख डॉ. सुरेंद्र माणिक, कार्यशाळेचे सचिव डॉ. प्रशांत गावंडे, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यादव मावळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, डॉ. सुदर्शन कोवे, उन्नत भारत अभियाना चे समन्वयक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

## तरूणांनो, आव्हानांना न घाबरता सामोरे जा आणि समाजसेवेचा ध्यास घ्या - डॉ. रविंद्र कोल्हे

# विद्यापीठात उन्नत भारत अभियान कार्यशाळेचे उद्घाटन



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

केवळ वैयक्तिक प्रगती किंवा नोकरी करून पोटाची भूक भागेल, पण त्यापलीकडे असलेल्या समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी तरुणांनी कंबर कसली पाहिजे. आव्हानांना न घाबरता त्यांना सामोरे जा, तरच समाज परिवर्तनाचे स्वप्न साकार होईल, असे प्रेरणादायी आवाहन पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात रासायनिक तंत्रशास्त्र विभाग व भूगर्भशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित उन्नत भारत अभियान अंतर्गत आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, रासायनिक तंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, उन्नत भारत अभियानचे समन्वयक डॉ. मनोज कुंभारे उपस्थित होते.

डॉ. कोल्हे यांनी यावेळी आपल्या ४० वर्षांच्या मेळघाटातील सामाजिक संघर्षाचा आणि प्रवासाचा पट विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या विद्यार्थी दशेतील गटाचे नाव सुरुवातीला 'संघर्ष' होते, मात्र शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते 'संवाद' असे झाले. हा बदल संघर्षाकडून समन्वयाकडे जाण्याचा प्रवास दर्शवतो. उन्नत भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी पाच गावे दत्तक घेऊन तेथील प्रश्नांची सोडवणूक करावी. विशेषतः मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि अंधश्रध्दा यांसारख्या प्रश्नांवर विद्यापीठ स्तरावरून संशोधन आणि प्रत्यक्ष कामाची गरज त्यांनी व्यक्त केली. बैरागडसारख्या दुर्गम भागात पत्नीसह राहून नळ योजना राबवणे, कृषी विद्यापीठाच्या मदतीने शेतीचे प्रश्न सोडवणे आणि अंधश्रध्दा निर्मूलन करणे हे मोठे आव्हान होते. एकेकाळी जिथे प्राण्यांचे बळी दिले जात होते, तिथे आज गाडगे बाबांच्या प्रेरणेने 'प्राण्यांना अभय' दिले जाते, असे त्यांनी अभिमानाने सांगितले.

व्यसनमुक्तीबाबत बोलताना ते म्हणाले, ज्या गावात घराघरात दारू गाळली जात होती, तिथे सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज एकही दारूचा अड्डा उरलेला नाही. हे परिवर्तन केवळ तरुणांच्या सहभागामुळे शक्य झाले. विद्यार्थ्यांनी केवळ वर्गात न रमता 'फील्ड वर्क' वर भर द्यावा. पंतप्रधान ज्याप्रमाणे १८-१८ तास काम करतात, तोच उत्साह तरुणांनी आपल्या कामात आणावा. विद्यार्थ्यांनी मेळघाटात येऊन तेथील प्रयोग बघावे असेही ते म्हणाले.

**शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी जोपासा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते**

'विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान आणि पदवी मिळिवण्यावर समाधान मानू नये. समाजातील शेवटच्या घटकाचे प्रश्न समजून घेऊन ते सोडवण्यासाठी प्रयत्न करणे हीच खरी प्रगल्भता आहे. 'उन्नत भारत अभियान' हे केवळ एक अभियान नसून विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

ते म्हणाले, भारत हा खेड्यांचा देश आहे आणि जोपर्यंत ग्रामीण भाग स्वयंपूर्ण होत नाही, तोपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हे अभियान विद्यापीठ आणि ग्रामीण भाग यांच्यातील दुवा म्हणून काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या गावांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष जाऊन काम करावे. शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांना असे प्रकल्प सुचवावेत ज्यातून गावातील पाणी, वीज, शेती आणि आरोग्यासारखे मूलभूत प्रश्न मार्गी लागतील. विद्यार्थी दशेत असतानाच समाजाचे प्रश्न प्रत्यक्ष अनुभवले, तर भविष्यात संवेदनशील नागरिक घडण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना आणि संशोधनाचा वापर ग्रामीण विकासासाठी करावा, असे ते म्हणाले.



दिप्ती ससानेचा सत्कार प्रसंग

महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा उन्नत भारत अभियानचे समन्वयक परिचय डॉ. मनोज कुंभारे यांनी करुन दिला. याप्रसंगी उन्नत भारत अभियानांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिके प्रदान करण्यात आली. दीप्ती आत्माराम ससाने हिला सात हजार रुपयाचे रोख पारितोषिक, फिरोज अन्सारी याला पांच हजार रुपयांचे तर संतोषी आगरकर हिला तीन हजार रुपयांचे रोख पारितोषिक कुलगुरूंच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. तृप्ती बारबुध्दे यांनी, तर आभार डॉ. पी.के. वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाला रासायनिक तंत्रशास्त्र विभागातील डॉ. ए.एल. राठोड, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच उन्नत भारत अभियानचे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व समन्वयक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अतिथीपर मार्गदर्शन करतांना डॉ. रविंद्र कोल्हे



संतोषी आगरकरचा सत्कार प्रसंग



फिरोज अन्सारीचा सत्कार प्रसंग



# जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण अनिवार्य - बीजभाषक डॉ. जे.व्ही. पवार

## विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न



चर्चासत्रामध्ये स्मरणिकेचे विमोचन करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व मान्यवर

भारतातील जातीय विषमतेच्या भिंती तोडण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीयता निर्मूलनाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केवळ चर्चा नव्हे, तर कृतीची गरज आहे. समाजातील जातीभेद मुळापासून उखडून टाकण्यासाठी रक्तसंकर हाच एकमेव प्रभावी मार्ग असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनातून जातीभेदाच्या निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहांना दिलेले महत्त्व व केवळ प्रेमाच्या नावाखाली होणारे विवाह नव्हे, तर जातीची घट्ट विणलेली चौकट मोडण्यासाठी दोन भिन्न जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण होणे अनिवार्य असल्याचे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील प्रसिध्द विचारवंत व चर्चासत्राचे बीजभाषक डॉ.जे.व्ही. पवार यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग आणि नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक दृष्टिकोन : आधुनिक भारताची निर्मिती आणि त्याची समकालीन प्रासंगिकता' या विषयावर बीजभाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य विद्यापीठ, महू चे कुलगुरू डॉ. रामदास आत्राम, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, श्री गजानन महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आशिष मालू, प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे, आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

चर्चासत्राचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. रामदास आत्राम म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक क्षेत्रातील विचार आणि त्यांनी मांडलेले विकासाचे दृष्टिकोन आजही आधुनिक भारतीय धोरणांचा पाया ठरत आहेत. केवळ रस्ते आणि कारखाने बांधणे म्हणजे विकास नसून, सामाजिक परिवर्तन हाच खरा विकास आहे, हे त्यांनी मांडलेले सूत्र आजच्या डिजिटल इंडियाच्या युगात अधिक महत्वाचे ठरत आहे. डॉ. आंबेडकरांचा 'शिक्षित व्हा, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश केवळ सामाजिक न्यायापुरता मर्यादित नव्हता, तर तो आर्थिक न्यायाचा एक सक्षम मार्ग होता. त्यांनी शिक्षणाला गरिबांसाठी केलेली सर्वात मोठी गुंतवणूक मानले होते. शिक्षणामुळे केवळ गतिशीलता वाढत नाही, तर पिढ्यानपिढ्या चालत आलेली विषमता मोडीत निघण्यासही मदत होते, असेही ते म्हणाले. आजच्या 'नॉलेज इकॉनॉमी'मध्ये डॉ. आंबेडकरांचे हे विचार अधिक शक्तिशाली ठरतात. आधुनिक भारताचे 'वित्तीय समावेशन', जन-धन बँक खाती, थेट लाभ हस्तांतरण आणि डिजिटल पेमेंट्स ही पावले डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक लोकशाहीच्या स्वप्नाला पुढे नेणारी आहेत. डिजिटल तंत्रज्ञान हे केवळ प्रगत वर्गाचे साधन न राहता, ते आता आर्थिक सक्षमीकरणाचे एक प्रभावी शस्त्र बनले आहे. तळागाळातील लोकांपर्यंत थेट आर्थिक लाभ पोहोचवून त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, हेच आधुनिक डिजिटल इंडियाचे मुख्य उद्दिष्ट आहे. डॉ. आंबेडकरांनी पाहिलेले आर्थिक न्यायाचे स्वप्न आज तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक वेगाने प्रत्यक्षात येत असल्याचे ते म्हणाले.


डॉ. आशिष मालू विचार व्यक्त करतांना

डॉ. आशिष मालू म्हणाले, शिक्षण क्षेत्रातील त्यांची ही वाटचाल थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. आजचे स्टार्टअप्स, नाविन्यपूर्ण कल्पना आणि आत्मनिर्भरतेचे स्वप्न हे डॉ. आंबेडकरांनी दशकांपूर्वी मांडलेल्या विचारांचेच आधुनिक रूप आहे. ते म्हणाले, बालपणीचे मित्र आणि आमदार रवीजी राणा दोघांनी एकत्र वाढून आणि शिक्षण घेऊन आपल्या भागाच्या प्रगतीचे स्वप्न पाहिले होते. आज आमदार राणा हे ज्या निष्ठेने समाजाची सेवा करत आहेत, त्याचा सार्थ अभिमान असल्याचे ते म्हणाले. शिक्षण ही केवळ पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून, ती एक 'थिंकर्स' आणि 'जॉब क्रिएटर्स' घडवण्याची प्रक्रिया आहे. महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता, कौशल्यावर आधारित शिक्षण, डिजिटल साक्षरता आणि


डॉ. जे.व्ही. पवार बीजभाषण करतांना

नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी, जेणेकरून भविष्यातील आव्हानांना तोंड देणारे 'आंबेडकरवादी तरुण' घडवता येतील. याप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर.डी. सिकची यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, बीजभाषक डॉ. जे.व्ही. पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, आर्थिक विचार प्रकर्षाने मांडले व मोठ्या वयातही डॉ. पवार यांनी आम्हा सर्वांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतीय अर्थव्यवस्थेमधील दृष्टीकोन देखील यामुळे समजला, असेही प्र–कुलगुरू म्हणाले.

संत गाडगे बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन व क्रांतीज्योत पेटवून विद्यापीठ गीताने चर्चासत्राची सुरूवात झाली. प्रास्ताविकेतून डॉ. संतोष बनसोड यांनी चर्चासत्र


डॉ. रामदास आत्राम मार्गदर्शन करतांना

आयोजनामागील भूमिका मांडली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे यांनी केले. याप्रसंगी १३८ शोधनिबंधाच्या संपादकीय ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशिल खोब्रागडे यांनी, तर आभार प्राचार्य डॉ. मनिष सिरसाट यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, आंबेडकरी चळवळीतील गणमान्य नागरिक, विचारवंत, अभ्यासक, साहित्यिक, विद्यार्थी उपस्थित होते


डॉ. आर.डी. सिकची विचार व्यक्त करतांना



कार्यशाळेला उपस्थिती

# विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने तपोवन येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने तपोवन येथील महामना मालवीय विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त रासायनिक प्रात्यक्षिकांद्वारे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विदर्भ महारोगी संस्था व पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या कार्याची माहिती घेतली.

तपोवन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई यांनी हृदयस्पर्शी भाषणातून पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या महान कार्याचा प्रेरणादायी आढावा घेतला. ते पुढे म्हणाले, कुष्ठरोग्यांसाठी आयुष्य समर्पित करणारे डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे केवळ वैद्यक तज्ज्ञ नव्हते, तर मानवतेचे पुजारी होते. त्यांनी कुष्ठरोग्यांना समाजात सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. स्वातंत्र्य संग्रामातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. एखाद्या कुष्ठरुग्णाच्या चेह-यावर हास्य उमटवू शकलो, तर तेच माझ्यासाठी मोठे पारितोषिक आहे, हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला. कुष्ठरोग एक वैद्यकीय समस्या आहे, हा त्यांचा संदेश विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आला. कुष्ठरोग्यांसाठी देशातील पहिली शाळा स्थापन करून डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी कुष्ठरुग्णांच्या पाल्यांना शिक्षणाची दारे खुली करुन दिल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध रासायनिक प्रयोग सादर करून शाळेतील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पना सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. विद्यार्थिनींनी महान महिला वैज्ञानिकांच्या वेशभूषेत सहभाग घेतला, त्यामध्ये कु. रेणुका नाले हिने बी. विजयालक्ष्मी, तर कु. वैष्णवी शुक्ला हिने मेरी क्यूरी यांची भूमिका साकारली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत समारंभाने झाली. तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या जीवनकार्यावर लिहिलेली पुस्तके देऊन डॉ. मनिषा कोडापे, डॉ. जागृती बारब्दे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. स्वाती गडखे, अनघा घुरडे यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे सचिव श्री सहदेव गोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन व तपोवन संस्थेचा परिचय संस्थेचे सहसचिव श्री ऋषिकेश देशपांडे यांनी करून दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला तपोवन संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सहकारी व पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.



# विद्यापीठामध्ये महिला दिनानिमित्त 'महिला स्टार्टअप्स' चा सत्कार



महिला स्टार्टअप्स सत्कार प्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते सत्कार करतांना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन, रसायनशास्त्र विभाग व इंटरनॅशनल ह्युमन राईटसब वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला स्टार्टअप्सचा सत्कार सोहळा इन्क्युबेशन सेंटर येथे उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून जाधव लेलँड प्रा. लि. च्या सीईओ कु. कश्मिरा जाधव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषध सदस्य डॉ. मनिषा कोडापे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते महिला–नेतृत्वाखालील स्टार्टअप्स एन.के. बायोब्लेंड प्रा. लि. च्या संचालक कु. साक्षी बंड, लॉक युवर आयडिया प्रा.लि. च्या संचालक श्रीमती योगिता पवार, श्री मोरया ॲग्रो रिसर्च नॅनो बायोटेक प्रा.लि. च्या संचालक श्रीमती सुनिता बनसोड, प्लेऊरोटसब फुड इंडस्ट्रिज प्रा. लि. च्या संचालक श्रीमती कुमुदिनी इंगळे, बायो निर्मित प्रा. लि. च्या संचालक देवयानी गोळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांचे विद्यापीठातील योगदान व कार्याचा याप्रसंगी गौरव करण्यात आला.

प्रमुख अतिथी व जाधव लेलँड प्रा. लि. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी कु. कश्मिरा जाधव यांनी मार्गदर्शन करतांना महिला उद्योजकांनी नेटवर्किंग, मार्केटिंग यावर भर द्यावा आणि एकमेकांच्या संयोगाने मार्गक्रमण करावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महिला उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित करतांना नव्या पिढीतील महिलांनी स्टार्टअप व नवोपक्रम क्षेत्रात पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी डॉ. मनिषा कोडापे यांनीही आपले विचार व्यक्त केले. महिला उद्योजिकांनी आपापल्या स्टार्टअपबद्दल माहिती देत आपले अनुभव कथन केले. वुमेन ॲन्ड चाईल्ड वेल्फेअर सेल, अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. सुयोग अव्दैत पानट यांनी इंटरनॅशनल ह्युमन राईटसब वेल्फेअर असोसिएशन विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या आगमन व पुष्पगुच्छ देऊन स्वागताने झाली. इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरकर यांनी स्वागतपर भाषणातून इन्क्युबेशन सेंटरच्या कार्याचा आढावा मांडला. सूत्रसंचालन श्री. अमोल हिरुळकर, आभार सेंटरचे सीईओ श्री आनंद यादव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नरेश मोवळे, रवी ढेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, इंटरनॅशनल ह्युमन राईट्स वेल्फेअर असोसिएशनचे श्री राजेश इजवे यांनी अथक परिश्रम घेतले.



# विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात जागतिक महिला दिन व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक महिला दिन तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने विविध कार्यक्रम संपन्न झाले. महिला सक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजपरिवर्तनात स्त्रियांची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यू. राऊत उपस्थित होते.

'स्त्री शिक्षणाची जननी : सावित्रीबाई फुले' या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा अभ्यासपूर्ण आढावा आपल्या निबंधांमधून मांडला. स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य, समाजातील अन्यायकारक प्रथांविरुध्द दिलेला लढा तसेच सामाजिक समतेसाठी त्यांनी उभारलेले आंदोलन यांचे विविध पैलू आपल्या लेखनातून विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडले. निबंध स्पर्धेत एम.ए. भाग–१ ची विद्यार्थीनी कु. मयुरी गायकवाड प्रथम, एम.ए. भाग–२ ची कु. गायत्री खरबडे द्वितीय, एम.ए. भाग–१ ची निर्मल काळे हिने तृतीय क्रमांक, तर एम.ए. भाग–२ चा संदीप महल्ले याला प्रोत्साहनपर पारितोषिक प्रदान करुन विजेत्या विद्यार्थ्यांचे उपस्थितांद्वारा अभिनंदन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. के. बी. नायक यांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करतांना भारतीय समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून सशक्त करण्याचे महान कार्य फुले दांपत्याने केले. समाजशास्त्रातील सबाल्टर्न दृष्टिकोनामध्ये सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्या कार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली. सूत्रसंचालन गायत्री खरबडे, तर आभार कु. कल्याणी आसरे हिने मानले. कार्यक्रमाला डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, प्रा. साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, संशोधक विद्यार्थी रमेश पवार तसेच विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी प्रवीण घर्डीणकर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यापीठात महिलांकरिता आरोग्य तपासणी शिबीर संपन्न
## आरोग्य केंद्राचा स्तुत्य उपक्रम




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आरोग्य केंद्राच्यावतीने महिला व विद्यार्थीनींकरिता आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या घेण्यात आले. शिबिरामध्ये बी.पी. ब्लड शुगर, सी.बी.सी., एचबीए वन सी आदी तपासण्या करण्यात आल्या. जवळपास १२० महिलावर्गांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमरावतीच्या प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सोनाली शिरभाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सपना गुप्ता, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांची उपस्थिती होती.

मार्गदर्शन करतांना डॉ. सोनाली शिरभाते म्हणाल्या, कार्यालयात कार्यरत महिला, विद्यार्थीनी, मजूर महिलावर्ग यांनी आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करावा. नियमित योगा, व्यायाम, समतोल आहार तसेच चिंतामुक्त जीवन जगावे. त्याचबरोबर शारीरिक स्वच्छता, नियमित आहार याकडे लक्ष केंद्रीत करावे, जेणेकरुन अनेक आजारांपासून दूर राहता येईल अशी त्यांनी माहिती दिली. याप्रसंगी डॉ. मंगेश मेंढे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील सोयीसुविधांविषयी उपस्थितांना माहिती दिली.

प्रास्ताविकातून आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगितली. सूत्रसंचालन डायबेटिक असोसिएशनचे जनसंपर्क अधिकारी श्री राजेश पिदडी यांनी केले. शिबिराला विद्यापीठातील महिला अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.






आरोग्य तपासणी









# स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रधर्म, म्हणजे कर्मकांड नाही - प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

## विद्यापीठात 'स्वामी विवेकानंदांच्या विचारातून व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटन



विषयाची मांडणी करतांना डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

स्वामी विवेकानंद यांना जो धर्म अपेक्षित आहे, तो पूजापाठ अथवा कर्मकांड नाही, तर राष्ट्र हाच त्यांच्या विचाराचा धर्म होय. ज्या धर्माचा आधार स्वामी विवेकानंद यांनी घेतला तो धर्म म्हणजे कर्म, कर्तव्य होय, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी केले. संत गाडगे बाबा विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वामी विवेकानंदांच्या विचारातून व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. एन.आर. पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. बिसेन म्हणाले, जागृत असलेल्या समाजाचा विकास होत असतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आले आहेत, त्यामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होतील. आपल्या संस्कृतीनुसार धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष याप्रमाणे कामाची प्रगती झाली तर विकास होईल. स्वामी विवेकानंदांची दृष्टी महाविद्यालयीन जीवनापासूनच चिकित्सक होती. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चिकित्सक बनले पाहिजे. आपल्या सभोवताल होणा-या घटनांमुळे स्वत:लाच प्रश्न करता आले पाहिजेत. कितीही संकटे आलीत, तरी सामोरे जा, संघर्ष करा, त्यात यश निश्चितच मिळेल हे त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या एका उदाहरणाव्दारे पटवून दिले. कन्याकुमारी येथे स्वामी विवेकानंद गेले तेव्हा त्यांना तेथील बेटावर पोहत जावे लागले होते,



डॉ. व्ही.एम.मेटकर विचार व्यक्त करतांना



अध्यक्षीय विचार मांडतांना डॉ. नितीन कोळी

असे सांगून आत्मविश्वासाच्या बळावर आपण मोठमोठी संकटे झेलू शकतो, असेही डॉ. बिसेन म्हणाले. अमेरिकेतील शिकागो येथील धर्मपरिषदेसंदर्भातही स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी माहिती दिली. चारित्र्य ही देशाची मोठी संपदा असल्याचे त्यांनी उदाहरणादाखल स्पष्ट करतांना चारित्र्यसंपन्न बना, असा सल्लाही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. समरसता निर्माण करण्यासाठी जातीच्या भिंती तोडा, स्वामी विवेकानंद यांना राष्ट्र हाच एक जात व धर्म होता, असेही डॉ. बिसेन म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, संत विचारातून समाज सुदृढ होईल. आजच्या युवकांना योग्य मार्गदर्शनाची गरज असून देश विश्वगुरू होण्यासाठी विद्यार्थी घडले पाहिजेत. स्वामी विवेकानंद यांनाही अनेक संकटे झेलावी लागलीत. त्यामुळे संकटे पेलता आली पाहिजेत, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी दिला.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. नितीन कोळी म्हणाले, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपण जर मागे राहिलो, तर पुढेही आपण टिकू शकणार नाही. मात्र तंत्रज्ञानाचा जेवढा उपयोग आहे, त्याचा दुरुपयोग आपणच टाळला पाहिजे. केवळ आर्थिकदृष्ट्या विकास पुरेसा नाही, तर जगावर राज्य करता आले पाहिजे आणि तोच सुपरपॉवर ठरेल. सध्याची जगाची स्थिती पाहता, जगाला आज ख–या अर्थाने युध्दाची नाही, तर बुध्दाची गरज आहे, असेही डॉ. कोळी म्हणाले.

संत गाडगे बाबा, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी मांडली. याप्रसंगी स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, ग्रंथभेट व रोख पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. उद्घाटनीय समारंभाला विद्यापीठातील अधिकारी, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपस्थित मान्यवर

# भारताच्या विकासात बुध्द तत्त्वज्ञानाचे मोठे योगदान - डॉ. सागर जाधव

## विद्यापीठात 'भारताच्या सांस्कृतिक विकासात बुध्द धम्माचे योगदान' विषयावर व्याख्यान संपन्न



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लहानपणापासूनच बुध्दाचा प्रभाव होता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच भारताला बुध्दाची ओळख झाली व भारतीय संविधानात बुध्द तत्त्वज्ञानाचा त्यांनी अंतर्भाव केला. त्यामुळेच भारताच्या विकासात बुध्द तत्त्वज्ञानाचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. सागर जाधव यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बुध्दीस्ट स्टडीज सेंटरच्यावतीने आयोजित 'भारताच्या सांस्कृतिक विकासात बुध्द धम्माचे योगदान' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी रासायनिक तंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, बुध्दीज स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. विनोद नागले उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. जाधव म्हणाले, भारतात जनपदं होती, संघराज्य होती. बुध्दाचे चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचल्यानंतर त्यांच्यावर बुध्द तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव झाला आणि शेवटपर्यंत तो राहिला. पटत असेल तरच घ्या, कोणतेही बंधन नाही, संपूर्ण स्वातंत्र्य असा बुध्दाचा धम्म आहे. संचयातून शोषण होते, म्हणून बुध्दांनी आपल्या भिक्खुंना सुध्दा संचय करू दिला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनीही भगवा स्वीकारला होता. डॉ. बाबासाहेब नसते, तर बुध्दाचे तत्त्वज्ञान सुध्दा भारताला माहिती झाले नसते आणि याचे श्रेय सम्राट अशोकाला द्यावे लागेल असे सांगून डॉ. सागर जाधव पुढे म्हणाले, सम्राट अशोक यांनी मोठमोठे शिलालेख लिहून ठेवले होते आणि ब्रिटीश जेव्हा भारतात आले, तेव्हा त्यांना ते शिलालेख सापडले आणि त्यावरून त्यांनी सम्राट अशोकाचा काळ ओळखून बुध्दाचीही भारताला ओळख झाली. सम्राट अशोकाच्या काळात देशाचा जीडीपी ३६ टक्के होता आणि म्हणूनच भारताला सोने की चिडीया म्हटल्या जाते. त्यामुळे सम्राट अशोकाचे देशावर मोठे ऋण आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. अनिल नाईक म्हणाले, आजची जगाची स्थिती पाहता बुध्द तत्त्वज्ञान अधिक महत्वाचे आहे. अहिंसा, करूणा, समानता, अनेक धर्मपरंपरा देशाला लाभली आहे, त्यामुळेच देशात स्थैर्य आहे. नालंदा विद्यापीठात विदेशातील व्यक्ती शिक्षण घ्यायचे. सांची स्तूप देशाचा सांस्कृतिक वारसा जपते आहे, असेही ते म्हणाले.

संत गाडगे बाबा, तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक विनोद नागले यांनी, अतिथींचा परिचय श्री सुधाकर तलवारे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. सुरेश पवार यांनी, तर आभार श्री बापुराव वानखडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, आंबेडकरी चळवळीतील विचारवंत, अभ्यासक, साहित्यिक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. सागर जाधव व्याख्यान देतांना

## तरुणांनो ! कौशल्य आत्मसात करा, त्याशिवाय प्रगती नाही - डॉ.एच.आर. देशमुख संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय

### रोजगार मेळाव्याचे उत्साहात उद्घाटन




डॉ. एच.आर.देशमुख मार्गदर्शन करतांना

वाढत्या तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही, तर कौशल्य अधिक महत्त्वाचे आहे. तरुणांनी रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात केल्याशिवाय प्रगती शक्य नाही, असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एच.आर. देशमुख यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, उपायुक्त श्री.द.ल. ठाकरे, सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, डॉ. प्रशांत शिंगवेकर, टी.सी.एस. चे समन्वयक श्री राहुल पटेल व श्री प्रतीक अग्रवाल उपस्थित होते.

रोजगार मेळाव्यामध्ये ४७७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी २८८ विद्यार्थ्यांनी ॲप्टिट्युड टेस्ट दिली. त्यामधून ३८ विद्यार्थ्यांची रोजगाराकरिता निवड करण्यात आली.

मार्गदर्शन करतांना डॉ.एच.आर. देशमुख पुढे म्हणाले, भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी युवकांनी विविध कौशल्य आत्मसात करण्याची खरी गरज आहे. रोजगारक्षम होण्याकरिता आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी प्राप्त करावीत, असेही ते म्हणाले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी जागतिक परिस्थितीवर भाष्य केले. ते म्हणाले की, जागतिक स्तरावर युद्धाची परिस्थिती आणि आर्थिक अनिश्चितता असतानाही भारत आपली स्थिरता टिकवून आहे, ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. विशेषतः बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. सारख्या पारंपारिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या मेळाव्याच्या माध्यमातून नामवंत कंपन्यांमध्ये करिअर घडवण्याची मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.



डॉ. नितीन कोळी मार्गदर्शन करतांना

**तरुणांनी उद्योजक होण्याचे स्वप्न पहावे – उपायुक्त श्री. द.ल. ठाकरे**

तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता, स्वतःचा लहान का असेना पण उद्योग सुरू करावा आणि उद्योजक होण्याचे स्वप्न उराशी बाळगावे, असे मत उपायुक्त श्री ठाकरे यांनी व्यक्त केले. टाटा कन्सल्टन्सी सद्र्व्हसेस (टी.सी.एस.) हे तरुणांच्या या स्वप्नासाठी एक महत्त्वाचा 'स्प्रिंगबोर्ड' (आधार) ठरू शकतो. या सकारात्मक प्रयत्नांतूनच उद्याचे यशस्वी उद्योजक घडतील, अशी खात्री त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने व विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय डोईजड यांनी, तर आभार सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी मानले



उपस्थित विद्यार्थी तसेच मान्यवर







परिक्षा देतांना विद्यार्थी



# संत गाडगे बाबांच्या विचारातूनच समृद्ध समाज घडेल - अनिल जोशी .. विद्यापीठात 'संत गाडगे बाबांची दशसूत्री व सेवाभावी संस्थांची भूमिका' विषयावर कार्यशाळा संपन्न



प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षीय भाषण करतांना

संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा सुगंध आजही या मातीत दरवळत आहे. त्यांच्या विचारांची दशसूत्री आणि सेवाभावी वृत्ती हाच मानवी जीवनाचा खरा आधार असल्याचे प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी विशेष सचिव श्री अनिल जोशी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'संत गाडगे बाबांची दशसूत्री आणि सेवाभावी संस्थांची भूमिका' या विषयावर आयोजित विशेष कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते.

याप्रसंगी संत गाडगे बाबांच्या विचार व कार्यानुसार कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, नंददीप फाऊंडेशन, संत गाडगे बाबा बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाऊंडेशन, संत गाडगे बाबा जेष्ठ नागरिक संघ, मातोश्री सुशिलाताई वृद्धाश्रम, संत श्री दोला महाराज वृद्धाश्रम, राजीव गांधी कृषी सेवाभावी संस्था, संत गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थांसह श्रीमती डोईफोडे ताई, श्री संदीप चिस्तरकर व अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी श्री अनिल जोशी यांनी गाडगे बाबांच्या आठवणींना उजाळा दिला. ते पुढे म्हणाले, मी याच मातीत वाढलो असून गाडगे बाबांच्या कार्याचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे. पोस्ट विभागात डायरेक्टर फिलाटेली म्हणून कार्यरत असताना गाडगे बाबांच्या नावाने टपाल तिकीट काढण्याची संधी मिळणे, हे माझे भाग्य समजतो. तत्कालीन मंत्री जगमोहनजी, रा.सू. गवई व बबनदादा मेटकर यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. त्यांनी याप्रसंगी गाडगे बाबांच्या 'दशसूत्री' कार्याचे महत्त्व अधोरेखित करुन गाडगेबाबांनी उभारलेले ऋणमोचन येथील घाट, विद्यार्थ्यांसाठी बांधलेली वसतिगृहे आणि त्यांनी हाती घेतलेला स्वच्छतेचा झाडू, हे केवळ स्वच्छतेचे नाही तर मन स्वच्छ करण्याचे प्रतीक होते, असेही त्यांनी सांगितले. श्री संत गाडगे बाबांचे कीर्तन आणि भजन हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम होते. संत गाडगे बाबा हे मास कम्युनिकेशनचे कुलगुरू होते, असे सांगून त्यांनी २० डिसेंबर १९९८ ला गाडगे बाबांवरील पोस्टाची तिकिटे प्रसारित करण्यात आले होती, सात लाख तिकीट छापण्यात आले व पाच लाख कव्हर तयार करण्यात आल्याची त्यांनी याप्रसंगी माहिती दिली.



मार्गदर्शन करतांना श्री अनिल जोशी

डॉ.व्ही.एम. मेटकर म्हणाले, बाबांच्या दशसूत्रीचा प्रसार ही काळाची गरज असून अध्यासनाच्यावतीने सेवाभावी संस्थांचा गौरव आणि कार्यशाळेचे आयोजन करुन त्याची व्यापकता अधिक वाढविण्यात आली आहे. माजी आमदार स्व. बबनराव मेटकर यांच्या पुढाकाराने आणि तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्यामुळे विद्यापीठात अध्यासन केंद्राची स्थापना झाली. समाजातील दुर्लक्षित, अंध आणि अपंग घटकांची सेवा करणाया संस्थांचा विद्यापीठातर्फे श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार देवून गौरव करण्यात येतो. त्यासाठी मेटकर कुटुंबियांनी दाननिधी दिला आहे. संत गाडगे बाबांच्या स्वच्छतेचे विचार सर्वांनी अंगिकारावे आणि समाज विकासामध्ये आपला हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

**दशसूत्री हीच समाजपरिवर्तनाची गुरूकिल्ली : प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे**

अध्यक्षीय भाषणात प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संत गाडगे बाबांनी दिलेली दशसूत्री केवळ शब्दांचा समूह नसून ती निकोप समाजाच्या निर्मितीची गुरूकिल्ली आहे. दशसूत्रीचा आधार घेवून सेवाभावी संस्था खयाअर्थाने बाबांचा वारसा पुढे चालवित आहेत. अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे यांच्या कार्याचे विशेष कौतुक करुन ते पुढे म्हणाले, अध्यासन केंद्र केवळ विद्यापीठापुरतेच मर्यादित न ठेवता बाबांच्या विचार व कार्याचा प्रसार ते देश पातळीवर करीत आहे. दशसूत्रीनुसार समाजाच्या विविध स्तरावर कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना या व्यासपीठावर एकत्र आणून त्यांचा गुणगौरव करणे, खरोखरच अभिनंदनीय बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुस्तक व स्मृतिचिन्ह देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. नंददीप फाऊंडेशनचे श्री संदीप शिंदे यांनी केलेल्या कार्याची चित्रफित तसेच इतर संस्थेच्या कार्याची चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. प्रास्ताविक अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले. संचालन करीत आभार श्री राजेश पिदडी यांनी मानले. कार्यशाळेला साहित्यिक डॉ. सतीश तराळ, डॉ. सुशिल बट्टलवार, श्री बबनराव तोटे, प्राचार्य डॉ. खामरे, प्राचार्य डॉ. दाभाडे तसेच पाचही जिल्ह्यातून साठ संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते


कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात रक्तदान शिबीर संपन्न

## विद्यापीठ आरोग्य केंद्र आणि प्राणिशास्त्र विभाग यांचा संयुक्त उपक्रम



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आरोग्य केंद्र आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, रक्तदान हे श्रेष्ठदान असून सर्वांनी रक्तदान करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. रक्तदान करून आपण एका बाटलीद्वारे तीन लोकांचे प्राण वाचवू शकतो, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक भाषणातून विद्यापीठ आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी रक्तदान शिबीर कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. यावेळी डॉ. सुलभा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन अपेक्षा काळे हिने, तर आभार प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर यांनी मानले.

कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. मिनल मालधुरे, श्री राहूल नरवाडे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. प्रशांत शिंगवेकर, डॉ.व्ही.के. नागले, श्री राजेश पिडडी तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ५२ अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता श्री राजेश पिददी, आरोग्य विभागातील श्री सचिन बाळापुरे व श्री गुल्हाने यांनी अथक परिश्रम घेतलेत.





# विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदव्युत्तर पदविका योगथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा देव संस्कृती विश्वविद्यालय, हरिद्वार येथे अभ्यास दौरा संपन्न




योग निसर्गोपचारचा उद्देश फक्त शिक्षण नसून यामध्ये स्वतः व कुटुंबाचे उत्तम आरोग्य, तथा नैसर्गिक जीवन जगण्यासाठी कार्य करते. या शिक्षणाचा उपयोग रोजगारप्राप्ती, चारित्र्य निर्माण, समाजाविषयी सेवाभाव आणि मुख्य म्हणजे निरोगी व शारीरिकदृष्ट्या चरित्रसंपन्न विद्यार्थी घडावा, जेणेकरून सामर्थ्यवान राष्ट्र निर्माण व्हावे, हा यामागील उद्देश आहे, असे उद्गार देव संस्कृती विद्यापीठाचे प्रतिकुलपती डॉ. चिन्मय पांड्या यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाअंतर्गत येणा–या पदव्युत्तर पदविका योगथेरपी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना योगोपचार चिकित्सा प्रणाली आणि निसर्गोपचाराच्या प्रात्यक्षिकांचे सखोल ज्ञान व्हावे, आधुनिक उपकरणांची माहिती व्हावी या उद्देशाने देवसंस्कृती विश्वविद्यालय, हरिद्वार येथे २४ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान अभ्यास दौ–याचे आयोजन करण्यात आले होते.

गायत्री विद्यापीठ परिसरात पारंपारिक वेशभूषेचे पालन करणे, मौन पाळणे यासारख्या विविध अध्यात्मिक शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. पहाटे ४:३० वाजता गायत्री विद्यापीठ येथे भारतीय परंपरेनुसार सुरू असलेल्या हवनकरिता सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले. हवन ही एक प्राचीन व वैज्ञानिक विधी असून हवन केल्यामुळे वातावरण शुध्द होते व सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन मानसिक शांतता लाभल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला. या अभ्यास दौ–या दरम्यान तीन दिवस विविध सत्रांचे व प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. प्रथम सत्रामध्ये डॉ. ज्ञानेश्वर मिश्रा यांनी गायत्री मंत्राचे वैज्ञानिक परिणाम या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. गायत्री मंत्र हा एक शक्तिशाली मंत्र असून त्याच्या नित्य अभ्यासाने रोगप्रतिकार क्षमता वाढते, ताणतणावासंबंधी आजार कमी होतात तसेच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास देखील मदत होते. द्वितीय सत्रात प्रा. संतोशी शाहू यांनी ॲक्युप्रेशर या विषयावर मार्गदर्शन करताना ॲक्युप्रेशर संबंधित काही महत्त्वपूर्ण बिंदूंबद्दल माहिती देऊन ॲक्युप्रेशर ही विना औषधी चिकित्साप्रणाली म्हणून प्रभावशाली असल्याचे विद्यार्थ्यांना पटवून दिले. तिस–या दिवशीच्या सत्रामध्ये मसाज थेरपी व विविध निसर्गोपचार पद्धतींचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. तसेच योग व निसर्गोपचार या क्षेत्रातील व्याप्ती रोजगाराच्या संधी व विविध चिकित्सा पध्दतींचा अवलंब कसा केला जातो याची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. परमार्थ निकेतन ऋषिकेश येथे योग, ध्यान, पर्यावरण संवर्धन आणि गंगारतीसारख्या सांस्कृतिक उपक्रमांचा अभ्यास या प्रसंगी करुन घेण्यात आला.



देव संस्कृती विश्वविद्यालयातील विविध विभागांना भेट देऊन तेथे सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती देण्याचे तसेच विद्यापीठाच्या विविध अधिका-यांशी चर्चा करून विद्यार्थ्यांना भविष्यात रोजगाराच्या संधीचे नियोजन कसे करता येईल याबद्दलची संपूर्ण माहिती योगथेरपीच्या समन्वयक प्रा. राधिका खडके यांनी करून घेतली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विविध उपक्रमाबाबतची माहिती तसेच देव संस्कृती विश्वविद्यालयातील प्रशिक्षण व अभ्यास सत्रांचे नियोजन प्रा. आदित्य पुंड यांनी केले. या अभ्यासदौ-या दरम्यान प्राचीन योग परंपरेत रुजलेला सात्विक आहार, त्याचे शरीर व मनावर होणारे परिणाम आणि अध्यात्मिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, याकरता डॉ. अनघा देशमुख यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण अभ्यासदौ-या दरम्यान सात्विक आहाराची व्यवस्था करण्यात आली होती. दौ-यादरम्यान मूल्याधारित शिक्षण पध्दती, संशोधनात्मक पध्दती आणि भारतीय संस्कृतीशी संबंधित शैक्षणिक प्रयोग जवळून पाहण्याचा आणि अभ्यासण्याचा व त्यांचा भविष्यात रोजगारनिर्मितीसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची प्रेरणा, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले. हरिद्वार येथील गायत्री योग पीठ येथे सर्व विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. योगथेरपी पदविकेच्या समन्वयक प्रा. राधिका खडके, प्रा. आदित्य पुंड आणि डॉ. अनघा देशमुख यांचे सहाय्य व मार्गदर्शन यामुळे हा अभ्यासदौरा यशस्वी झाला. अभ्यासदौ-याला २७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

# विद्यापीठात 'विद्यार्थी संवाद व गटचर्चा' कार्यक्रम संपन्न
## महिला दिनानिमित्त गृहविज्ञान विभागाचा विद्यार्थी केंद्री उपक्रम


डॉ. वैशाली धनविजय विचार मांडतांना

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृह विज्ञान विभाग व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मास कम्युनिकेशन, अमरावती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी संवाद व गटचर्चा' हा एक अनोखा विद्यार्थी केंद्री उपक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी गृह विज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, प्रमुख अतिथी म्हणून इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मास कम्युनिकेशन येथील प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, डॉ. प्रमोद गायकवाड, जयंत सोनवणे, डॉ. संयोगिता देशमुख उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. विनोद निताळे यांनी महिला व त्यांचे विविध विषयासंदर्भात त्यांच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दृकश्राव्य चित्रफितीमागील प्रक्रिया सांगून उदाहरणांद्वारे माहिती दिली. यावेळी चित्रफितींचे सादरीकरण देखील करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध ॲपचा वापर चित्रण, संवाद, आवाज, संपादन यासाठी करून अतिशय परिणामकारक चित्रफिती सादर करुन चित्रफितींचा विषय व त्या मागची भूमिका यावर चर्चा केली. महिलांचे विश्व, त्यांची क्षमता व उपलब्धी, इतिहासातील व आजच्या काळातील कणखर महिला, महिलांवरचे अत्याचार, महिला खेळाडू, लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर, कुष्ठरोगी महिलांचे परिस्थितीजन्य चित्रण चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सादर केले.

डॉ. आदित्य मिश्रा यांनी उपक्रमाचे कौतूक करीत अशा कार्यक्रमांद्वारे संस्थात्मक आणि विद्यार्थी सुसंवाद, विचारांची देवाणघेवाण आणि विविध विषयाचे पैलू विद्यार्थ्यांना जाणून घेता येतात असे सांगितले. डॉ. प्रमोद गायकवाड यांनी स्त्रीशक्ती यावर कविता सादर केली. एक नारी, सब पे भारी या ओळीचा उलगडा करून सांगितला. त्यासोबतच डॉ. गायकवाड यांनी चित्रफित निर्मितीमागील रूपरेषा समजावून सांगितली. श्री जयंत सोनवणे यांनी चित्रफिती तयार करण्यासाठी आवश्यक व नवनवीन उपलब्ध तंत्रज्ञान विद्यार्थ्यांनी कसे आत्मसात करावे, यावर मार्गदर्शन करतांना समाजमाध्यमांवर प्रभावी जाहिरात करण्यासाठी रोजगार देणारे हे नवीन क्षेत्र असल्यामुळे प्रतिभा आणि कल्पकतेचा मेळ घालून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने चित्रफित निर्मिती क्षेत्रात विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी महिलाविषयक प्रश्नांची जाणीवजागृती केवळ महिला दिनानिमित्त सीमित न राहता लिंग समभाव ठेवून सातत्याने विचार मंचावरून आणि माध्यमांचा अतिशय प्रभावीपणे वापर करून सुधारणावादी धोरणांचा जागर करत रहावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. विभागाचे व इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचे चर्चासत्र झाले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार अनुश्री आडे हिने केले. कार्यक्रमाकरिता विभागातील सुमित गेडाम, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, सुमेध वडुरकर, आयतल कामदार, क्षितिजा वानखडे, भक्ती सोंधिया, श्री अशोक हिरे, श्री वसंत इंगळे, श्री चरणदास जामठे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला शिक्षक तसेच दोन्ही संस्थांमधील विद्यार्थी उपस्थित होते



# विद्यापीठ - महाविद्यालय शैक्षणिक संवाद कार्यक्रम
# रसायनशास्त्र ज्ञान-देवाण-घेवाण व शैक्षणिक संवाद उपक्रम



मार्गदर्शन करतांना डॉ. मनिषा कोडापे

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने दि. ६ मार्च २०२६ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी जी.एस. टोम्पे आर्ट्स, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज, चांदुरबाजार येथे शैक्षणिक संवाद व ज्ञान देवाण–घेवाण उपक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा उद्देश पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये संशोधन अनुभव, वैज्ञानिक कल्पना आणि शैक्षणिक माहितीची देवाण–घेवाण करणे हा होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. मनिषा कोडापे यांच्या हस्ते झाले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील अशा प्रकारच्या संवादामुळे शैक्षणिक आत्मविश्वास वाढतो तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान व संशोधन क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळते, असे सांगितले.

याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील एम.एस्सी. भाग–२ चे विद्यार्थी –कु. श्रावणी ठाकरे, श्री वैभव पवार आणि श्री हकीम नौशाद यांनी आपले अनुभव व ज्ञान विद्यार्थ्यांसोबत शेअर केले. कु. श्रावणी ठाकरे यांनी राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेतील अनुभव तसेच प्रकल्प निवड आणि तयारीची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. वैभव पवार यांनी एआय : ए न्यू सायन्टीफिक इन्स्टुमेंट–पॉवर, प्रॉमिस अॅन्ड लिमिट्स या विषयावर मार्गदर्शन करत आधुनिक वैज्ञानिक संधोधनात, विशेषत: रसायनशास्त्र, कृत्रिम बुध्दीमत्तेचे वाढते महत्व स्पष्ट केले आणि विविध प्रगत एआय मॉडेल्सची माहिती दिली. त्यानंतर श्री हकीम नौशाद यांनी नोटबुक एलएम या साधनाचे प्रात्यक्षिक सादर करुन त्याच्या मदतीने नोट्स तयार करणे, फ्लॅशकार्ड बनवणे आणि ऑडिओ पॉडकास्ट तयार करणे कसे शक्य आहे हे दाखवून दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री भास्करदादा टोम्पे, अध्यक्ष, जी.एस. टोम्पे महाविद्यालय पब्लिक ट्रस्ट यांनी भूषविले. यावेळी डॉ. विजय टोम्पे (सचिव), डॉ. राजेंद्र रामटेके (प्राचार्य), डॉ. नंदकिशोर डी. गव्हाळे (उपप्राचार्य), डॉ. सुमित डी. इंगळे (आयक्युएसी समन्वयक), डॉ. प्रवीण एस. इंगळे (विज्ञान विभागप्रमुख) आणि डॉ. एन.एस. दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमामुळे विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद साधण्याची आणि आधुनिक शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून ज्ञानाची देवाण–घेवाण करण्याची मौल्यवान संधी उपलब्ध झाली.





# चांदुरबाजार येथे महात्मा ज्योतिराव फुले स्मृती व्याख्यानमाला उत्साहात संपन्न

## विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग आणि गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा उपक्रम



अध्यक्षीय भाषण करतांना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे



व्याख्यान देतांना डॉ. किशोर फुले

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग आणि चांदुरबाजार येथील गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा ज्योतिराव फुले स्मृती व्याख्यानमाला महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. किशोर फुले, विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.के.बी. नायक, संस्थेचे अध्यक्ष श्री भास्कर दादा टोम्पे, सचिव डॉ. विजय के. टोम्पे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. किशोर फुले यांनी 'महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे जीवन–रेखाचित्र आणि मौल्यवान कार्य' या विषयावर प्रभावी व्याख्यान दिले. सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणातील अग्रणी कार्याचा त्यांनी विशेष उल्लेख करून फुले दांपत्यांचे भारतीय समाज परिवर्तनातील चळवळींमध्ये मोठे योगदान असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना कुलसचिव, डॉ. अविनाश असनारे यांनी ब्रिटीश राजवटीत भारतीय सामाजिक चळवळींमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा परिवर्तनवादी भूमिकेचा परामर्श घेतांना शिक्षण आणि सामाजिक समतेसाठी फुले दांपत्यांनी मोठे कार्य केले असल्याचे सांगितले. डॉ. के. बी. नायक यांनी भारतीय समाजाचा अभ्यास करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा 'एक अंतर्गत सबालटर्न इतिहास लेखन : उत्तर–मार्क्सवादाच्या दृष्किोनातून' या विषयावर मार्गदर्शन करतांना सामाजिक विषमता, जातीव्यवस्था व शिक्षणातील असमानता या प्रश्नांकडे फुले दांपत्यांच्या विचारांच्या आधारे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गहाळे, सूत्रसंचालन डॉ. सुमित इंगळे, तर आभार महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. शाम येवतीकर यांनी मानले. व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक इतिहास, समता व परिवर्तनवादी विचारांची नवी दिशा मिळाल्याची भावना याप्रसंगी उपस्थितांनी व्यक्त केली. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त बिलासपूर येथे गाडगे बाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांची प्रदर्शनी




संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रसंत शिरोमणी गाडगे बाबा जन्मोत्सव समिती, छत्तीसगड द्वारा २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संत गाडगेबाबा अध्यासन केंद्राच्यावतीने संत गाडगे बाबा यांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनीचे पंडित दीनदयाल उपाध्याय ऑडिटोरियम, जीई रोड, रायपूर, छत्तीसगड येथे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनीचे उद्घाटन प्रसंगी श्रीविष्णू देव साय, मुख्यमंत्री, छत्तीसगड, श्री अरुण सावजी, उपमुख्यमंत्री छत्तीसगड, पद्मश्री श्री रामलाल बरेठ, श्री ब्राजमोहन अग्रवाल, खासदार रायपूर, श्री राजेश मनोज, आमदार पश्चिम रायपूर, श्री सुनील सोनी, आमदार दक्षिण रायपूर श्रीमती मीनल चौबे, महापौर, रायपूर, श्री तुलसी कौशिक, खाजगी सहाय्यक, मुख्यमंत्री छत्तीसगड, बजरंग रजत, बिलासपूर, गाडगे बाबांचे नातू श्री उमेश जानोरकर आदी उपस्थित होते. संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. दिलीप काळे, यांनी अतिथींना गाडगे बाबांचे कार्य तसेच अध्यासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणा–या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी छत्तीसगड प्रदेशातील रजक समाजाचे महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बैसवारा रजक समाज व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित देवकीनंदन दीक्षित सभागृह लालबहादूर शास्त्री शाळेचे मैदान बिलासपूर, छत्तीसगड येथे जयंत्युत्सव, वधू – वर परिचय मेळावा व संत गाडगे बाबा यंच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी बिलासपूरचे आमदार व माजी मंत्री श्री अमर अग्रवाल, आमदार श्री सुशांत शुक्ला, श्री प्रल्हाद रजक, राज्यमंत्री छत्तीसगड, रजतकार विकास बोर्ड पद्मश्री श्री रामलाल बरेठ, श्री तुलसी कौशिक, खाजगी सहाय्यक मुख्यमंत्री छत्तीसगड, श्रीमती पुजा विधानी, महापौर बिलासपूर महानगरपालिका, श्री निलेश रजक, अध्यक्ष बिलासपूर, रजक समाज, डॉ. दिलीप काळे, संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, तसेच बिलासपूर, रायपूर, दुर्ग, राजनांदगाव, भिलाई येथील रजक समाजाचे अध्यक्ष उपस्थित होते.








बैसवारा रजक समाज
बैसवारा रजक समाज




बेसवारा रजक समाज
बेसवारा रजक समाज



# विद्यापीठ सुध्दा कर्मचा-यांच्या ऋणात राहील - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
# विद्यापीठातील कर्मचा-यांना सेवानिवृत्तीप्रसंगी सन्मानपूर्वक निरोप

निष्ठा हा कर्मचा–यांना विद्यापीठाशी जोडणारा समान धागा आहे. प्रत्येक कर्मचा–यांनी विद्यापीठाला प्रदिर्घ सेवा दिली आहे. समर्पण, त्याग, श्रध्दा, प्रामाणिकपणा या भावनेने कर्मचा–यांनी जी सेवा दिली, त्यात विद्यापीठ सुध्दा ऋणी राहील, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एच. नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री अनिल काळबांडे, सौ. काळबांडे, श्री अनिल काळे, सौ. काळे, श्री माधव वारके, सौ. वारके, श्री मुरलीधर चिलुरकार, सौ. चिलुरकार, श्री किशोर गजघुमे, सौ. गजघुमे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, देश, राज्याचे जसे वैविध्यपूर्ण असे वैशिष्ट्य आहे, तसेच आपल्या विद्यापीठाचे आहे व कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य, निष्ठेने काम करतात. कर्मचा–यांच्या अशाच प्रामाणिकपणा व निष्ठा यामुळे कर्मचा–यांनी सुध्दा आपल्या कुटुंबाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली आहे व त्यांच्या प्रामाणिकपणा आणि निष्ठेमुळे त्यांच्या कुटुंबातील मुलांनी सुध्दा प्रगती साधली आहे, असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्वश्री अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव वारके, मुरलीधर चिलुरकार व किशोर गजघुमे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर सौ. काळबांडे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील यांनी, सौ. काळे यांचा सौ. मिनल मालधुरे, सौ. वारके यांचा डॉ. सुलभा पाटील, सौ. चिलुरकर यांचा सौ. प्रज्ञा बोंडे व सौ. गजघुमे यांचा सौ. राजश्री देसली यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. व्ही.एच. नागरे म्हणाले, विद्यापीठातील कर्मचारी अतिशय प्रामाणिक व निष्ठावंत असून जेथे आपण काम करतो ती आपली ख–या अर्थाने भाकरी असते व प्रामाणिकपणे आपण तेथे काम करीत असतो. विद्यापीठाचे कुलगुरू सुध्दा आपल्या कर्मचा–यांच्या खंबीरपणे पाठीशी असतात आणि कर्मचारी सुध्दा आपली कामे नियमाच्या अधीन राहुनच करतात. कर्मचारी आपल्या पगारातून निवृत्त होत असतो, मात्र कर्तव्यातून नाही, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी नियंत्रण अधिकारी डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी सत्कारमूर्तींच्या सेवाकाळातील कार्याची प्रशंसा करुन सर्वांना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. तर सत्कारमूर्ती सर्वश्री अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव वारके, मुरलीधर चिलुरकार, किशोर गजघुमे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सेवाकाळात सहका–यांकडून मिळालेला आदर, स्नेहभाव याबद्दल आभार व्यक्त केले. विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव डॉ. श्रीकांत तायडे, श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



डॉ. व्ही.एच. नागरे मार्गदर्शन करतांना



सेवानिवृत्त श्री किशोर गजधुमे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सेवानिवृत्त श्री मुरलीधर चिलुरकार यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सेवानिवृत्त श्री अनिल काळे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सेवानिवृत्त श्री अनिल काळबांडे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सेवानिवृत्त श्री माधव वारके यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

# वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र येथे क्षेत्रभेट




क्षेत्रभेट प्रसंग

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रम चालवण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अमरावतीतील बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र येथे क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांचा लिंगभाव दृष्टीकोनातून अभ्यास करता यावा तसेच व्यावहारिक बाजूंचे आकलन व्हावे, या उद्देशाने ही क्षेत्रभेट देण्यात आली.

यावेळी बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे संचालक तथा सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत देशमुख यांची भेट घेण्यात आली. बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राच्या संकल्पनेविषयी त्यांनी माहिती दिली. केंद्राअंतर्गत कार्य करणारे समुपदेशक शरद मानकर, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रश्मी, मीनल भेंडे, जया राघोर्ते, सोनाली राणे यांनी केंद्राची कार्यपद्धती आणि परिसराची माहिती दिली. यावेळी शरद मानकर यांनी केंद्राची पार्श्वभूमी स्पष्ट करून आजवर केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचा परिचय दिला. समाजात वाढत्या व्यसनाधिनतेमुळे कुटुंब आणि समाजाचे स्वास्थ बिघडत आहे. व्यसनाच्या आहारी गेलेली व्यक्ती स्वत:साठी तर समस्या निर्माण करतोच, मात्र त्यामुळे त्याचे संपूर्ण कुटुंब आणि समाजातील विविध घटकांनाही त्रास सहन करावा लागतो. अशावेळी योग्य उपचाराच्या आधारे अशा व्यक्तींना व्यसनमुक्त करता येऊ शकते. त्यासाठी मागील अनेक वर्षांपासून बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र कार्य करीत आहे. आज समाजात मोबाईलच्या व्यसनासारखे अनेक नवीन व्यसनाचे प्रकार वाढत आहेत. अशावेळी व्यक्तीला त्यातून वाचवण्यासाठी केंद्राद्वारे प्रयत्न करण्यात येतात. सोबतच मानसोपचार देखील करण्यात येतात. समाजातील वाढत्या ताणतणावांमुळे मानसिक तणाव निर्माण होऊन अनेक मानसिक समस्या निर्माण होत आहेत, त्या स्वाभाविक असतात. समाजाने त्याकडे नकारात्मक न बघता त्यांचा स्वीकार करून त्यावर आवश्यक उपचार घेण्यावर भर दिला पाहिजे. केंद्राच्या माध्यमातून त्यासाठीही कार्य केले जाते, अशी माहिती शरद मानकर यांसह केंद्रातील इतर समुपदेशकांनी दिली.

या क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी लिंगभाव दृष्टीकोनातून केंद्राच्या कार्यप्रणालीविषयी विविध प्रश्न विचारले. त्या प्रश्नांना समुपदेशकांनी समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी वुमेन्स स्टडीज सेंटरचे डॉ. भगवान फाळके, प्रा. पूजा अलोने, डॉ. मनीषा इंगळकर, सारिका देशमुख यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

✻ क्रीडा विशेष ✻

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अवदेश प्रतापसिंह युनिर्व्हसिटी, रेवा येथे ०२ ते ०५ एप्रिल, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो–खो (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची कु. वैष्णवी ढोके, कु. सलोनी खंडारे, कु. धर्ती मोहोड व कु. तनिषा सवई, एल.बी. अणे महिला महाविद्यालय, यवतमाळची कु. प्रिती धाकरगे, कु. वेदिका काळे व कु. भूमिका कोडपकवार, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. श्रध्दा नागदेवे, कु. साक्षी वानखडे व कु. पल्लवी पारडे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. दिव्या सावरकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीची कु. सनिका सोलेव, कु. नेहा अटाळकर व कु. प्रियंका दहिहांडे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराची कु. वैष्णवी मस्के व कु. ज्ञानेश्वरी वानखडे, शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांवची कु. अवंतिका वासनिक, स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठची कु. रेशमा गजभिये, कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकळची कु. वैष्णवी मुकुंद आणि बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडाची कु. स्वाती पळसकर हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ०२ ते ०६ एप्रिल, २०२६ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो–खो (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा भूषण गेडाम, कुणाल शिखरे, यश सदांशिव, कौशिक गेहलोत व प्रथमेश माहोरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचा रोहण बरकरे, आदित्य राऊत, सुबोध धंदर व राधेय अकर्ते, स्व. एन.ए. देशमुख महाविद्यालय, चांदुरबाजारचा मयुर खंडारे, स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचा अंकुश शिरसाट, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगांवचा ओम देशमुख व तेजस भालेराव, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूरचा सुफियान खान पठाण व रोहण मेश्राम, महात्मा फुले महाविद्यालय, अमरावतीचा आदित्य नागदिवे, कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकळचा आयुष बोरखडे, कला महाविद्यालय, बुलडाणाचा ज्ञानेश्वर चिमकुरे, आर.ए. महाविद्यालय, वाशिमचा साहील राऊत आणि जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा अशोक नागले याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

## अ.भा. आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

चंदिगड युनिर्व्हसिटी, मोहाली (पंजाब) येथे १८ ते २२ मार्च, २०२६ दरम्यान होणा–या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युडो (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये बी.बी. आर्टसब, एन.बी. कॉमर्स ॲन्ड बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रसचा सागर जाधव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा ओमसिंह चौहाण, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा वेध बुंदेले व जी.एस. टोम्पे मगाविद्यालय, चांदुरबाजारचा यश पिढेकर याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

## विद्यापीठात भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांची पुण्यतीथी 'शहीद दिन' म्हणून संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य युध्दातील योध्दा तसेच थोर क्रांतीकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांचा शहीद दिन विद्यापीठात संपन्न झाला. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. शहीद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांच्याबद्दल विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी माहिती दिली. शहीद दिन कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठात माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव साक्षी ठाकुर, प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन व यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

प्रतिदिन अखबार

# विद्यापीठ : मराठी भाषा गौरव दिवस पर व्याख्यान संपन्न

## व्याख्याता डॉ.विनोद कोलवाडकर की उपस्थिति



प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 28 फरवरी- संगाबा अमरावती विद्यापीठ के स्नातकोत्तर मराठी विभाग व विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती के संयुक्त तत्वावधान में मराठी भाषा गौरव दिन पर 'महाभारत के कृष्ण' इस विषय पर विशेष व्याख्यान का आयोजन किया गया था.

इस अवसर पर बोलते हुए व्याख्याता डॉ.कोलवाडकर ने कहा कि सज्जनों की रक्षा, दुष्टों का विनाश और धर्म की संस्थापना करने के लिए ही भगवान श्रीकृष्ण का जन्म हुआ था. इस प्रसंग पर बतौर प्रमुख अतिथि दै.हिंदुस्थान के प्रबंध संपादक तथा विदर्भ साहित्य संघ के शाखा के अध्यक्ष विलास मराठे, मराठी विभाग प्रमुख डॉ.मोना चिमोटे उपस्थित थी. अपने अध्यक्षीय संबोधन में कुलगुरु डॉ.बारहाते ने कहा कि आज की युवा पीढ़ी को मराठी भाषा को निम्न स्तर की नहीं समझना चाहिए, बल्कि उसके प्रति अभिमान रखकर उसे व्यवहार में उपयोग में लाना चाहिए. आज समाज में आक्रमण और कॉन्वेंट संस्कृति के कारण अपनी युवा मराठी पीढ़ी मराठी से दूर होती जा रही है. अनेकों बार मराठी कार्यक्रमों में भी वक्ता मराठी की बजाए अंग्रेजी का उपयोग करते है. यह खेदजनक बात है. पालकों को अपने बच्चों को घर पर मराठी बोलने की आदत लगानी चाहिए, ताकि उन्हें अपनी मातृभाषा के प्रति गर्व हो. प्रारंभ में संताजी व कवि शिरवाडकर के तैलचित्र का पूजन, माल्यार्पण मान्यवरों के हस्ते किया गया. पश्चात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत से कार्यक्रम प्रारंभ हुआ. विभाग प्रमुख डॉ.मोना चिमोटे ने कार्यक्रम के आयोजन की भूमिका विशद की.

कार्यक्रम में कुलगुरु के हस्ते मराठी विभाग से नेटसेट परीक्षा उत्तीर्ण नितिन चव्हाण, शिशिरधा सोनोने, नीतेश कुमरे, श्वेता खडसे का आचार्य पदवी प्राप्त करने पर अतिथियों के हस्ते सत्कार किया गया. संचालन डॉ.अभिजीत इंगले तथा आभार प्रदर्शन अंशदायी शिक्षक अमृता राऊत ने किया. कार्यक्रम में विद्यापीठ के पीआरओ डॉ.नांदुरकर, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तथा नागरिक बड़ी संख्या में उपस्थित थे.

वृत्त केसरी

## श्री संत गाडगेबाबा सामाजिक कार्य पुरस्कार

# दिव्या फाऊंडेशन व मनीष पावडे यांना प्रदान



प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती, २८ फेब्रुवारी - पुरस्कार दिल्यानंतर आपले कार्य संपले असे नाही, तर समाजघटकांनीही सामाजिक कार्यामध्ये आपला सहभाग द्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांनी केले. २०२५ यावर्षीचा नागोराव जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा श्रीसंत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात बुलडाणा जिल्ह्यातील वरवंड येथील दिव्या फाऊंडेशनला व व्यक्ती गटात अमरावती शहरातील श्री मनिष रमेशराव पावडे यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ससन्मान प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते.

यावेळी कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांनी दिव्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अशोक काकडे व समाजसेवक मनीष पावडे यांचा स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रु. पाच हजार रोख देऊन सन्मान केला. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, दानदात्यांचे प्रतिनिधी व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे समन्वयक श्री दिलीप काळे, दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक काकडे, समाजसेवक मनीष पावडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक काकडे यांनी संस्था उभारणीचा मागोवा घेतला. प्रास्ताविकातून कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांनी दिव्या फाऊंडेशन व मनीष पावडे यांच्या कार्याची माहिती दिली. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदुरकर तर आभार जनसंपर्क विभागातील ओम जगताप यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, ॲड.यदुराज मेटकर, डॉ. एम.टी.देशमुख, सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, अभिनंदन पेंढारी, मुंधडा, शाम देशमुख, दीपक हुंडीकर, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, संजय जैन, पावडे, काकडे व मेटकर कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

दैनिक भास्कर

# रक्तदान श्रेष्ठदान है, सदैव करते रहें : डॉ. बारहाते

▪ विश्वविद्यालय के स्वास्थ्य केंद्र और प्राणी विज्ञान विभाग का संयुक्त उपक्रम



भास्कर डेस्क | अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में स्वास्थ्य केंद्र और प्राणी विज्ञान विभाग के सहयोग से रक्तदान शिविर का आयोजन किया गया। विश्वविद्यालय के कुलपति डॉ. मिलिंद बारहाते और उपकुलपति डॉ. सुलभा पाटील इस अवसर पर उपस्थित थे। शिविर में विद्यापीठ के कर्मचारियों और अधिकारियों ने मिलकर 52 से अधिक यूनिट बोतल रक्त जमा हुआ।

इस अवसर पर मार्गदर्शन देते हुए कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने कहा कि रक्तदान सर्वश्रेष्ठ दान है और उन्होंने सभी से इस अवसर पर रक्तदान करने की अपील की। उन्होंने यह भी कहा कि रक्तदान करके हम एक बोतल से तीन लोगों की जान बचा सकते हैं। अपने परिचयात्मक भाषण में विश्वविद्यालय की स्वास्थ्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात ने रक्तदान शिविर कार्यक्रम के उद्देश्य को समझाया। डॉ. सुलभा पाटील ने इस अवसर पर अपने विचार व्यक्त किए। अपेक्षा काले ने संचालन किया, जबकि प्राणिशास्त्र विभाग की प्रमुख डॉ. हेमलता नंदुरकर ने धन्यवाद प्रस्ताव रखा। इस कार्यक्रम में परीक्षा एवं मूल्यांकन बोर्ड के निदेशक डॉ. नितिन कोली, भौतिकी विभाग के प्रमुख डॉ. संदीप वाघुले, कुलपति श्रीमती मोनाली तोते पाटील, श्रीमती मिनल मालधुरे, राहुल नरवाडे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. प्रशांत शिंगवेकर, डॉ. वी.के. नागले, राजेश पिदड़ी तथा विश्वविद्यालय के बड़ी संख्या में शिक्षक, अधिकारी, कर्मचारी और छात्र उपस्थित थे। इस अवसर पर 52 अधिकारियों, कर्मचारियों और छात्रों ने रक्तदान किया। स्वास्थ्य विभाग के श्री राजेश पिड्डी, श्री सचिन बालापुरे और गुल्हाने ने कार्यक्रम की सफलता के लिए अथक प्रयास किया।

दैनिक दिव्य मराठी

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात रक्तदान शिबिर

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आरोग्य केंद्र आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ५२ अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, रक्तदान हे श्रेष्ठदान असून सर्वांनी रक्तदान करण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. रक्तदान करून आपण एका बाटलीद्वारे तीन लोकांचे प्राण वाचवू शकतो, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक भाषणातून विद्यापीठ आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी रक्तदान शिबीर कार्यक्रमामागील भूमिका विषद केली.यावेळी डॉ. सुलभा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन अपेक्षा काळे हिने तर आभार प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, उपकुलसचिव मोनाली तोटे पाटील, मिनल मालधुरे, राहूल नरवाडे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. प्रशांत शिंगवेकर, डॉ.व्ही.के. नागले, राजेश पिडडी तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ५२ अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता राजेश पिडडी, आरोग्य विभागातील सचिन बाळापुरे व गुल्हाने यांनी अथक परिश्रम घेतले.

## अमरावती इव्हिनिंग

# विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने तपोवन येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



अमरावती दि.४- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने तपोवन येथील महामना मालवीय विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त रासायनिक प्रात्यक्षिकांद्वारे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विदर्भ महारोगी संस्था व पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या कार्याची माहिती घेतली.

तपोवन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई यांनी हृदयस्पर्शी भाषणातून पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या महान कार्याचा प्रेरणादायी आढावा घेतला. ते पुढे म्हणाले, कुष्ठरोग्यांसाठी आयुष्य समर्पित करणारे डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे केवळ वैद्यक तज्ज्ञ नव्हतो, तर मानवतेचे पुजारी होते. त्यांनी कुष्ठरोग्यांना समाजात सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. स्वातंत्र्य संग्रामातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. एखाद्या कुष्ठरुग्णाच्या चेहऱ्यावर हास्य उमटवू शकलो, तर तेच माझ्यासाठी मोठे पारितोषिक आहे, हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला. कुष्ठरोग एक वैद्यकीय समस्या आहे, हा त्यांचा संदेश विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आला. कुष्ठरोग्यांसाठी देशातील पहिली शाळा स्थापन करून डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी कुष्ठरुग्णांच्या पाल्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध रासायनिक प्रयोग सादर करून शाळेतील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पना सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. विद्यार्थिनींनी महान महिला वैज्ञानिकांच्या वेशभूषेत सहभाग घेतला, त्यामध्ये कु. रेणुका नाले हिने बी. विजयालक्ष्मी, तर कु. वैष्णवी शुक्ला हिने मेरी क्यूरी यांची भूमिका साकारली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत समारंभाने झाली. तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या जीवनकार्यावर लिहिलेली पुस्तके देऊन डॉ. मनिषा कोडापे, डॉ. जागृती बारब्दे, डॉ. जयंत वडतकर, डॉ. स्वाती गडवे, अनघा घुरडे यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे सचिव श्री सहदेव गोळे उपस्थित होते. सूत्रसंचालन व तपोवन संस्थेचा परिचय संस्थेचे सहसचिव श्री ऋषिकेश देशपांडे यांनी करून दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला तपोवन संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सहकारी व पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## नवभारत

# संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार प्रदान

## सामाजिक दायित्व निभाने का आह्वान



■ अमरावती, ब्यूरो. नागोराव जयराम मेटकर की स्मृति में वर्ष 2025 का संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था एवं व्यक्तिगत श्रेणी में प्रदान किया गया. संस्था श्रेणी में बुलढाना जिले के वरवंड स्थित दिव्या फाउंडेशन तथा व्यक्तिगत श्रेणी में अमरावती शहर के समाजसेवी मनीष रमेशराव पावडे को सम्मानित किया गया. इस अवसर पर अध्यक्षीय संबोधन में डॉ. मिलिंद बारहाते ने कहा कि केवल पुरस्कार देकर दायित्व समाप्त नहीं हो जाता, बल्कि समाज के प्रत्येक घटक को सामाजिक कार्य में सक्रिय सहभाग देना चाहिए. उन्होंने कहा कि पहले केवल एक ही पुरस्कार दिया जाता था, किंतु संस्था और व्यक्ति के कार्य में अंतर को ध्यान में रखते हुए व्यक्तिगत श्रेणी की शुरुआत की गई, जो आज सार्थक सिद्ध हो रही है. विश्वविद्यालय सामाजिक कार्यकर्ताओं के साथ सदैव खड़ा रहेगा. दिव्या फाउंडेशन के संस्थापक अध्यक्ष अशोक काकडे एवं समाजसेवी मनीष पावडे को शाल, श्रीफल, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तथा पाँच हजार रुपये नकद देकर सम्मानित किया गया.

## अमरावती इव्हिनिंग

# वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र येथे क्षेत्रभेट




अमरावती दि. ०६- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रम चालवण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अमरावतीतील बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र येथे क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांना सामाजिक समस्यांचा लिंगभाव दृष्टीकोनातून अभ्यास करता यावा तसेच व्यावहारिक बाजूंचे आकलन व्हावे, या उद्देशाने ही क्षेत्रभेट देण्यात आली.

यावेळी बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे संचालक तथा सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत देशमुख यांची भेट घेण्यात आली. बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राच्या संकल्पनेविषयी त्यांनी माहिती दिली. केंद्राअंतर्गत कार्य करणारे समुपदेशक शरद मानकर, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रश्मी, मीनल भेंडे, जया राघोर्ते, सोनाली राणे केंद्राची कार्यपद्धती आणि परिसराची माहिती दिली. यावेळी शरद मानकर यांनी केंद्राची पार्श्वभूमी स्पष्ट करून आजवर केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचा परिचय दिला. समाजात वाढत्या व्यसनाधिनतेमुळे कुटुंब आणि समाजाचे स्वास्थ्य बिघडत आहे. व्यसनाच्या आहारी गेलेली व्यक्ती स्वतःसाठी तर समस्या निर्माण करतोच, मात्र त्यामुळे त्याचे संपूर्ण कुटुंब आणि समाजातील विविध घटकांनाही त्रास सहन करावा लागतो. अशावेळी योग्य उपचाराच्या आधारे अशा व्यक्तींना व्यसनमुक्त करता येऊ शकते. त्यासाठी मागील अनेक वर्षांपासून बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र कार्य करीत आहे. आज समाजात मोबाईलच्या व्यसनासारखे अनेक नवीन व्यसनाचे प्रकार वाढत आहेत. अशावेळी व्यक्तीला त्यातून वाचवण्यासाठी केंद्राद्वारे प्रयत्न करण्यात येतात. सोबतच मानसोपचार देखील करण्यात येतात. समाजातील वाढत्या ताणतणावांमुळे मानसिक तणाव निर्माण होऊन अनेक मानसिक समस्या निर्माण होत आहेत, त्या स्वाभाविक असतात. समाजाने त्याकडे नकारात्मक न बघता त्यांचा स्वीकार करून त्यावर आवश्यक उपचार घेण्यावर भर दिला पाहिजे. केंद्राच्या माध्यमातून त्यासाठीही कार्य केले जाते, अशी माहिती शरद मानकर यांसह केंद्रातील इतर समुपदेशकांनी दिली.

या क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी लिंगभाव दृष्टीकोनातून केंद्राच्या कार्यप्रणालीविषयी विविध प्रश्न विचारले. त्या प्रश्नांना समुपदेशकांनी समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी वुमेन्स स्टडीज सेंटरचे डॉ. भगवान फाळके, प्रा. पूजा अलोने, डॉ. मनीषा इंगळकर, सारिका देशमुख यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

---

दिव्य मराठी | अमरावती, [illegible]

मार्गदर्शन • बीजभाषक डॉ. जे.व्ही. पवार : विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात मांडले आधुनिक डिजिटल इंडियाचे मुख्य उद्दिष्ट

# जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण अनिवार्य

प्रतिनिधी | अमरावती



विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात उपस्थित असलेले मान्यवर.

### डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक, आर्थिक विचार प्रासंगिक

[illegible]

आपली मातृभूमि

# दाजीसाहेबांचे कार्य, तपोवनचा संघर्ष बघून विद्यार्थी गहिवरले

## तपोवनला विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची भेट

प्रतिनिधी/८ मार्च

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र पदव्युत्तर विभागाच्या ५० विद्यार्थ्यांनी नुकताच डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनला भेट दिली. तपोभूमी मधील कुष्ठरुग्ण अनाथ परितक्त्या महिला आदिवासी मुलांसाठी चालविले जाणारे उपक्रम आणि संस्थेसमोर असलेली आव्हाने ऐकून विद्यार्थी वर्ग गहिवरले. निमित्त होते विज्ञान दिवसाचे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदे च्या सदस्या डॉ. मनीषा कोडापे यांच्या पुढाकाराने पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी स्थापन केलेल्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन मागील ८० वर्षापासून सुरू असलेले कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसन कार्यासोबतच अनाथ परितक्त्या महिलांचा विकास महामना मालवीय विद्यालयाच्या माध्यमातून गरीब अनाथ व आदिवासी मुलांसाठी शिक्षणाचे प्रयोग केले जात असून महामना मालवीय विद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनाचे प्रयोग आणि माहिती देण्यासाठी पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थ्यांनी तपोवनला भेट दिली. त्यांच्यासोबत विद्यापीठ सिनेटच्या सदस्य प्रा. डॉ. भाग्यश्री बारब्दे पर्यावरण तज्ञ डॉ. जयंत वडतकर उपस्थित होते. तपोवन मध्ये सुरू असलेले उपक्रम तेथील वृद्धाश्रम महिलांच्या चित्तथरारक कथा, संस्थेसमोर दररोज कुष्ठ बांधवांच्या विकासासाठी येणाऱ्या समस्या याबाबत तपोवन चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी सविस्तर माहिती दिली.



जनमाध्यम

# जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण अनिवार्य-बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार

## विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

अमरावती/का.प्र.

समाजातील जातीभेद मुळापासून उखडून टाकण्यासाठी रक्तसंकर हाच एकमेव प्रभावी मार्ग असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखनातून जातिभेदाच्या निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाहांना दिलेले महत्त्व व केवळ प्रेमाच्या नावाखाली होणारे विवाह नव्हे, तर जातींची चढ उतरलेली चौकट मोडण्यासाठी दोन भिन्न जातींमधील रक्तसंबंधांचे एकत्रीकरण होणे अनिवार्य असल्याचे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील प्रसिद्ध विचारवंत व चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग आणि नागपूरच्या राणा महाविद्यालय, बडनेरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक दृष्टिकोन : आधुनिक भारताची निर्मिती आणि त्याची समकालीन प्रासंगिकता' या विषयावर बीजभाषण करताना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य विद्यापीठ, महू चे कुलगुरू डॉ. रामदास आत्राम, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. सिकची, श्री गजानन महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आशिष मालू, प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे, आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

चर्चासत्राचे उद्घाटन झाल्याची घोषणा करून डॉ. रामदास आत्राम म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक क्षेत्रातील विचार आणि त्यांनी मांडलेले विकासाचे दृष्टिकोन आजही आधुनिक भारतीय धोरणांचा पाया ठरत आहेत. शिक्षणामुळे केवळ गतिशीलता वाढत नाही, तर पिढ्यानपिढ्या चालत आलेली विषमता मोडीत निघण्यासाठी मदत होते, असेही ते म्हणाले. डॉ. आशिष मालू म्हणाले, शिक्षण क्षेत्रातील त्यांची ही वाटचाल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. आजचे स्टार्टअप, नाविन्यपूर्ण कल्पना आणि आत्मनिर्भरतेचे स्वप्न हे डॉ. आंबेडकरांनी दशकांपूर्वी मांडलेल्या विचारांचेच आधुनिक रूप आहे. याप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर. डी. सिकची यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, बीजभाषक डॉ. जे. व्ही. पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, आर्थिक विचार प्रकर्षाने मांडले. प्रास्ताविकातून डॉ. संतोष बनसोड यांनी चर्चासत्र आयोजनामागील भूमिका मांडली. त्यानंतर पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. गोपाल वैराळे यांनी केले. याप्रसंगी १३८ शोधनिबंधांच्या संपादकीय संग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

संचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी, तर आभार प्राचार्य डॉ. मनिष सिरसाट यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, आंबेडकरी चळवळीतील गणमान्य नागरिक, शिक्षक, अभ्यासक, साहित्यिक, विद्यार्थी उपस्थित होते.



**नवभारत**

# पुरस्कार से सांगलूदकर कालेज सम्मानित



## 5 वर्षों में 4070 वृक्षों का रोपण

■ दर्यापूर (सं). संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ने पर्यावरण संरक्षण, जैवविविधता संवर्धन और स्वच्छता अभियान जैसे उपक्रमों के लिए 2019 से 2023 तक किए गए कार्यों को देखते हुए जे. डी. पाटील सांगलूदकर महाविद्यालय को 2024 का पर्यावरण पुरस्कार प्रदान किया. महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अतुल बोडखे को यह पुरस्कार डॉ. महेंद्र ढोरे, प्र-कुलगुरु, अमरावती विद्यापीठ के हाथों दिया गया. महाविद्यालय ने 5 वर्षों में 4070 वृक्षों की रोपण, स्वच्छता अभियान, प्लास्टिक मुक्त अभियान, जलसंवर्धन और सौर ऊर्जा परियोजना जैसे कई महत्वपूर्ण पर्यावरणीय कार्यों को लागू किया. इसके अलावा, बोलके झाड जैसे अभिनव उपक्रम के तहत ॲप के माध्यम से वृक्षों के बारे में जानकारी दी जा रही है. महाविद्यालय के इस उत्कृष्ट कार्य को देखकर विद्यापीठ ने उसे इस सम्मान से नवाजा है.

**वृत्त केसरी**

» चिखलदऱ्यात राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर

# व्यसनाधिनता, सायबर फसवणुकीपासून सावध रहा





## विशेष पोलीस महानिरिक्षक रामनाथ पोकळे यांचे आवाहन

प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, १मार्च: छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे साहसाचे प्रतीक आहे. त्यांनी त्या काळात अफाट धाडस दाखवून गडकिल्ले बांधले आणि आरमाराची स्थापना केली. हाच वारसा जपण्यासाठी आजच्या तरुणांनी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी व्यसनाधिनतेपासून दूर रहा, सायबर फसवणुकीपासून सावध रहा, असा सल्ला अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक रामनाथ पोकळे यांनी युवकांना दिला. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने 7 ते 11 मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक रामदास पोकळे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय, मुंबई येथील राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी डॉ. मिलींद काळे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, सौ. स्वाती पोकळे, रा.से.यो.चे संचालक डॉ. निलेश कडु, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर तसेच पाचही जिल्हांचे रासेयोचे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

## डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. वर्षा वाडेगावकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



अमरावती : संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठात कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते उपस्थित होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अर्चना बोंडे, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती माजी प्र-कुलगुरु व जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, वर्षा वाडेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांनी डॉ. प्रसाद वाडेगावकर, डॉ. वर्षा वाडेगावकर यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला, तर डॉ. वर्षा वाडेगावकर यांना डॉ. स्वाती शेरेकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्तींचा [illegible] व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले.

## तरुण भारत



दीप प्रज्वलन करताना कुलगुरू डॉ. बारहाते, उपस्थित रामनाथ पोकळे व अन्य

# व्यसनाधिनता, सायबर फसवणुकीपासून सावध राहा

### विशेष पोलिस महानिरीक्षकांचे आवाहन

### राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे उद्‌घाटन

◆ अमरावती, ९ मार्च

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे साहसाचे प्रतीक आहे. त्यांनी त्या काळात अफाट धाडस दाखवून गडकिल्ले बांधले आणि आरमाराची स्थापना केली. हाच वारसा जपण्यासाठी आजच्या तरुणांनी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी व्यसनाधिनतेपासून दूर रहा, सायबर फसवणुकीपासून सावध राहा, असा सल्ला अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी युवकांना दिला.

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व अमरावती विद्यापीठातर्फे ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्‌घाटन रामदास पोकळे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना कक्षातील राज्य संपर्क अधिकारी डॉ. मिलींद काळे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, स्वाती पोकळे, रा.से.यो.चे संचालक डॉ. नीतेश कढू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर तसेच पाचही जिल्ह्यांचे रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते. रामनाथ पोकळे म्हणाले, महाराष्ट्रातही ड्रग्जचे जाळे पसरत असून, तरुण पिढी या विळख्यात अडकत आहे. अमली पदार्थांमुळे केवळ एका व्यक्तीचे वा कुटुंबाचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण पिढी उद्ध्वस्त होऊन देशाच्या प्रगतीला खीळ बसते. हा धोका लक्षात घेता रासेयोच्या स्वयंसेवकांनी समाजात याविषयी जनजागृती करावी. सायबर फसवणुकीचे प्रमाण आज मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. २०२२ मध्ये भारतात २२०० कोटी रुपयांची सायबर फसवणूक झाली होती, जी २०२५ पर्यंत २० हजार कोटींच्या पुढे गेली आहे. सोशल मीडियाचा वापर करताना आपण अनवधानाने अनेक परवानग्या देतो, ज्यामुळे आपली खाजगी माहिती असुरक्षित होते. फेसबुक, इंस्टाग्रामसारख्या ॲप्समुळे आपण आपल्या हालचालींवर स्वतःच 'सीसीटीव्ही' लावून घेतल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

(तरुण भारत सेवा)

## दैनिक भास्कर

# राष्ट्रीय एकता शिविर में अमरावती विद्यापीठ अव्वल

**12 में से 8 कलाओं में मारा मैदान**

भास्कर डेस्क| अमरावती. कर्नाटक के सैयपूर स्थित आदिकवि श्री महर्षि वाल्मीकि विश्वविद्यालय में आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिविर में संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय की एनएसएस टीम ने 12 में से 8 कला प्रकारों में प्रथम स्थान प्राप्त किया। छह राज्यों के 150 प्रतिभागियों वाले इस शिविर में अमरावती विश्वविद्यालय के 10 स्वयंसेवकों ने भाग लिया। टीम ने कल्चरल, मोनो एक्टिंग, सिंगिंग, इस्ट्रूमेंट, स्किट, इंडियन फेस्टिवल, इंडियन फोक डांस और प्रोसेशन में प्रथम स्थान हासिल किया। सिंगिंग स्पर्धा में पोवाड़ा प्रस्तुति के लिए टीम को 11 हजार रुपये का नकद पुरस्कार भी मिला। सफलता पर कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने टीम व मैनेजर डॉ. स्वप्निल गोरे को बधाई दी। इस अवसर पर प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व एनएसएस संचालक डॉ. निलेश कढू उपस्थित थे।



# तरूणांनो ! व्यसनाधिनता आणि सायबर फसवणुकीपासून सावध रहा

### पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांचे आवाहन

प्रतिनिधी/९ मार्च





पुण्य नगरी

## अमरावती विद्यापीठ आठ कला प्रकारांमध्ये प्रथम



अमरावती : भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार महर्षी वाल्मिकी युनिव्हर्सिटी, रायचूर (कर्नाटक) येथे नुकतेच राष्ट्रीय एकात्मता शिबीर पार पडले. या राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूने १२ पैकी ८ कला प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकविला आहे. शिबिरामध्ये सहा राज्यांच्या विविध विद्यापीठांतील एकूण १५० स्पर्धक सहभागी झाले होते. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील १० स्वयंसेवक व चमू व्यवस्थापक सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूला १२ कलाप्रकारापैकी कल्चरल, मोनो ॲक्टींग, सिंगिग, इन्स्ट्रुमेंट, स्कीट, इंडियन फेस्टिव्हल, इंडियन फोक डान्स, प्रोसेशन या आठ कलाप्रकारामध्ये प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. चमूमध्ये ऋषिकेश खरडे, कमलेश तंतरपाळे, प्रणव अरुणे, ओम पवार, जय चक्रेश्वर, भक्ती गायकवाड, सागर आठवले, सुहानी राठोड, राधिका पांडव, साक्षी स्वर्गीय यांचा समावेश होता.

लोकमत

## राष्ट्रीय एकात्मता शिबिरात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आठ कला प्रकारामध्ये प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क



अमरावती : भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार आदिकवी श्री महर्षी वाल्मिकी युनिव्हर्सिटी, रायचूर (कर्नाटक) येथे नुकतेच राष्ट्रीय एकात्मता शिबिर पार पडले. या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूने बारा पैकी आठ कला प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

शिबिरामध्ये सहा राज्यांच्या विविध विद्यापीठांतील एकूण १५० स्पर्धक सहभागी झाले होते. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील १० स्वयंसेवक (५ मुले व ५ मुली) व चमू व्यवस्थापक सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूला १२ कलाप्रकारांपैकी कल्चरल, मोनो ॲक्टिंग, सिंगिंग, इन्स्ट्रुमेंट, स्कीट, इंडियन फेस्टिव्हल, इंडियन फोक डान्स, प्रोसेशन या आठ कलाप्रकारामध्ये प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. याशिवाय सिंगिंग इव्हेंटमध्ये सादर केलेल्या पोवाड्यास ११ हजाराचा रोख पुरस्कार प्राप्त झाला.

चमूमध्ये अकोला श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील ऋषिकेश खरडे, मोर्शी भारतीय महाविद्यालयातील कमलेश तंतरपाळे, यवतमाळ सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयातील प्रणय अरुणे, नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिडचा ओम पवार, अमरावती शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील जय चक्रेश्वर, भारतीय महाविद्यालयातील भक्ती गायकवाड, श्री तुळशीरामजी जाधव कला आणि विज्ञान महाविद्यालय, वाशिमचा सागर आठवले, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळची सुहानी राठोड, श्री पुंडलीक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वेची राधिका पांडव व शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीची साक्षी स्वर्गीय यांचा सहभाग होता.

विदर्भ मतदार

## पाली आणि बुद्धीझम विभाग



नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. १० : श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत पाली आणि बुद्धीझम विभागातर्फे जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन प्रा. डॉ. रेखा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख मार्गदर्शक प्रणिता रक्षित, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. रत्नशिल खोब्रागडे, निर्मल काळवांडे, प्रा. डॉ. टी.बी. रामटेके, डी.व्ही. रोकडे, ॲड. सुधाकर पाटील, संजय घरडे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

वर्तमान परिप्रेक्ष्यात थेरीगाथा ते सावित्रीबाई फुले यांचा महिलावरील प्रभाव या विषयावर प्रणिता रक्षित यांनी विचार मांडले. प्रा डॉ. रत्नशिल खोब्रागडे, निर्मल काळवांडे, यांनी विचार मांडले. प्रा. डॉ. वानखडे यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रास्ताविक डी.व्ही. रोकडे, सूत्रसंचालन प्रा. अनिता निर्गुळे यांनी केले तर प्रा. सपना मेश्राम यांनी आभार मानले.

प्रा. कल्पना डोंगरे, प्रा. एसकुमार मेश्राम, प्रा. कल्पना पाटील, प्रा.डॉ. कमलाकर गोवर्धन, प्रा. सुरेश पवार यांच्यासह उमेश शहारे, प्रा वाल्मीक डवले, लक्ष्मणराव कोरे, प्रा. शिवदास आढाऊ, डॉ. अरुण रौराळे, ॲड. रवींद्र आंबुलकर, डॉ श्रीकांत बनसोड, अविनाश गोंडाने, नीलिमा गाडे, विना थोरात, योगिता थोटे, अशोक भोरे, सुनीता भोरे, करुणा मोहाडे, डॉ. विजया मुळे, वर्षा लोणारे, देवानंद डोंगरे, चंद्रशेखर चतुर, अनिल हिरेखन, मनोज पाटील, भंते शिलवंसलंकार, देविदास मेटांगे, प्रा. मनिषा लाकडे, प्रज्ञा सरदार, विनोद खाकसे, धनराज शंकरपाळे, सुबोध काळे, दिपाली गवई, सुनील वंजारी, सुषमा बागडे, कल्पना शिरसाट, किरण शिंदे, वैशाली कांबळे, रंजना ताकसांडे, रसिका तायडे, रंजना नगराळे, जिवनेताई इत्यादी विद्यार्थी उपस्थित होते.

दिव्य मराठी, अमरावती, बुधवार, १२ मार्च २०२६ | २

उपक्रम • विशेष पोलिस महानिरिक्षक रामनाथ पोकळे यांचे तरुणांना आवाहन : चिखलदरा येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर

# व्यसनाधिनता, सायबर फसवणुकीपासून सावध राहा

प्रतिनिधी | अमरावती

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे साहसाचे प्रतीक आहे. [illegible]



व्यसनाधिनता, सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला.

## साहसी वृत्तीसोबतच समाजसेवेचा वसा जपा : कुलगुरू

[illegible]

वृत्त केसरी

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 390.16 कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

➔ अर्थसंकल्पात 76.2 कोटीची तूट ➔ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली सभा

प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, ११ मार्च: संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 2026-27 या 390.16 कोटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे यांनी हा अर्थसंकल्प अधिसभेमध्ये सादर केला. अर्थसंकल्पात 314.14 कोटी रुपये प्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून 76.2 कोटी रुपयाची तूट यामध्ये दर्शविण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृति अधिसभा सभागृहामध्ये बुधवारी अधिसभेची बैठक संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तर सभागृहात सर्व सन्माननीय अधिसभा सदस्य उपस्थित होते.

सन 2026-27 या अर्थसंकल्प एकूण तीन भागात विभागलेला आहे. परिरक्षण, विकास आणि स्वतंत्र प्रकल्प/योजना/सहयोग कार्यक्रम अनुदाने या तीन शीर्षात विभागलेला असून परिरक्षणासाठी 205.40 कोटी, विकासाकरिता 54.10 कोटी, स्वतंत्र प्रकल्प/योजनांकरिता 130.66 कोटी रुपयाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. विद्यापीठाला केंद्र शासन, राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून अनुदान व विविध शुल्क प्राप्त होत असते. यावर्षी अंदाजित एकूण प्राप्ती 314.14 कोटी रुपये होणार असल्याचा अंदाज अंदाजपत्रकात नमूद करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीय वर्षामध्ये 74 कोटी 26 लक्ष 50 हजार एवढ्या अनुदान प्राप्तीचा/ तर 76 कोटी 28 लक्ष 26 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे 2026-27 या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये परीक्षा शुल्कापासून 56 कोटी, 38 लक्ष इतक्या शुल्कप्राप्तीचा तर परीक्षेसाठी 60 कोटी 73 लक्ष 50 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पदव्युत्तर शैक्षणिक विभागास अर्थसंकल्पीय वर्षात 4 कोटी 26 लक्ष 24 हजार एवढ्या शुल्कप्राप्तीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच खर्चाकरिता 5 कोटी 39 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. ज्ञानस्रोत केंद्रासाठी अर्थसंकल्पीय वर्षात पाक्षिके, नियतकालिके तसेच प्रशासकीय खर्चासाठी रुपये 1 कोटी 19 लक्ष 45 हजार एवढी तरतूद करण्यात आली आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये 4 कोटी 1 लक्ष 44 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सर्वसामान्य सेवा व प्रशासकीय [illegible] या अर्थसंकल्पीय वर्षात रु. 54 कोटी 63 लक्ष 11 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विद्यार्थी [illegible] व विद्यार्थी विकास निधी अंतर्गत 86 लक्ष 13 हजार, शिक्षक व कर्मचारी कल्याण निधीकरिता 66 लक्ष 13 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. आकस्मिक निधीसाठी रु. 1 कोटी 3 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. विद्यार्थी सुरक्षा निधी, दान निधी, संत गाडगे बाबा अध्यासन निधी, कुलगुरू निधी आणि रु. 1 कोटी 8 लक्ष 5 हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. विकासासाठी रु. 41 कोटी 39 हजार एवढी तरतूद प्रस्तावित केली आहे.





विद्यापीठाने निकाय निधी उभारलेला असून या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये 1 कोटी 51 लक्ष निधी जमा होईल. प्रसारा निधीमध्ये या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये प्रत्येकी 15 कोटी 10 लक्ष एवढा निधी जमा होईल असा अंदाज आहे. स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदानातंर्गत या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये रुपये 130 कोटी 49 लक्ष 70 हजार एवढ्या अनुदान प्राप्तीचा अंदाज असून 130 कोटी 65 लक्ष 73 इतक्या खर्चाचा अंदाज आहे.

पुण्य नगरी

# अमरावती विद्यापीठाचा ३९०.१६ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## अर्थसंकल्पात ७६.२ कोटींची तूट

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा २०२६-२७ चा ३९०.१६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प बुधवारी (११ मार्च) अधिसभेत मंजूर करण्यात आला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अविनाश बोर्डे यांनी हा अर्थसंकल्प अधिसभेमध्ये सादर केला. दरम्यान, अर्थसंकल्पात ३१४.१४ कोटी रुपये प्राप्तीचा अंदान व्यक्त करण्यात आला असून, ७६.२ कोटी रुपयांची तुट यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेखली अधिसभेची बैठक झाली. या अर्थसंकल्पात परिरक्षणासाठी २०५.४० कोटी, विकासाकरिता ५४.१० कोटी, स्वतंत्र प्रकल्प/योजनांकरिता १३०.६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विविध माध्यमातून यावर्षी अंदाजित एकूण प्राप्ती ३१४.१४ कोटी रुपये होणार असल्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ४ कोटी १ लाख ४४ हजार रुपयांच्या खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थी परिषद कार्यक्रम व विद्यार्थी विकास निधी अंतर्गत ८६ लाख १३ हजार, शिक्षक व कर्मचारी कल्याण निधीकरिता ६६ लाख १३ हजार खर्चाचा अंदाज आहे. विद्यार्थी सुरक्षा विमा निधी, दान निधी, संत गाडगे बाबा अध्यासन निधी, युएसआर निधी अंतर्गत १ कोटी ८ लाख ५ हजार एवढ्या खर्चाचा अंदाज आहे. बुधवारी सायंकाळी उशिरापर्यंत या अर्थसंकल्पावर चर्चा सुरू होती. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते.

### अर्थसंकल्पातील काही प्रमुख तरतुदी

परीक्षा सुधारणासाठी ११ कोटी रुपये, कुलगुरू फेलोशिप पुरस्कारासाठी ५ लाख, इक्वल अपॉर्च्युनिटी सेल १ कोटी ७१ लाख २६ हजार आणि प्रशिक्षण, उद्योजकता विकास, कौशल्य विकास, संशोधन आदींसाठी ८८ लाख २५ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रातील औषधोपचारांसाठी ७ लाख ५० हजार रुपये, विद्यापीठ स्तरावरील संशोधन निधी योजनेसाठी ५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नेट कोचिंग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासाठी प्रत्येकी दोन लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी सुरक्षा विम्यासाठी ६० लाख १ हजार रुपये, प्रशिक्षण व उद्योजकता विकास आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलकरिता १९ लाख ८० हजार रुपये, संशोधक आणि विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सुविधांसाठी २ कोटी १९ लाख रुपये, बुलढाणा येथील आदर्श पदवी महाविद्यालयाच्या आवर्ती खर्चासाठी १ कोटी ६३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



**दैनिक भास्कर**




# योग थेरेपी पाठ्यक्रम के विद्यार्थियों ने देव संस्कृति विद्यापीठ का किया दौरा

- योगोपचार, प्राकृतिक चिकित्सा पद्धतियों, आधुनिक उपकरणों की ली जानकारी

**भास्कर डेस्क। अमरावती.** संत गाड़गेबाबा अमरावती विश्वविद्यालय के आजीवन अध्ययन व विस्तार विभाग के अंतर्गत संचालित स्नातकोत्तर डिप्लोमा योगथेरपी पाठ्यक्रम के विद्यार्थियों का अध्ययन दौरा देव संस्कृति विश्वविद्यालय हरिद्वार में गत दिनों अध्ययन दौरा किया गया। इस दौरान विद्यार्थियों को योगोपचार, प्राकृतिक चिकित्सा पद्धतियों, आधुनिक उपकरणों और व्यावहारिक प्रशिक्षण की विस्तृत जानकारी दी गई।

विश्वविद्यालय के प्रतिकुलपति डॉ. चिन्मय पांडा ने विद्यार्थियों को संबोधित करते हुए कहा कि योग और प्राकृतिक चिकित्सा का उद्देश्य केवल शिक्षा नहीं, बल्कि स्वस्थ जीवनशैली, चरित्र निर्माण और समाजसेवा की भावना विकसित करना है। अध्ययन दौरे के दौरान विद्यार्थियों ने हवन, योग, ध्यान, एक्यूप्रेशर, मसाज थेरेपी तथा विभिन्न प्राकृतिक चिकित्सा पद्धतियों का प्रशिक्षण लिया। साथ ही विद्यार्थियों ने परमार्थ निकेतन में योग, ध्यान, पर्यावरण संरक्षण और गंगा आरती जैसे सांस्कृतिक कार्यक्रमों का भी अध्ययन किया। यह अध्ययन दौरा कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते की प्रेरणा और विभागीय संचालक डॉ. श्रीकांत पाटील के मार्गदर्शन में आयोजित किया गया। कार्यक्रम के समन्वयक प्रा. राधिका खडके, प्रा.आदित्य पुंड और डॉ. अनघा देशमुख के सहयोग से दौरा सफल रहा, जिसमें 27 विद्यार्थी शामिल हुए।

**जनमाध्यम**

# विद्यापीठामध्ये महिला दिनानिमित्त 'महिला स्टार्टअप्स'चा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, रसायनशास्त्र विभाग व इंटरनॅशनल ह्युमन राईटस् वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला स्टार्टअप्सचा सत्कार सोहळा इन्क्युबेशन सेंटर येथे झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून जाधव लेर्निंग प्रा. लि. च्या सीईओ कशिषा जाधव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते महिला-नेतृत्वाखालील स्टार्टअप्स एन.के. बायोसेफ प्रा. लि. च्या संचालक साक्षी बंड, लॉक पुवर आयडिया प्रा.लि. च्या संचालक योगिता पवार, मोरया अँड रिसर्च नॅनो बायोटेक प्रा.लि. च्या संचालक सुनिता बनसोड, फ्लेव्होटेस् फुड इंडस्ट्रिज प्रा. लि. च्या संचालक कुमुदिनी इंगळे, बायो निर्मित प्रा. लि. च्या संचालक देवयानी गोळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांचे विद्यापीठातील योगदान व कार्याच्या पार्श्वभूमीवर गौरव करण्यात आला.



प्रमुख अतिथी व जाधव लेर्निंग प्रा. लि. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी कशिषा जाधव मार्गदर्शन करतांना महिला उद्योजकांनी नेटवर्किंग, मार्केटिंग यावर भर द्यावा आणि एकमेकांच्या सहयोगाने मार्गक्रमण करावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी महिला उद्योजकांचे महत्व अधोरेखित करतांना नव्या पिढीतील महिलांनी स्टार्टअप व नवोपक्रम क्षेत्रात पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी डॉ. मनिषा कोडापे यांनीही आपले विचार व्यक्त केले. महिला उद्योजिकांनी आपापल्या स्टार्टअपबद्दल माहिती देत आपले अनुभव कथन केले. सुमेन अँन्ड चाईल्ड वेल्फेअर सेल, अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. सुयोग अद्वैत पानट यांनी इंटरनॅशनल ह्युमन राईटस् वेल्फेअर असोसिएशन विषयी माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या आगमन व पुष्पगुच्छ देऊन स्वागताने झाली. इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी स्वागतपर भाषणातून इन्क्युबेशन सेंटरच्या कार्याचा आढावा मांडला. संचालन अमोल हिरुळकर, आभार सेंटरचे सीईओ आनंद यादव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नरेश मोवळे, रवी ढेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश यावले, प्रज्वल वानखडे, इंटरनॅशनल ह्युमन राईटस् वेल्फेअर असोसिएशनचे राजेश इजवे यांनी अथक परिश्रम घेतले.

दिव्य मराठी, अमरावती. शुक्रवार, १३ मार्च २०२६ | २

कार्यक्रम • विद्यापीठात महिला दिन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन

# सावित्रीबाईंनी अन्यायकारक प्रथेविरुद्ध दिलेला लढा निबंधामधून अधोरेखित

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक महिला दिन तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा असे विविध कार्यक्रम झाले. महिला सक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजपरिवर्तनात स्त्रियांची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यु. राऊत उपस्थित होते.

'स्त्री शिक्षणाची जननी : सावित्रीबाई फुले' या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून सावित्रीबाई यांच्या कार्याचा अभ्यासपूर्ण आढावा आपल्या निबंधांमधून मांडला. स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य, समाजातील अन्यायकारक प्रथांविरुद्ध



निबंध स्पर्धेत विजेते विद्यार्थी मान्यवरांसह उपस्थित आदी.

दिलेला लढा तसेच सामाजिक समतेसाठी त्यांनी उभारलेले आंदोलन यांचे विविध पैलू आपल्या लेखनातून विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडले. निबंध स्पर्धेत एम.ए. भाग-१ ची विद्यार्थीनी मयुरी गायकवाडने प्रथम, एम.ए. भाग-२ ची विद्यार्थीनी गायत्री खरबडेने द्वितीय, एम.ए. भाग-१ ची विद्यार्थीनी निर्मल काळेने तृतीय क्रमांक, तर एम.ए. भाग-२ चा विद्यार्थी संदीप महल्ले याला प्रोत्साहनपर पारितोषिक प्रदान करून विजेत्या विद्यार्थ्यांचे उपस्थितांद्वारा अभिनंदन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. के. बी. नायक यांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करतांना भारतीय समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून सशक्त करण्याचे महान कार्य फुले दांपत्याने केले. समाजशास्त्रातील सबाल्टर्न दृष्टिकोनामध्ये सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्या कार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने करण्यात आली.

## विद्यार्थ्यांनी मांडले विचार

समाजपरिवर्तनात स्त्रीयांची एकूणच भूमिका व शिक्षणाचे महत्व याबाबत सुरेख सांगड घालत विद्यार्थ्यांनी समाजातील काही कुप्रथांवर लेखनाच्या माध्यमातून कुठाराघात केला. महिला या चुल व मुल यापलिकडे जाऊन स्वत:च्या कर्तृत्वाचा विशेष ठसा जगभरात उमटवत आहेत. भारतातील महिलांच्या शिक्षणाचा पाया घालणाऱ्या सावित्रीबाईंनी जो लढा दिला त्याला काही अंशी वर्तमान काळातील महिला या न्याय देत असल्याचे मतही लेखनासह वक्तृत्वाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मांडले. महिला या सध्या काय करीत आहेत, त्यांनी कशाप्रकारे स्वत:चे अस्तित्व निर्माण केले हे देखील लेखनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अधोरेखित केले.

सूत्रसंचालन गायत्री खरबडे, तर आभार कल्याणी आसरे हिने मानले. कार्यक्रमाला डॉ. प्रशांत भगत, डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, प्रा. साधना इंगोले, प्रा. सुनिता इंगळे, संशोधक विद्यार्थी रमेश पवार आदी उपस्थित होते.

नवभारत

# शिविर में 120 महिलाओं की स्वास्थ्य जाच

## संगाबा विवि में हुआ आयोजन

■ अमरावती, ब्यूरो. संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के स्वास्थ्य केंद्र द्वारा महिलाओं और छात्राओं के लिए स्वास्थ्य जांच शिविर लिया गया. शिविर में बीपी, ब्लड शुगर, सीबीसी जैसी महत्वपूर्ण स्वास्थ्य जांच की गई. लगभग 120 महिलाओं ने शिविर का लाभ उठाया. अध्यक्षता प्राणीशास्त्र विभाग की प्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर ने की. जबकि प्रमुख



मार्गदर्शक के रूप में डॉ. सोनाली शिरभाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटिल, चिकित्सा अधिकारी डॉ. सपना गुप्ता, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, और स्वास्थ्य केंद्र की स्वास्थ्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात उपस्थित थीं. डॉ. सोनाली शिरभाते ने कहा कि कार्यालय में काम करने वाली महिलाएं, छात्राएं और श्रमिक महिलाओं को अपनी जीवनशैली में बदलाव लाना चाहिए. नियमित योग, व्यायाम, संतुलित आहार और तनावमुक्त जीवन जीने से कई बीमारियों से बचा जा सकता है. इसके साथ ही शारीरिक स्वच्छता और नियमित आहार पर भी ध्यान केंद्रित करना जरूरी है. डॉ. मंगेश मेंढे ने सुपर स्पेशलिटी अस्पताल की सुविधाओं के बारे में उपस्थित लोगों को जानकारी दी. शिविर की शुरुआत में स्वास्थ्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात ने महिलाओं के स्वास्थ्य जांच शिविर के आयोजन के महत्व के बारे में बताया. संचालन राजेश पिंदडी ने किया.

# पुण्य नगरी

## विद्यापीठात माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव साक्षी ठाकूर, प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी केले.

# संक्षिप्त



## विद्यापीठात महिलांकरिता आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती**- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आरोग्य केंद्राच्यावतीने महिला व विद्यार्थीनींकरिता आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या घेण्यात आले. शिबिरामध्ये बी.पी. ब्लड शुगर, सी.बी.सी., एचबीए वन सी आदी तपासण्या करण्यात आल्या. जवळपास १२० महिलावर्गांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमरावतीच्या प्रसिध्द स्त्रीरोग तज्ञ डॉ. सोनाली शिरभाते, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सपना गुप्ता, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करतांना डॉ. सोनाली शिरभाते म्हणाल्या, याप्रसंगी डॉ. मंगेश मेंढे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील सोयीसुविधांविषयी उपस्थितांना माहिती दिली. प्रास्ताविकातून आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगितली. सूत्रसंचालन डायबेटिक असोसिएशनचे जनसंपर्क अधिकारी राजेश पिदडी यांनी केले. शिबिराला विद्यापीठातील महिला अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नवराष्ट्र

### विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचे नाव राज्यभरात झाले उज्ज्वल

## राज्यस्तरीय स्पर्धेत राम रोडे प्रथम

▸ अमरावती, ब्युरो. छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या डिप्लेक्स या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थी राम अशोकराव रोडे याने उल्लेखनीय यश संपादन करत सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्याच्या या यशामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचे नाव राज्यभरात उज्ज्वल झाले.

या स्पर्धेची निवड प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडली. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून आपल्या प्रकल्पाची माहिती सादर केली. दुसऱ्या टप्प्यात विविध भागांमध्ये प्रादेशिक फेरी घेण्यात आली. त्यानंतर अंतिम फेरीमध्ये सेफ्टी थीम अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रातून राम रोडे व चमूची निवड करण्यात आली. हा प्रकल्प जीपीएस आणि जीएसएम तंत्रज्ञानावर आधारित महिला सुरक्षा उपकरण असून, आजच्या युगामध्ये महिला सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे यंत्र ठरेल.



### सेफ्टी थीममध्ये कामगिरी

या उपकरणामध्ये आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी, यासाठी जीपीएसच्या माध्यमातून अचूक स्थान शोधणे आणि जीएसएमद्वारे कुटुंबीय किंवा पोलिसांना संदेश पाठवण्याची सुविधा देण्यात आली. तसेच स्वसंरक्षणासाठी इलेक्ट्रिक शॉक फिचर देखील या उपकरणामध्ये समाविष्ट करण्यात आले. या प्रकल्पाची कल्पकता, तांत्रिक रचना आणि समाजोपयोगी स्वरूप लक्षात घेऊन परीक्षकांनी त्यांना सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक देऊन गौरविले. दरम्यान, ६ व ८ मार्च रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात डिप्लेक्स-२०२५ अंतर्गत राज्यस्तरीय सिम्पोजियम देखील आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा, आय-हब गुजरातचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरण्या महंता यांनी इन्क्युबेशन सेंटरद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, स्टार्टअप्स व उद्योजकता वाढीसाठी केलेल्या कार्यांचे विशेष कौतुक केले. या योगदानाबद्दल आनंद यादव व नरेश मोकळे यांनी सन्मानचिन्ह स्वीकारले.

# दैनिक दिव्य मराठी

## विद्यापीठामध्ये महिला दिन; महिला स्टार्टअप्सचा करण्यात आला सत्कार



अमरावती | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन, रसायन शास्त्र विभाग व इंटरनॅशनल ह्युमन राईट्स् वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला स्टार्टअप्सचा सत्कार सोहळा इन्क्युबेशन सेंटर येथे उत्साहात झाला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रमुख अतिथी करिश्मा जाधव, डॉ. मनिषा कोडापे, डॉ. स्वाती शेलकर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते महिला-नेतृत्वाखालील स्टार्टअप्स साक्षी वंड, योगिता पवार, सुनिता बनसोड, कुमुदिनी ढाले, देवयानी मोळे यांचा सत्कार करण्यात आला.

सकाळ

# समाजऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करा

## पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे : विद्यापीठात उन्नत भारत अभियान कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. १३ : केवळ वैयक्तिक प्रगती किंवा नोकरी करून पोटाची भूक भागेल, पण त्यापलीकडे असलेल्या समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी तरुणांनी कंबर कसली पाहिजे. आव्हानांना न घाबरता त्यांना सामोरे जा, तरच समाज परिवर्तनाचे स्वप्न साकार होईल, असे प्रेरणादायी आवाहन पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात रसायनिक तंत्रशास्त्र विभाग व पूर्णशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित उन्नत भारत अभियान अंतर्गत आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, रसायनिक तंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, उन्नत भारत अभियानचे समन्वयक डॉ. मनोज कुंभारे उपस्थित होते.

डॉ. कोल्हे यांनी यावेळी आपल्या ४० वर्षांच्या मेळघाटातील सामाजिक संघर्षाचा आणि प्रवासाचा पट विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांनी सांगितले



अमरावती : विद्यार्थिनीला पारितोषिक देतांना पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व अन्य मान्यवर.

### समाजातील शेवटच्या घटकाचे प्रश्न समजून घ्या

■ विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान आणि पदवी मिळविण्यावर समाधान मानू नये. समाजातील शेवटच्या घटकाचे प्रश्न समजून घेऊन ते सोडवण्यासाठी प्रयत्न करणे हीच खरी प्रगल्भता आहे. ''उन्नत भारत अभियान'' हे केवळ एक अभियान नसून विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

की, त्यांच्या विद्यार्थी दशेतील गटाचे नाव सुरुवातीला ''संघर्ष'' होते, मात्र शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते ''संवाद'' असे झाले. हा बदल संघर्षाकडून समन्वयाकडे जाण्याचा प्रवास दर्शवतो. उन्नत भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी पाच गावे दत्तक घेऊन तेथील प्रश्नांची सोडवणूक करावी. विशेषत: मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि अंधश्रद्धा यांसारख्या प्रश्नांवर विद्यापीठ स्तरावरून संशोधन आणि प्रत्यक्ष कामाची गरज त्यांनी व्यक्त केली. बैरागडसारख्या दुर्गम भागात पत्नीसह राहून जल योजना राबवणे, कृषी विद्यापीठाच्या मदतीने शेतीचे प्रश्न सोडवणे आणि अंधश्रद्धा निर्मूलन करणे हे मोठे आव्हान होते. एकेकाळी जिथे प्राण्यांचे बळी दिले जात होते, तिथे आज गाडगे बाबांच्या प्रेरणेने ''प्राण्यांना अभय'' दिले जाते, असे त्यांनी अभिमानाने सांगितले.

प्रास्ताविक उन्नत भारत अभियानचे समन्वयक परिचय डॉ. मनोज कुंभारे यांनी करून दिला. यावेळी उन्नत भारत अभियानांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिके प्रदान करण्यात आली.

सूत्रसंचालन प्रा. तृप्ती बारबुद्धे यांनी, तर आभार डॉ. पी.के. वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाला रसायनिक तंत्रशास्त्र विभागातली डॉ. ए.एल. राठोड, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच उन्नत भारत अभियानचे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व समन्वयक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विदर्भ मतदार

## राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचा समारोप उत्साहात

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ठरले उत्कृष्ट विद्यापीठ

### मेळघाटातील निसर्ग अनुभव युवकांसाठी एक जीवनदायी शिक्षण - डॉ. रवींद्र कडू

अमरावती (प्रतिनिधी) दि.१४ : निसर्ग आणि मानवाचे नाते उलगडण्यासाठी ट्रेकिंग हे एक उत्तम माध्यम असून, त्यातून मिळणारा अनुभव हा खऱ्या अर्थाने जीवनाचे शिक्षण देणारा असतो, असे प्रतिपादन राज्यपाल नामीत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू यांनी साहसी क्रीडा शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात केले. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, सुप्रसिद्ध आर्किटेक्ट उमेश पाटणकर, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदराचे वनपरिक्षेत्र अधिकारी राघवेंद्र मुन



व सौ. वंदना मुन तसेच पाचही जिल्ह्यांचे रा.से.यो. चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.


पाच दिवस चाललेल्या या साहसी क्रीडाशिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध ऍक्टिव्हिटी मध्ये सहभाग घेतला होता. यामध्ये विद्यार्थ्यांचा ऍडव्हेंचर प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग, सांस्कृतिक सहभाग, शिस्त व वागणूक आणि लेखी परीक्षा या प्रकारावर मूल्यांकन करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांनी उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार पटकाविला, तसेच उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. सचिन चव्हाण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व प्रा. अर्चना श्रीश्रिया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रथमेश घाटे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी व रंजित जाधव मुंबई विद्यापीठ, कु. श्रुष्टि राणे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कु. पायल तिवारी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच १९ विद्यापीठातील सहभागी कार्यक्रम अधिकाऱ्यांचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ऍडव्हेंचर हब चे मनीष ढाकुलकर व त्यांच्या संपूर्ण टीम चे देखील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

वृत्त केसरी

उन्नत भारत अभियान कार्यशाळेचे उद्घाटन

# तरुणांनो, आव्हानांना न घाबरता सामोरे जा



## डॉ. रवींद्र कोल्हे यांचे आवाहन

प्रतिनिधी/ वृत्त केसरी

अमरावती, १५ मार्च: केवळ वैयक्तिक प्रगती किंवा नोकरी करून पोटाची भूक भागेल, पण त्यापलीकडे असलेल्या समाजाच्या प्रश्नातून मुक्त होण्यासाठी तरुणांनी कंबर कसली पाहिजे. आव्हानांना न घाबरता त्यांना सामोरे जा, तरच समाज परिवर्तनाचे स्वप्न साकार होईल, असे आवाहन पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात रासायनिक तंत्रशास्त्र विभाग व भूगर्भशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित उन्नत भारत अभियान अंतर्गत आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, रासायनिक तंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, उन्नत भारत अभियानचे



समन्वयक डॉ. मनोज कुंभारे उपस्थित होते. डॉ. कोल्हे यांनी आपल्या ४० वर्षांच्या मेळघाटातील सामाजिक संघर्षांचा आणि प्रवासाचा पट विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या विद्यार्थी दशेतील गटाचे नाव सुरुवातीला 'संघर्ष' होते, मात्र शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते 'संवाद' असे झाले. हा बदल संघर्षाकडून समन्वयाकडे जाण्याचा प्रवास दर्शवितो. उन्नत भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी पाच गावे दत्तक घेऊन तेथील प्रश्नांची सोडवणूक करावी. विशेषतः मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि अंधश्रद्धा यांसारख्या प्रश्नांवर विद्यापीठ स्तरावरून संशोधन आणि प्रत्यक्ष कामाची गरज त्यांनी व्यक्त केली. ज्या गावात घराघरात दारू गाळली जात होती, तिथे सातत्यपूर्ण प्रबोधनामुळे आज एकही दारूचा अड्डा उरलेला नाही. हे परिवर्तन केवळ तरुणांच्या सहभागामुळे शक्य झाले. विद्यार्थ्यांनी केवळ वर्गात न रमता 'फील्ड वर्क' वर भर द्यावा. पंतप्रधान ज्याप्रमाणे 18-18 तास काम करतात, तोच उत्साह तरुणांनी आपल्या कामात आणावा. विद्यार्थ्यांनी मेळघाटात जेऊन तेथील प्रयोग करावे असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान आणि पदवी मिळविण्यावर समाधान मानू नये. समाजातील शेवटच्या घटकाचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. 'उन्नत भारत अभियान' हे केवळ एक अभियान नसून विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. उन्नत भारत अभियानांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक प्रदान करण्यात आली. दीपी आत्माराम ससाने हिला सात हजार रुपयाचे रोख पारितोषिक, फिरोज अन्सारी याला पाच हजार रुपयाचे तर संतोषी आवरकर हिला तीन हजार रुपयाचे रोख पारितोषिक कुलगुरूंच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. तृप्ती बारबुध्दे यांनी, तर आभार डॉ. पी. के. खानखडे यांनी मानले. कार्यक्रमाला रासायनिक तंत्रशास्त्र विभागातील डॉ. ए. एल. राठोड, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच उन्नत भारत अभियानचे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व समन्वयक, विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ पुरुषांच्या खो-खो स्पर्धेसाठी विद्यापीठ संघाची घोषणा


प्रतिनिधी | अमरावती

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे २ ते ६ एप्रिल दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ पुरुष खो-खो स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित केला. संघात श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचा भूषण गेडाम, कुणाल शिखरे, यश सदाशिव, कौशिक गेहलोत, प्रथमेश माहोरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचा रोहण बरकरे, आदित्य राऊत, सुबोध धंदर व राधेय अकर्ते, स्व. एन.ए. देशमुख महाविद्यालयाचा मयुर खंडारे, स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचा अंकुश शिरसाट, इंदिरा गांधी कला महाविद्यालयाचा ओम देशमुख व तेजस भालेराव, रामकृष्ण महाविद्यालयाचा सुफियान खान पठाण व रोहण मेश्राम, महात्मा फुले महाविद्यालयाचा आदित्य नागदिवे, कला व वाणिज्य महाविद्यालयाचा आयुष बोरखडे, कला महाविद्यालय, बुलडाण्याचा ज्ञानेश्वर चिमकुरे, आर.ए. महाविद्यालय वाशीमचा साहील राऊत, जी.एस. टोम्पे महाविद्यालयाचा अशोक नागले याचा समावेश आहे. निवडलेल्या खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. संघाचा प्रशिक्षण वर्ग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, येथे २१ ते ३० मार्चदरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

**The Hitavada**

# Workshop under Unnat Bharat Abhiyan held

■ **Amravati Bureau**
AMRAVATI, Mar 15



Dr Ravindra Kolhe addressing the programme as others look on.

"YOUNG people should dedicate themselves to social transformation and not limit their aspirations to personal progress or employment," asserted Ravindra Kolhe, renowned social worker and Padma Shri awardee, while addressing as the chief guest at a one day workshop organised under the Unnat Bharat Abhiyan at Sant Gadge Baba Amravati University (SGBAU), recently.

The workshop was jointly organised by the Department of Chemical Technology and the Department of Geology of the university. Dr Milind Barhate, Vice-Chancellor, SGBAU presided over the programme. Anil Naik, Head of the Department of Chemical Technology and Manoj Kumbhare, Unnat Bharat Abhiyan coordinator were also present on the dais.

Dr Kolhe shared his four decade journey of social work in the tribal region of Melghat. He encouraged students to adopt 5 villages under the Unnat Bharat Abhiyan and actively work towards solving local problems. Stressing the need for research and fieldwork, he highlighted issues such as malnutrition, child mortality and superstition in Melghat. Dr Kolhe also narrated how he and his wife lived in the remote village of Bairagad and worked for implementation of schemes.

Speaking on de-addiction, he noted that villages once known for widespread illicit liquor production have now become free from such activities due to sustained community efforts and the involvement of youth.

Dr Barahate said that education should not be limited to acquiring degrees but must nurture a sense of social responsibility. He noted that Unnat Bharat Abhiyan plays a crucial role in connecting universities with rural communities and encouraging students to address grassroots challenges.

The workshop began with the Maharashtra Song and the university anthem, followed by the ceremonial lighting of the lamp and floral tributes to Sant Gadge Baba. Dr Manoj Kumbhare, Co-ordinator delivered the introductory remarks. During the programme, Dr Barahate also presented awards to the top three winners of a national competition organised under Unnat Bharat Abhiyan. Deepti Sasane received a cash prize of Rs 7,000, Firoz Ansari Rs 5,000 and Santoshi Agarkar Rs 3,000.

The programme was compered by Prof Tripti Barbuddhe, while the vote of thanks was delivered by Dr P K Wankhade. Faculty members, coordinators and a large number of students were present at the event.

**प्रतिदिन अखबार**

विश्वविद्यालय में किया गया कार्यक्रम

# यशवंतराव चव्हाण की जयंती मनाई गई



प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार
अमरावती, 15 मार्च- संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में महाराष्ट्र के पूर्व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण की जयंती श्रद्धा और सम्मान के साथ मनाई गई. इस अवसर पर कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने यशवंतराव चव्हाण की प्रतिमा का पूजन कर पुष्प अर्पित किए और विश्वविद्यालय की ओर से उन्हें श्रद्धांजलि दी.कार्यक्रम में प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव साक्षी ठाकुर तथा प्रशासन विभाग के अधीक्षक डॉ. धनंजय पाटिल सहित कई अधिकारी और कर्मचारी उपस्थित थे.कार्यक्रम का संचालन तथा यशवंतराव चव्हाण के जीवन और कार्यों की जानकारी जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर ने दी.

आपली मातृभूमि

# विद्यापीठात 'विद्यार्थी संवाद व गटचर्चा' कार्यक्रम

## महिला दिनानिमित्त गृहविज्ञान विभागाचा विद्यार्थीकेंद्री उपक्रम

प्रतिनिधी/१६ मार्च

अमरावती- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभाग आणि भारतीय जनसंचार संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थी संवाद आणि गटचर्चा' हा अभिनव उपक्रम नुकताच संपन्न झाला.

केवळ व्याख्यानांपुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या लघुपटांच्या माध्यमातून महिलांचे भावविश्व, त्यांच्या क्षमता आणि सामाजिक संघर्षांवर अत्यंत प्रभावीपणे प्रकाश टाकला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक जाणीव जागृती करणाऱ्या या उपक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या



सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय होत्या. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनसंचार संस्थानचे प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, डॉ. प्रमोद गायकवाड, जयंत सोनवणे आणि डॉ. संघमित्रा देशमुख यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी मोबाईल मधील विविध ॲप योजनांचा वापर करून चित्रीकरण, ध्वनी आणि संकलनाचे कौशल्य आत्मसात करत उत्कृष्ट लघुपट सादर केले. या लघुपटांमधून इतिहासातील लढाऊ स्त्रियांपासून ते आजच्या खेळाडू, उद्योजक ... महिला, लावणीसम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर आणि कुपोषित महिलांचे जीवन अशा अनेक पैलूंवर प्रभावी भाष्य करण्यात आले. डॉ. विनोद निताळे यांनी या निर्मिती प्रक्रियेतील तांत्रिक बाबींचे कौतुक केले, तर डॉ. प्रमोद गायकवाड यांनी 'एक नारी, सब पे भारी' या ओळींचा अर्थ उलगडत स्त्री शक्तीवर कविता सादर केली. डॉ. वैशाली धनविजय यांनी लिंग समभावाचा विचार समाजाने मांडला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अनुश्री आडे हिने मानले. या उपक्रमासाठी सुमित गेडाम, शिवानी पेंडे, शिल्पा इंगोले, सुमेध वडोदकर, आयतल कामदार, शितिजा बागडे, भक्ती सोंधिया, अशोक शिरे, वसंत इंगळे आणि चरणदास जामडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

वृत्त केसरी

सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप

# विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या ऋणात राहिल



कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन




प्रतिनिधी/वृत्त केसरी

अमरावती,२८ मार्च निष्ठावान कर्मचाऱ्यांचा विद्यापीठाशी जोडलेला सन्मान धागा आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने विद्यापीठाला प्रदीर्घ सेवा दिली आहे. समर्पण, त्याग, श्रद्धा, प्रामाणिकपणा या भावनेने कर्मचाऱ्यांनी जी सेवा दिली, त्यात विद्यापीठ सुध्दा ऋणी राहील, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एच. नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, अनिल काळबांडे, काळबांडे, अनिल काळे, काळे, माधव पारके, पारके, मुरलीधर चिलुरकर, चिलुरकर, किशोर गजभुये, गजभुये, जनसंपर्क अधिकारी डॉ विलास नांदुरकर उपस्थित होते. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव पारके, मुरलीधर चिलुरकर व किशोर गजभुये यांचा सत्कार केला. तर काळबांडे यांचा मीनाक्षी तेटे पाटील यांनी, काळे यांचा विमल काळभुटे, पारके यांचा डॉ. सुलभा पाटील, चिलुरकर यांचा प्रज्ञा बोंडे व गजभुये यांचा राजश्री देशमुख यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला. नियंत्रण अधिकारी डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी सत्कारमूर्तींच्या सेवाकाळातील कार्याची प्रशंसा करून सर्वांना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, सचिव डॉ. श्रीकांत तायडे, श्रीजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले.

---

सकाळ

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



अमरावती, ता. १६ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव यशवंतराव चव्हाण चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव साक्षी ठाकूर, प्रशासन विभागाचे अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी माहिती दिली. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## मंगल प्रहर

# संशोधन और उद्यमिता से ग्रामीण भारत का कायाकल्प संभव





**उन्नत भारत अभियान का विस्तार**

## The Hitavada

# 'Social change possible when caste barriers are dismantled'

**Amravati Bureau**

AMRAVATI, Mar 17

"DISMANTLING caste inequality in India requires concrete action rather than mere discussion. Inter-caste marriages and social integration are among the most effective ways to eliminate caste discrimination and fulfill the vision of Dr B R Ambedkar," asserted by Dr J V Pawar, noted Ambedkarite.

He was delivering keynote address at a seminar on the topic 'Dr Babasaheb Ambedkar's economic vision: The making of modern India and its contemporary relevance'. The event was jointly organised by Dr Ambedkar Study Centre, the Department of Dr Babasaheb Ambedkar Thought, and Narayanrao Rana College, Badnera at Sant Gadge Baba Amravati University.



J V Pawar speaking at the programme.

Speaking at the seminar, Dr Pawar noted that Dr Ambedkar had highlighted the importance of inter-caste marriages in his writings as a means to break the rigid framework of castes in Indian society. He said that genuine social transformation would only be possible when caste barriers are dismantled through meaningful social integration.

The seminar was presided over by Dr Mahendra Dhore, Pro-Vice Chancellor.

The inaugural address was delivered by Ramdas Atram. Dr R D Sikchi, University Management Council Member, Dr Ashish Malu, Dr Gopal Wairale, Principal of Narayanrao Rana College, Badnera and Dr Santosh Bansod, Cordinator of Dr Ambedkar Study Centre, were present on the occasion.

In his inaugural remarks, Dr Atram said that Ambedkar's economic ideas continue to serve as a foundation for modern Indian policy. He stressed that development should not be limited to infrastructure such as roads and industries but must also bring about social transformation. Referring to Ambedkar's message of 'Educate, organise, agitate', he said it represents not only a call for social justice but also a pathway to economic empowerment.

Dr Ashish Malu highlighted the importance of education in building a progressive society. He stated that education should focus not only on academic knowledge but also on skill development, digital literacy and ethical values to nurture socially conscious and capable youth inspired by Ambedkarite philosophy.

Dr Dhore gave the presidential speech.

During the event, an edited volume containing 138 research papers was also released.

नवराष्ट्र

घवघवीत यश ● अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धा

# अमरावती विद्यापीठाला १३ पारितोषिके

▸ अमरावती, ब्युरो. चेन्नई तामिळनाडू येथील सत्यभामा इन्स्टिट्युट ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, जेपीअरनगर एसएच येथे मंगळवार ते शनिवारदरम्यान झालेल्या ३९ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूंनी रांगोळी, हिंदी वक्तृत्व स्पर्धा, मिमिक्री, वेस्टर्न व्होकल सोलो या कलाप्रकारात प्रथम पारितोषिक, भारतीय समूहगान, शास्त्रीय नृत्य, वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल सोलो या कलाप्रकारात द्वितीय व माईम, कल्चरल प्रोसेशन या कलाप्रकारात तृतीय तसेच लोक नृत्य, फोक ऑर्केस्ट्रा, ग्रुप साँग

## कलाक्षेत्रात उत्तुंग भरारी

विद्यार्थी विकास विभागांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता मोठ्याप्रमाणात सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यामधून अनेक प्राविण्यप्राप्त विद्यार्थी कलाक्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन अमरावती विद्यापीठाचा नावलौकीक करीत आहे. ही अत्यंत अभिमानास्पद बाब असून, सर्व विद्यार्थी कलावंत,



साथीदार व चमू व्यवस्थापक यांच्या परिश्रमाने ३९ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत अमरावती विद्यापीठाला घवघवीत यश मिळाले.

वेस्टर्न या कलाप्रकारात चवथे आणि क्ले मॉडेलिंग या कलाप्रकारात पाचवे, असे १३ पारितोषिके प्राप्त केले.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धेत चॅम्पीयनशिप प्राप्त केल्यानंतर संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या विद्यार्थी कलावंत, साथीदार यांनी राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक केला. चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. शितलबाबू तायडे व डॉ. जयश्री कुळकर्णी यांनी, साथीदार म्हणून डॉ. निखिलेश नलोडे, प्रशांत ठाकरे, अमोल अढाऊ, प्रकाश मेश्राम, अभिजीत भावे, अवधुत पाटील यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. या घवघवीत यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण चमूचे कौतुक केले.

तरुण भारत

# अमरावती विद्यापीठाला १३ पारितोषिके

## राष्ट्रीय युवा महोत्सव

◆ अमरावती, १७ मार्च

सत्यभामा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, जेपीआर नगर एसएच चेन्नई येथे १० ते १४ मार्च दरम्यान झालेल्या ३९ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सवात अमरावती विद्यापीठाच्या चमूंनी १३ पारितोषिके प्राप्त केली.

रांगोळी, हिंदी वक्तृत्व स्पर्धा, मिमिक्री, वेस्टर्न व्होकल सोलो या कलाप्रकारात प्रथम पारितोषिक, भारतीय समूहगान, शास्त्रीय नृत्य, वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल सोलो या कलाप्रकारात द्वितीय व माईम, कल्चरल प्रोसेशन या कलाप्रकारात तृतीय तसेच लोकनृत्य, फोक ऑर्केस्ट्रा, ग्रुप साँग वेस्टर्न या कलाप्रकारात चवथे आणि क्ले मॉडेलिंग या कला प्रकारात पाचवे अशी १३ पारितोषिके पटकावली. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मध्य विभाग स्पर्धेत चॅम्पीयनशिप प्राप्त केल्यानंतर विद्यापीठाच्या विद्यार्थी कलावंत, साथीदार यांनी राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक केला आहे.



विद्यापीठाची चमू आपल्या प्रशिक्षकांसोबत

विद्यार्थी विकास विभागांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यामधून अनेक प्राविण्यप्राप्त विद्यार्थी कलाक्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन अमरावती विद्यापीठाचा नावलौकिक करीत आहे. सर्व विद्यार्थी कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांच्या परिश्रमाने ३९ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत अमरावती विद्यापीठाला घवघवीत यश मिळाले आहे.

चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. शीतलबाबू तायडे व डॉ. जयश्री कुळकर्णी यांनी, साथीदार म्हणून डॉ. निखिलेश नलोडे, प्रशांत ठाकरे, अमोल अढाऊ, प्रकाश मेश्राम, अभिजित भावे, अवधुत पाटील यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. या घवघवीत यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. ◂(तभा वृत्तसेवा)

# तरुणांनो ! कौशल्य आत्मसात करा, त्याशिवाय प्रगती नाही

डॉ. एच. आर. देशमुख यांचे प्रतिपादन

अमरावती विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय

रोजगार मेळाव्याचे उत्साहात उद्घाटन









हिंदुस्थान

# भारताच्या विकासात बुध्द तत्त्वज्ञानाचे मोठे योगदान : डॉ. सागर जाधव

## विद्यापीठात 'भारताच्या सांस्कृतिक विकासात बुध्द धम्माचे योगदान' विषयावर व्याख्यान संपन्न



अमरावती दि. १८ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लहानपणापासूनच बुध्दाचा प्रभाव होता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच भारताला बुध्दाची ओळख झाली व भारतीय संविधानात बुध्द तत्वज्ञानाचा त्यांनी अंतर्भाव केला. त्यामुळेच भारताच्या विकासात बुध्द तत्त्वज्ञानाचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. सागर जाधव यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बुध्दीस्ट स्टडीज सेंटरच्यावतीने आयोजित 'भारताच्या सांस्कृतिक विकासात बुध्द धम्माचे योगदान' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी रासायनिक तंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, बुध्दीज स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. विनोद नागले उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. जाधव म्हणाले, भारतात जनपदं होती, संघराज्य होती. बुध्दाचे चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचल्यानंतर त्यांच्यावर बुध्द तत्वज्ञानाचा मोठा प्रभाव झाला आणि शेवटपर्यंत तो राहिला. पटत असेल तरच घ्या, कोणतेही बंधन नाही, संपूर्ण स्वातंत्र्य असा बुध्दाचा धम्म आहे. संचयातून शोषण होते, म्हणून बुध्दांनी आपल्या भिक्खुंना सुध्दा संचय करू दिला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनीही भगवा स्वीकारला होता. डॉ. बाबासाहेब नसते, तर बुध्दाचे तत्वज्ञान सुध्दा भारताला माहिती झाले नसते आणि याचे श्रेय सम्राट अशोकाला द्यावे लागेल असे सांगून डॉ. सागर जाधव पुढे म्हणाले, सम्राट अशोक यांनी मोठमोठे शिलालेख लिहून ठेवले होते आणि ब्रिटीश जेव्हा भारतात आले, तेव्हा त्यांना ते शिलालेख सापडले आणि त्यावरून त्यांनी सम्राट अशोकाचा काळ ओळखून बुध्दाचीही भारताला ओळख झाली. सम्राट अशोकाच्या काळात देशाचा जीडीपी ३६ टक्के होता आणि म्हणूनच भारताला सोने की चिडीया म्हटल्या जाते. त्यामुळे सम्राट अशोकाचे देशावर मोठे ऋण आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. अनिल नाईक म्हणाले, आजची जगाची स्थिती पाहता बुध्द तत्वज्ञान अधिक महत्वाचे आहे. अहिंसा, करूणा, समानता, अनेक धर्मपरंपरा देशाला लाभली आहे, त्यामुळेच देशात स्थैर्य आहे. नालंदा विद्यापीठात विदेशातील व्यक्ती शिक्षण घ्यायचे. सांची स्तुप देशाचा सांस्कृतिक वारसा जपते आहे, असेही ते म्हणाले. संत गाडगे बाबा, तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक विनोद नागले यांनी, अतिथींचा परिचय श्री सुधाकर तलवारे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. सुरेश पवार यांनी, तर आभार श्री बापुराव वानखडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, आंबेडकरी चळवळीतील विचारवंत, अभ्यासक, साहित्यिक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जागरूकता आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा

# संशोधन आणि उद्योजकतेतून ग्रामीण भारताचा कायापालट शक्यः डॉ.संदीप जोशी





अमरावती (प्रतिनिधी) दि. १७ : ग्रामीण भागातील स्थानिक संसाधनांचा वापर करून समाजाचा विकास करणे आणि तरुणांना उद्योजक बनवणे हेच खऱ्या अर्थाने ग्रामस्वराज्य आहे. यासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग आणि संशोधन संस्थांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन वर्धा येथील महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थेचे सिनिअर सायंटिफिक अधिकारी, संदीप जोशी यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'उन्नत भारत अभियान' अंतर्गत आयोजित जागरूकता आणि कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ.वैशाली गुडधे, एम. जी. आय. आर. आय. चे डॉ.मिलिंद कार्टेकर, डॉ. श्रावण पांडक, डॉ.शितल शर्मा, डॉ.स्वानंद पत्रांचे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तथा कार्यशाळेच्या संयोजक डॉ. वर्षा नाठार व सहसंयोजक डॉ.मनोज कुंभारे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, केवळ प्रयोगशाळेत संशोधन करून चालणार नाही, तर ते समाजापर्यंत आणि उद्योगांपर्यंत पोहोचले पाहिजे, असे सांगत त्यांनी लहानपणापासून ते भारतीय शैक्षणिक संस्थेचे विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा उद्देश केला. या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी एक नवे व्यासपीठ निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रादेशिक समन्वय संस्थेचे समन्वयक डॉ. मनोज कुंभारे यांनी अभियानाची माहिती देतांना सांगितले की, ग्रामीण विकासासाठी विद्यापीठांचे योगदान महत्वाचे असून 'उन्नत भारत अभियान' हा परिवर्तनाचा संकल्प विद्यापीठाने केला आहे. आय.आय.टी.दिल्ली ही या अभियानाची राष्ट्रीय समन्वय संस्था असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात ५० प्रादेशिक समन्वय संस्था कार्यरत आहेत. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची निवड विदर्भ आणि मराठवाडा विभागासाठी 'प्रादेशिक समन्वय संस्था' म्हणून करण्यात आली आहे. याअंतर्गत अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश असून सद्यस्थितीत ११३ संस्था सहभागी संस्था नोंदणीकृत आहेत.

**दैनिक भास्कर**



# राष्ट्रीय पोस्टर प्रतियोगिता में संतोषी आगरकर ने पाया तीसरा स्थान

अमरावती| राष्ट्रीय स्तर की पोस्टर प्रतियोगिता में उत्कृष्ट प्रदर्शन करते हुए संतोषी आगरकर ने तीसरा स्थान हासिल कर नकद पुरस्कार प्राप्त किया। इस उपलब्धि पर उसे संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में आयोजित समारोह में उपकुलपति डॉ. मिलिंद बारहाते तथा पद्मश्री सम्मानित डॉ. रवींद्र कोल्हे के हाथों सम्मानित किया गया।

प्रतियोगिता में देशभर के प्रतिभागियों के बीच संतोषी ने अपनी रचनात्मकता और सामाजिक विषयों पर सशक्त प्रस्तुति से निर्णायकों को प्रभावित किया। उसकी इस सफलता से न केवल विश्वविद्यालय बल्कि पूरे क्षेत्र में हर्ष और गौरव का वातावरण है। शिक्षकों और सहपाठियों ने इसे युवा प्रतिभाओं के लिए प्रेरणादायी उपलब्धि बताया है।

**दिव्य मराठी**

अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात खोवला मानाचा तुरा

# आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सागर जाधवने पटकावले रौप्य

प्रतिनिधी | अमरावती



प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोलेसह ज्युदो खेळाडू सागर जाधव.

चंदीगड विद्यापीठ, मोहाली येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत दिग्रस येथील बी.बी. आर्ट्स, कला व वाणिज्य महाविद्यालयाचा खेळाडू सागर जाधवने ६० किलो वजन गटात रौप्य पदक पटकावून विद्यापीठाच्या नावलौकिकात मोलाची भर घातली आहे.

सागरच्या या यशामागे प्रचंड मेहनत आणि योग्य नियोजनाचा वाटा आहे. त्याला अमरावती येथील डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्रसिद्ध प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोले यांचे बहुमूल्य तांत्रिक मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली सागरने स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत धडक मारली. रौप्य पदक विजेता सागर जाधव याने मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल विद्यापीठ स्तरावरून त्याचे अभिनंदन होत आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. तुनजा राऊत यांनी रौप्य पदक पटकाविल्याबद्दल सागर जाधव आणि त्याचे प्रशिक्षक डॉ. जयंत इंगोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

**प्रतिदिन अखबार**



# अमरावती वि.वि. महिला दिवस पर महिला स्टार्टअप्स का सत्कार

## उत्साह पूर्वक मनाया गया कार्यक्रम

अमरावती, वती विश्वविद्यालय में रिसर्च एंड इन्क्युबेशन फाउंडेशन, रसायनशास्त्र विभाग और इंटरनेशनल ह्यूमन राइट्स वेल्फेअर असोसिएशन द्वारा अंतरराष्ट्रीय महिला दिवस पर महिला स्टार्टअप्स का सत्कार इन्क्युबेशन सेंटर में उत्साहपूर्वक संपन्न हुआ. कार्यक्रम की अध्यक्षता कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, प्रमुख अतिथि कु. कश्मिरा जाधव (उप्ड, जाधव सेलेंड प्रा. लि.) और विद्यापीठ सदस्य डॉ. मनिषा कोडापे उपस्थित थे.इस अवसर पर एन.के. बायोब्लेंड, लॉक युवर आइडिया, मोरया एग्रो रिसर्च नैनो बायोटेक, प्लेऊरोट्स फूड इंडस्ट्रीज और बायो निर्मित जैसी महिला नेतृत्व वाली स्टार्टअप्स के संचालकों का सत्कार किया गया. कुलगुरु डॉ. बारहाते ने महिला उद्यमिता का महत्व बताते हुए नवोदित महिला उद्यमियों को स्टार्टअप और नवाचार के क्षेत्र में आगे बढ़ने के लिए प्रेरित किया.कु. कश्मिरा जाधव ने नेटवर्किंग और मार्केटिंग पर जोर देने की सलाह दी. कार्यक्रम का संचालन अमोल हिरुलकर ने किया और आभार सीईओ आनंद यादव ने माना. कार्यक्रम में इन्क्युबेशन सेंटर के योगदान और महिला उद्यमियों के अनुभवों को साझा किया गया.

**पुण्य केसरी**

अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## सागर जाधव याला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत रौप्य पदक



[illegible]

**The Hitavada**

# SGBAU's NSS team shines at National Unity Camp

■ Amravati Bureau
AMRAVATI, Mar 20

NATIONAL Service Scheme (NSS) team of Sant Gadge Baba Amravati University achieved remarkable success, securing first place in 8 out of 12 cultural events at the National Unity Camp held recently at Adikavi Shri Maharshi Valmiki University, Saychur, Karnataka as per the directives of the Ministry of Youth Affairs and Sports, Government of India.

The camp saw participation from 150 competitors across six States. The SGBAU team comprised of 10 volunteers (5 boys and 5 girls) along with the team manager. The team won first prizes in the eight events including Cultural, Mono Acting, Singing, Instrumental, Skit, Indian Festival, Indian Folk Dance and Procession. Notably, the team also received a cash prize of Rs 11,000 for their singing event performance of a powada.



Dr Milind Barhate and others congratulating the team members.

The team members include Rishikesh Kharde, Shri Shivaji Arts, Commerce and Science College, Akola, Kamlesh Tantarpale, Bharatiya College, Morshi, Pranay Aruthe, Savitri Jyotirao Social Work College, Yavatmal, Om Pawar, Narayanrao Nagre College, Duserbid, Jay Chatreshwar, Government College of Pharmaceutical Sciences, Amravati, Bhakti Gaikwad, Bharatiya Mahavidyalaya, Amravati, Sagar Athawale, Shri Tulshiramji Jadhav Arts and Science College, Washim, Suhani Rathod, Babaji Date Arts and Commerce College, Yavatmal, Radhika Pandav, Shri Pundlik Maharaj College, Chandur Railway, Sakshi Swargiya, Government Vidarbha Institute of Science and Humanities, Amravati. Dr Swapnil Gore, Indira Gandhi Arts College, Ralegaon was the team manager.

Speaking on the occasion, SGBAU V-C Dr Milind Barhate congratulated the entire team and manager for bringing national-level recognition to the university. Dr Mahendra Dhore, Pro-V-C, Dr Avinash Asnare, Registrar and Dr Nilesh Kadu, NSS Director were prominently present on the occasion.

**प्रतिदिन अखबार**

# संशोधन, उद्यमिता से ग्रामीण भारत का कायाकल्प संभव

## डॉ. संदीप जोशी का प्रतिपादन, विवि में जागरुकता एवं कौशल विकास प्रशिक्षण कार्यशाला का उद्घाटन

प्रतिनिधी/प्रतिदिन अखबार

अमरावती, 19 मार्च - ग्रामीण क्षेत्रों के स्थानीय संसाधनों का उपयोग कर के समाज का विकास करना और युवाओं को उद्यमी बनाना ही वास्तविक अर्थों में ग्राम स्वराज्य है. इसके लिए शैक्षणिक संस्थानों, उद्योगों और अनुसंधान केंद्रों को एकजुट होकर काम करने की आवश्यकता है, यह विचार वर्धा स्थित महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थान के वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी संदीप जोशी ने व्यक्त किए. वे संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय में उन्नत भारत अभियान के अंतर्गत आयोजित जागरुकता एवं कौशल विकास प्रशिक्षण कार्यशाला के उद्घाटन अवसर पर मुख्य अतिथि के रूप में बोल रहे थे. इस कार्यक्रम की अध्यक्षता अंतर्विषय अध्ययन संकाय की अधिष्ठाता डॉ. वैशाली गुढे ने की. मंच पर एमजीआईआरआई के डॉ. निलेश काटेकर, डॉ. श्रावण चांडक, डॉ. कौशल शर्मा, डॉ. स्वानंद कलंबे, वनस्पति विज्ञान विभाग की प्रमुख एवं कार्यशाला की संयोजिका डॉ. वर्षा नाठार तथा सह-संयोजक डॉ. मनोज कुंभारे उपस्थित थे. डॉ. जोशी ने आगे बताया कि महात्मा गांधी ने 1934 में वर्धा में ऑल इंडिया विलेज इंडस्ट्रीज ऐसोसिएशन की स्थापना की थी. आज यह भारत सरकार के मंत्रालय के तहत एक स्वायत्त राष्ट्रीय अनुसंधान संस्थान के रूप में कार्यरत है. उन्होंने बताया कि संस्थान में खादी और कपड़ा, बायो-हर्बल, ग्रामीण रसायन, ग्रामीण हस्तशिल्प, ग्रामीण ऊर्जा एवं बुनियादी ढांचा जैसे विभिन्न विभाग हैं. छात्रों के लिए यहां इंटर्नशिप, विशेष प्रोजेक्ट और कौशल विकास प्रशिक्षण, जबकि शोधकर्ताओं के लिए स्नातकोत्तर शोध प्रबंध और भविष्य में पीएचडी अनुसंधान केंद्र के रूप में अवसर उपलब्ध है. साथ ही, शिक्षकों के लिए उन्नत भारत अभियान और विश्वविद्यालय के साथ मिलकर संयुक्त अनुसंधान परियोजनाएं चलाने का भी विकल्प है. डॉ. जोशी ने जोर देकर कहा कि अनुसंधान केवल प्रयोगशाला तक सीमित नहीं रहना चाहिए, बल्कि इसे समाज और उद्योजकों तक पहुंचाना चाहिए. अपने अध्यक्षीय संबोधन में डॉ. वैशाली गुढे ने कहा कि विश्वविद्यालय के शोध का लाभ समाज के अंतिम व्यक्ति तक पहुंचाने के लिए लैब टू लैंड की अवधारणा को क्रियान्वित करना आवश्यक है. उन्होंने युवा शोधकर्ताओं से ग्रामीण समस्याओं के समाधान के लिए आगे आने का आह्वान किया. डॉ. गुढे ने कहा कि शोध केवल डिग्री प्राप्त करने के लिए नहीं, बल्कि ग्रामीण जीवन में सकारात्मक बदलाव लाने के लिए होना चाहिए. उन्होंने यह भी विश्वास जताया कि इस कार्यशाला से महिला स्वयं सहायता समूहों को कौशल प्रशिक्षण देकर मुख्यधारा में लाने में मदद मिलेगी.





### उन्नत भारत अभियान का विस्तार- डॉ कुंभारे

क्षेत्रीय समन्वय संस्थान के समन्वयक डॉ. मनोज कुंभारे ने अभियान की जानकारी देते हुए बताया कि संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय को विदर्भ और मराठवाड़ा क्षेत्र के लिए क्षेत्रीय समन्वय संस्थान के रूप में चुना गया है. सहभागी संस्थान वर्तमान में 113 संस्थान पंजीकृत है, जिन्होंने 565 गांवों को गोद लिया है. नई शिक्षा नीति के तहत इन सामाजिक परियोजनाओं के लिए 2 क्रेडिट का प्रावधान किया गया है. कार्यक्रम का संचालन खुशी देवगडे ने किया और आभार प्रदर्शन डॉ. के. सी. मोरे ने किया. इस अवसर पर डॉ. नितिन फिरके, डॉ. सुरेंद्र माणिक, डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. यादव मावले, डॉ. विलास नांदुरकर, डॉ. सुदर्शन कोवे सहित बड़ी संख्या में शिक्षक और विद्यार्थी उपस्थित थे.

The Hitavada

# SGBAU students shine at 39th All India National Youth Festival

■ Amravati Bureau
AMRAVATI, Mar 19

STUDENTS from Sant Gadge Baba Amravati University (SGBAU) achieved remarkable success at the 39th All India National Youth Festival, held recently at Sathyabama Institute of Science and Technology, JP Nagar, Chennai, Tamil Nadu. The university teams showcased their talent across multiple cultural categories, bringing home a total of 13 awards.

Students won first prize at Rangoli, Hindi Elocution, Mimicry and Western Vocal Solo. Whereas won second prize at Indian Group Song, Classical Dance and Western Instrumental Solo, third prizes at Mime and Cultural Procession, fourth prize at Folk Dance, Folk Orchestra, Group Song (Western) and fifth place at Clay Modeling.

Following their win at the All India Inter-University Central Zone Competition, the university's artists further enhanced its reputation at the national -level through their performances.

The university's cultural initiatives, under the Student Development Department, aim to promote holistic development among students. These programmes have helped students achieve excellence in the arts and bring recognition to the university at prestigious platforms.

Dr Shital Tayde and Dr Jayshree Kulkarni, both the managers of the team along with associates Dr Nikhilesh Nalode, Prashant Thakre, Amol Adhau, Prakash Meshram, Abhijit Bhave and Avdhut Patil, played an instrumental role in guiding the teams to success.

Congratulating the students and the entire team, Dr Milind Barhate, V-C, Dr Mahendra Dhore, Pro-V-C, Dr Avinash Asnare, Registrar and Dr Rajiv Borkar, Director of Student Development extended their best wishes for future endeavours.



SGBAU students celebrating success.

The Hitavada

# Women's Studies Centre of SGBAU organises oratory competition

■ Amravati Bureau
AMRAVATI, Mar 21

AN ORATORY competition on 'Gender equality: current status and challenges' for students across various academic departments of the university was organised by the Women's Studies Centre of Sant Gadge Baba Amravati University, recently.

The event aimed to raise awareness about gender equality among students and foster gender sensitivity. Students from multiple departments participated, delivering presentations with relevant references and insights. Winners were selected for first, second, third and two consolation prizes. Praful Kukde, M A Gender and Women's Studies won the first prize while Nitin Gavai, Library and Information Science secured second prize and Prajwal Ghom, Education Department remained on third place. Prajakta Deshmukh and Pallavi Chimurkar, M A Gender and Women's Studies got consolation prizes.

The competition was adjudged by Dr Ravi Sakharakar, Head of the Marathi Department at Mahatma Jyotiba Phule College of Commerce and Science and Vitthalrao Raut Arts College, Bhatkuli. Prize distribution was attended by Dr Sakharakar along with Prof Dr Bhagwan Phalke of the Women's Studies Centre.

Addressing the students during the award ceremony, Dr Sakharakar emphasised that gender equality is essential for the balanced development of society. Prof Pooja Alone conducted and also proposed a vote of thanks of the programme.



Dignitaries with winner students.

## डॉ. सागर जाधव यांचे प्रतिपादन; अमरावती विद्यापीठात व्याख्यान

# बुद्ध तत्त्वज्ञानावर आंबेडकरांचा प्रभाव

▸ अमरावती, ब्युरो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लहानपणापासूनच बुद्धाचा प्रभाव होता, आणि त्याच्यामुळेच भारताला बुद्धाची ओळख मिळाली. भारतीय संविधानात बुद्ध तत्त्वज्ञानाचा समावेश करून त्यांनी त्याचा महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळेच भारताच्या विकासात बुद्ध तत्त्वज्ञानाचे मोठे स्थान आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. डॉ. सागर जाधव यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील बुद्धिस्ट स्टडीज सेंटरच्या वतीने 'भारताच्या सांस्कृतिक विकासात बुद्ध धम्माचे योगदान' या विषयावर एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी विचारपीठावर अध्यक्षस्थानी रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक आणि बुद्धिस्ट स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. विनोद नागले उपस्थित होते.

विषयाची मांडणी करताना जाधव म्हणाले, भारतात पूर्वी जनपद आणि संघराज्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाचे चरित्र वाचल्यानंतर



बुद्ध तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला, जो शेवटपर्यंत कायम राहिला. बुद्धांचा धम्म म्हणजे 'पटत असेल तरच घ्या, कोणतेही बंधन नाही, संपूर्ण स्वातंत्र्य'. बुद्धांनी शोषणाचा विरोध केला आणि आपल्या भिक्खूंना संचय करू दिला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते, तर भारताला बुद्ध तत्त्वज्ञानाची ओळख होणे कठीण झाले असते. त्यांनी सम्राट अशोकाचा उल्लेख करत सांगितले की, सम्राट अशोक यांनी मोठे शिलालेख लिहून ठेवले, आणि ब्रिटिशांच्या येण्यापूर्वी त्यावरून बुद्धाची भारताला ओळख झाली. सम्राट अशोकाच्या काळात देशाचा जीडीपी ३६% होता, म्हणूनच भारताला 'सोने की चिड़ीया' असे म्हटले जाते.असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन आणि मेणबत्ती प्रज्वलन करून झाली. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची प्रारंभिक सुरुवात केली. प्रास्ताविक प्रा. विनोद नागले यांनी केले, आणि अतिथींचा परिचय सुधाकर तलवारे यांनी करुन दिला. संचालन प्रा. सुरेश पवार यांनी, तर आभार बापुराव वानखडे यांनी मानले. .

### सांची स्तूप देशाचा सांस्कृतिक वारसा

अध्यक्षीय भाषणात डॉ. अनिल नाईक यांनी सांगितले की, आजच्या जगात बुद्ध तत्त्वज्ञान अधिक महत्वाचे आहे. अहिंसा, करूणा आणि समानता यांसारख्या तत्त्वांमुळे देशात स्थैर्य आहे. नालंदा विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी विदेशातील व्यक्ती येत असत. सांची स्तूप देशाचा सांस्कृतिक वारसा जपतो, असे त्यांनी सांगितले.

# भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना अभिवादन

### विद्यापीठात 'शहीद दिन' निमित्त उपक्रम



▸ अमरावती, ब्युरो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात भारतीय स्वातंत्र्य युद्धातील योद्धा तसेच थोर क्रांतिकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. शहीद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांच्याबद्दल विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी माहिती दिली. शहीद दिन कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे, उपकुलसचिव (मा. क.) डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठात शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना अभिवादन



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात २३ मार्च हा दिवस शहीददिन म्हणून पाळण्यात आला. याप्रसंगी थोर क्रांतिकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांना अभिवादन करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. शहीद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांच्याबद्दल जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी माहिती दिली. कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही सक्षम करण्यासाठी ग्रामसभा प्रभावी होणे आवश्यक

## डॉ. हर्षवर्धन देशमुख : विद्यापीठात संत गाडगेबाबांची दशसूत्रे व ग्रामविकासावर कार्यशाळा




अमरावती (प्रतिनिधी) दि.२३ : जर या देशाची लोकशाही सक्षम करायची असेल, तर ग्रामसभा सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत गावातील प्रत्येक नागरिकाला ग्रामसभेचे महत्त्व उमजत नाही, तोपर्यंत खऱ्याअर्थाने ग्रामीण विकास साधला जाणार नाही, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

संत गाडगेबाबांची दशसूत्रे आणि ग्रामविकास या विषयावर आयोजित सरपंच कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरूजी, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, जेष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे, महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना अध्यक्ष राजेंद्र कराळे व संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते.

कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी केली. ते पुढे म्हणाले, अधिकारांसोबत सरपंच व नागरिकांनी जबाबदारीची जाणीव सुद्धा ठेवली पाहिजे, त्यामुळे सरपंचांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. ग्रामपंचायतीमध्ये होणारे सर्व व्यवहार आणि खर्च गावातील प्रत्येक नागरिकाला समजले पाहिजेत. कारभार पारदर्शक असला पाहिजे. काळजी आणि निर्वाचितांच्या प्रश्नांमुळे सुरुवातीच्या काळात ग्रामीण विकासाकडे पूर्णतः लक्ष देता आले नाही. १९५७ मध्ये बळवंतराय मेहता समितीच्या शिफारसीनंतर आणि पुढे १९९३ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर देशात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था खऱ्याअर्थाने लागू झाली. गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार ग्रामविकास करणे ही प्रत्येक पदाधिकाऱ्याची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात आचार्य वेरूळकर म्हणाले, संत गाडगे बाबांनी दिलेली दशसूत्री हा केवळ उपदेश नसून तो गाव सुखी आणि समृद्ध करण्याचा एक कृती आराखडा आहे. जोपर्यंत गावातील शेवटच्या माणसापर्यंत या दशसूत्रीचा लाभ पोहोचत नाही, तोपर्यंत ग्रामविकास अपूर्ण आहे. गाडगे बाबांनी हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा मंत्र दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून ग्रामविकासाठी संकल्पना मांडली. आजच्या सरपंचांनी आणि युवकांनी केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता श्रमदानातून गावे स्वच्छ आणि सुंदर करावीत, असे आवाहन केले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमामध्ये संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी, तर श्री गजानन बोंडे यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन डॉ. राजेश मिरगे यांनी केले. कार्यशाळेला विदर्भातील सरपंच तसेच विद्यापीठाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात ग्रामपंचायतीमध्ये नियुक्त झालेल्या प्रशासकाची जबाबदारी व भूमिका यावर सौ. शिलाताई गुरुकर यांनी, तर शासकीय योजना राबविताना येणाऱ्या अडचणी यावर प्रा. राजेंद्र कराळे यांनी माहिती दिली.

विदर्भ मतदार

# अमरावती विद्यापीठात शहीद दिनानिमित्त व्याख्यानमाला

## शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर बुध्दीप्रामाण्यवादी व्हा : प्रा.मधुकर जाधव



अमरावती (प्रतिनिधी) दि.२४ : शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर देशहिताचे कार्य करा, राष्ट्रीय एकात्मता, देशाची विविधता जपावी लागेल, वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवावा लागेल आणि त्यासाठी बुध्दीप्रामाण्यवादी व्हा, अनुकरण करा, पण अंधानुकरण नाही, असे मौलिक विचार प्रा. मधुकर जाधव यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनानिमित्त 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, अधिसभा सदस्य नितीन टाले, कैलास चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

**विद्यार्थी परिवर्तन घडवून आणू शकतात : प्रा. टाले**

मार्गदर्शनपर भाषण करतांना अधिसभा सदस्य नितीन टाले म्हणाले, सर्वस्वाचा त्याग करुन तरुण वयातच क्रांतिकारकांनी देश स्वातंत्र्यासाठी लढा दिला. आपण तरुण वयात काय करीत आहोत, हे पाहिले पाहिजे. आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत, त्यांना सामोरे जा. विद्यार्थी सुध्दा परिवर्तन घडवून आणू शकतात, असेही टाले म्हणाले. कैलास चव्हाण म्हणाले, ब्रिटीशांची सत्ता उलथवण्यासाठी क्रांतिकारकांनी मोठे बलिदान दिले आहे. अवघ्या तेवीस वर्ष वयात भगतसिंह यांनी अनेक पुस्तके वाचली, अभ्यास केला. लाला लजपतराय यांच्याकडून देशभक्तीचे धडे घेतले. वीर सावरकर यांनी अभिनव भारत संघटना उभारुन देशासाठी लढा दिला. पुस्तके वाचा, स्वप्न पहा आणि पुढे जा असे आवाहन त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, क्रांतिकारकांचे विचार व कार्य आत्मसात करावे लागेल. इतिहासाचे वाचन करावे लागेल. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिली, त्यांच्या विचाराचा वारसा आपल्याला पुढे न्यावा लागेल. विकसित भारतासाठी युवकांचे महत्वाचे योगदान असून त्यासाठी निरंतर प्रयत्न करा, असेही ते म्हणाले.

संत गाडगे बाबा, शहीद भगतसिंह, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर यांनी, सूत्रसंचालन भगवान फिनाके यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपली मातृभूमि

# शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर बुध्दीप्रामाण्यवादी व्हा

*** प्रा. मधुकर जाधव यांचे प्रतिपादन * विद्यापीठात शहीद दिनानिमित्त व्याख्यानमाला**

आमा प्रतिनिधी/२१ मार्च

अमरावती : शहीदांच्या स्वप्नातील वैभवशाली भारत घडवण्यासाठी आजच्या युवकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून बुध्दीप्रामाण्यवादी होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. मधुकर जाधव यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

देशाची एकात्मता आणि विविधता टिकवण्यासाठी केवळ क्रांतीवीरांचे अनुकरण न करता त्यांच्या विचारांमागचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. भगतसिंगांनी लाला लजपत राय यांच्या निधनाचा सूड घेतानाच,





भारतीयांचा आवाज ब्रिटिशांच्या कानापर्यंत पोहोचवण्यासाठी विधानसभेत स्फोट केला होता. त्यांचा हेतू कोणाला मारण्याचा नसून अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्याचा होता. तुरुंगातील भेदभावाविरुद्ध त्यांनी केलेले उपोषण आणि बापू नेनू यांनी स्वदेशीसाठी दिलेला लढा, हा आजही युवकांसाठी मार्गदर्शक आहे. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विकसित भारतासाठी युवकांच्या योगदानावर भर दिला. यावेळी व्यासपीठावर अधिसभा सदस्य नितीन टाले, कैलास चव्हाण, संचालक डॉ. निलेश कडू व डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते. प्रारंभी संत गाडगे बाबा, भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भगवान फिरके यांनी सूत्रसंचालन केले. अवघ्या २३ व्या वर्षी भगतसिंगांनी शेकडो पुस्तके वाचून प्रगल्भ विचार मांडले होते. आजच्या तरुण पिढीने केवळ इतिहास न वाचता त्यातील त्यागाचा वारसा पुढे नेण्यासाठी अभ्यासू वृत्ती आणि जिद्द बाळगणे आवश्यक आहे, असा संदेश मान्यवरांनी यावेळी दिला.

# स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रधर्म, म्हणजे कर्मकांड नाही : प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन

अमरावती दि.२५ : स्वामी विवेकानंद यांना जो धर्म अपेक्षित आहे, तो पूजापाठ अथवा कर्मकांड नाही, तर राष्ट्र हाच त्यांच्या विचाराचा धर्म होय. ज्या धर्माचा आधार स्वामी विवेकानंद यांनी घेतला तो धर्म म्हणजे कर्म, कर्तव्य होय, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी केले. संत गाडगे बाबा विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वामी विवेकानंदांच्या विचारातून व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळेचे उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, डॉ. एन.आर. पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.



कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. बिसेन म्हणाले, जागृत असलेल्या समाजाचा विकास होत असतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आले आहेत, त्यामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होतील. आपल्या संस्कृतीनुसार धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष याप्रमाणे कामाची प्रगती झाली तर विकास होईल. स्वामी विवेकानंदांची दृष्टी महाविद्यालयीन जीवनापासूनच चिकित्सक होती. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चिकित्सक बनले पाहिजे. आपल्या सभोवताल होणा-या घटनांमुळे स्वत:लाच प्रश्न करता आले पाहिजेत. कितीही संकटे आलीत, तरी सामोरे जा, संघर्ष करा, त्यात यश निश्चितच मिळेल हे त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या एका उदाहरणाव्दारे पटवून दिले. कन्याकुमारी येथे स्वामी विवेकानंद गेले तेव्हा त्यांना तेथील बेटावर पोहत जावे लागले होते, असे सांगून आत्मविश्वासाच्या बळावर आपण मोठमोठी संकटे झेलू शकतो, असेही डॉ. बिसेन म्हणाले. अमेरिकेतील शिकागो येथील धर्मपरिषदेसंदर्भातही स्वामी विवेकानंद यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांनी माहिती दिली. चारित्र्य ही देशाची मोठी संपदा असल्याचे त्यांनी उदाहरणादाखल स्पष्ट करतांना चारित्र्यसंपन्न बना, असा सल्लाही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. समरसता निर्माण करण्यासाठी जातीच्या भिंती तोडा, स्वामी विवेकानंद यांना राष्ट्र हाच एक जात व धर्म होता, असेही डॉ. बिसेन म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, संत विचारातून समाज सुदृढ होईल. आजच्या युवकांना योग्य मार्गदर्शनाची गरज असून देश विश्वगुरू होण्यासाठी विद्यार्थी घडले पाहिजेत. स्वामी विवेकानंद यांनाही अनेक संकटे झेलावी लागलीत. त्यामुळे संकटे पेलता आली पाहिजेत, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी दिला.

अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. नितीन कोळी म्हणाले, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपण जर मागे राहिलो, तर पुढेही आपण टिकू शकणार नाही. मात्र तंत्रज्ञानाचा जेवढा उपयोग आहे, त्याचा दुरुपयोग आपणच टाळला पाहिजे. केवळ आर्थिकदृष्ट्या विकास पुरेसा नाही, तर जगावर राज्य करता आले पाहिजे आणि तोच सुपरपॉवर ठरेल. सध्याची जगाची स्थिती पाहता, जगाला आज ख-या अर्थाने युध्दाची नाही, तर बुध्दाची गरज आहे, असेही डॉ. कोळी म्हणाले.

संत गाडगे बाबा, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी मांडली. याप्रसंगी स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, ग्रंथभेट व रोख पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी, तर आभार डॉ. निलेश कडू यांनी मानले. उद्घाटनीय समारंभाला विद्यापीठातील अधिकारी, रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवराष्ट्र

## शहरात रसायनशास्त्र ज्ञान-देवाण-घेवाण व शैक्षणिक संवाद उपक्रम

# विद्यापीठ-महाविद्यालयात शैक्षणिक संवाद

**शैक्षणिक**

▸ अमरावती, ब्युरो. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी जी. एस. टोम्पे आर्ट्स, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, चांदुरबाजार येथे नुकताच शैक्षणिक संवाद व ज्ञान देवाण-घेवाण उपक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा उद्देश पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये संशोधन अनुभव, वैज्ञानिक कल्पना आणि शैक्षणिक माहितीची देवाण-घेवाण करणे हा होता.

उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. मनीषा कोढापे यांच्या हस्ते झाले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील अशाप्रकारच्या संवादामुळे शैक्षणिक आत्मविश्वास वाढतो. तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान व संशोधन क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळते, असे सांगितले. याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील एम. एससी. भाग-२ चे विद्यार्थी श्रावणी ठाकरे, वैभव पवार आणि हकीम नौशाद यांनी आपले अनुभव व ज्ञान विद्यार्थ्यांसोबत शेअर केले. श्रावणी ठाकरे यांनी राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेतील अनुभव तसेच प्रकल्प निवड आणि तयारीची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

अध्यक्षस्थानी भास्कर टोम्पे, अध्यक्ष, जी. एस. टोम्पे महाविद्यालय पब्लिक ट्रस्ट यांनी भूषविले. यावेळी डॉ. विजय टोम्पे (सचिव), डॉ. राजेंद्र रामटेके (प्राचार्य), डॉ. नंदकिशोर डी. गव्हाळे (उपप्राचार्य), डॉ. सुमित डी. इंगळे (आयक्यूएसी समन्वयक), डॉ. प्रवीण एस. इंगळे (विज्ञान विभागप्रमुख) आणि डॉ. एन.एस. दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमामुळे विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद साधण्याची आणि आधुनिक शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून ज्ञानाची देवाण-घेवाण करण्याची मौल्यवान संधी उपलब्ध झाली.



### प्रगत एआय मॉडेल्सची दिली माहिती

वैभव पवार यांनी एआय : ए न्यू सायन्टीफिक इन्स्ट्रुमेंट-पॉवर, प्रॉमिस ॲन्ड लिमिट्स या विषयावर मार्गदर्शन करत आधुनिक वैज्ञानिक संशोधनात, विशेषतः रसायनशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्तेचे वाढते महत्व स्पष्ट करून विविध प्रगत एआय मॉडेल्सची माहिती दिली. त्यानंतर हकीम नौशाद यांनी नोटबुक एलएम या साधनाचे प्रात्यक्षिक सादर करून त्याच्या मदतीने नोट्स तयार करणे, फ्लॅशकार्ड बनवणे आणि ऑडिओ पॉडकास्ट तयार करणे कसे शक्य आहे, हे दाखवून दिले.

The Hitavada

# Tributes paid to Bhagat Singh, Rajguru, Sukhdev at SGBAU

■ **Amravati Bureau**

AMRAVATI, Mar 26

SANT Gadge Baba Amravati University (SGBAU) observed Shaheed Diwas to offer tributes to the martyrs of India's freedom struggle, including Bhagat Singh, Shivaram Rajguru, and Sukhdev Thapar.

Dr Nitin Koli, Director of the Board of Examinations and Evaluation and In-charge Registrar offered floral tributes and paid homage to the portraits of the martyrs on behalf of the university on the occasion.

Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer shared insights into the lives and contributions of the martyrs, highlighting their role in India's independence movement.

The programme was attended by Dr Shrikant Patil, Director of Lifelong Learning and Extension, Shashikant Rode, Executive Engineer, Mangesh Varkhede, Deputy Registrar (Establishment), Dr Dadarao Chavan, Deputy Registrar, Rajesh Yedle, Deputy Engineer (Electrical) along with university officials and staff in large numbers.



Dignitaries offering tributes to Shahid Bhagat Singh, Rajguru and Sukhdev.

विदर्भ मतदार

# संत गाडगे बाबांच्या विचारातूनच समृद्ध समाज घडेल : अनिल जोशी

**विद्यापीठात 'संत गाडगे बाबांची दशसूत्री व सेवाभावी संस्थांची भूमिका' विषयावर कार्यशाळा**



नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. २६ : संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा सुगंध आजही या मातीत दरवळत आहे. त्यांच्या विचारांची दशसूत्री आणि सेवाभावी वृत्ती हाच मानवी जीवनाचा खरा आधार असल्याचे प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी विशेष सचिव अनिल जोशी यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'संत गाडगे बाबांची दशसूत्री आणि सेवाभावी संस्थांची भूमिका' या विषयावर आयोजित विशेष कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते.

याप्रसंगी संत गाडगे बाबांच्या विचार व कार्यानुसार कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, नंददीप फाऊंडेशन, संत गाडगे बाबा बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाऊंडेशन, संत गाडगे बाबा जेष्ठ नागरिक संघ, मातोश्री सुशिलाताई वृद्धाश्रम, संत श्री दोला महाराज वृद्धाश्रम, राजीव गांधी कृषी सेवाभावी संस्था, संत गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थांसह श्रीमती डोईफोडे ताई, श्री संदीप चिस्तरकर व अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांचा समावेश होता. डॉ. व्ही. एम. मेटकर म्हणाले, बाबांच्या दशसूत्रीचा प्रसार ही काळाची गरज असून अध्यासनाच्यावतीने सेवाभावी संस्थांचा गौरव आणि कार्यशाळेचे आयोजन करुन त्याची व्यापकता अधिक वाढविण्यात आली आहे.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संत गाडगे बाबांनी दिलेली दशसूत्री केवळ शब्दांचा समूह नसून ती निकोप समाजाच्या निर्मितीची गुरुकिल्ली आहे. दशसूत्रीचा आधार घेवून सेवाभावी संस्था खयाअर्थाने बाबांचा वारसा पुढे चालवित आहेत

नंददीप फाऊंडेशनचे संदीप शिंदे यांनी केलेल्या कार्याची चित्रफित तसेच इतर संस्थेच्या कार्याची चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. प्रास्ताविक अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले. संचालन करीत राजेश पिंदडी यांनी आभार मानले. कार्यशाळेला साहित्यीक डॉ. सतीश तराळ, डॉ. सुशिल बद्दलवार, बबनराव तोटे, प्राचार्य डॉ. खामरे, प्राचार्य डॉ. दाभाडे तसेच पाचही जिल्हातून साठ संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आपली मातृभूमि

# गाडगे बाबांच्या दशसूत्रीत समृद्धीचे गुपित

**प्रशासकीय अधिकारी अनिल जोशी यांचे प्रतिपादन**



आमा प्रतिनिधी/२६ मार्च

अमरावती-संत गाडगे बाबांच्या विचारांची दशसूत्री आणि त्यांची निस्वार्थ सेवावृत्ती हाच मानवी जीवनाचा खरा आधार असून, या आधारातूनच समृद्ध समाज घडेल, असे ठाम प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी विशेष सचिव अनिल जोशी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजित 'दशसूत्री आणि सेवाभावी संस्थांची भूमिका' या विषयावरील कार्यशाळेत ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. बाबांनी दिलेला स्वच्छतेचा मंत्र केवळ परिसरापुरता मर्यादित नसून, तो मन शुद्ध करण्याचा मार्ग आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे होते, तर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर आणि अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी तत्कालीन मंत्री जनमोहनजी, रा. सु. गवई आणि बबनदादा मेटकर यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. मेटकर यांनी यावेळी मेटकर कुटुंबियांच्या दाननिधीतून हा पुरस्कार दिला जात असल्याचे सांगून सर्वांना सामाजिक कार्यात हातभार लावण्याचे आवाहन केले.

दैनिक दिव्य मराठी

# संत गाडगे बाबांची दशसूत्री हाच जीवनाचा आधार

## मार्गदर्शन : वरिष्ठ सनदी अधिकारी माजी सचिव अनिल जोशी यांचे प्रतिपादन : विशेष कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी | अमरावती



भूमिका मांडताना वरिष्ठ सनदी अधिकारी तथा माजी सचिव अनिल जोशी.

संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा सुगंध आजही या मातीत दरवळत आहे. त्यांच्या विचारांची दशसूत्री आणि सेवाभावी वृत्ती हाच मानवी जीवनाचा खरा आधार असल्याचे प्रतिपादन भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी विशेष सचिव अनिल जोशी यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'संत गाडगे बाबांची दशसूत्री आणि सेवाभावी संस्थांची भूमिका' या विषयावर आयोजित विशेष कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर, श्री संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते. अनिल जोशी यांनी पुढे आपल्या भाषणात गाडगेबाबांच्या 'दशसूत्री' कार्याचे महत्त्व अधोरेखित करून गाडगेबाबांनी उभारलेले ऋणमोचन येथील घाट, विद्यार्थ्यांसाठी बांधलेली वसतिगृहे, त्यांनी हाती घेतलेला स्वच्छतेचा झाडू, हे केवळ स्वच्छतेचे नाही तर मन स्वच्छ करण्याचे प्रतीक होते. श्री संत गाडगे बाबांचे कीर्तन आणि भजन हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम होते. संत गाडगे बाबा हे मास कम्युनिकेशनचे कुलगुरू होते.

डॉ. व्ही. एम. मेटकर म्हणाले, बाबांच्या दशसूत्रीचा प्रसार ही काळाची गरज आहे. अध्यासनाच्यावतीने सेवाभावी संस्थांचा गौरव करण्यात आला आहे. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी मत मांडले.

कार्यक्रमादरम्यान संत गाडगे बाबांच्या विचार व कार्यानुसार कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, नंदादीप फाऊंडेशन, संत गाडगे बाबा बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाऊंडेशन, संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरिक संघ, मातोश्री सुशिलाताई वृद्धाश्रम, संत श्री दोला महाराज वृद्धाश्रम, राजीव गांधी कृषी सेवाभावी संस्था, संत गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थांसह श्रीमती डोईफोडे, संदीप चिखलकर, अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे यांचा समावेश आहे.

**सात लाख टपाल तिकीटांचा विक्रम :** या कार्यक्रमात गाडगे बाबांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. जोशी यांनी भूतकाळात डोकावत सांगितले की, पोस्ट विभागात डायरेक्टर (फिलाटेली) म्हणून कार्यरत असताना, गाडगे बाबांच्या नावाने टपाल तिकीट काढण्याची मला संधी मिळाली. तत्कालीन मंत्री जगमोहनजी, रा.सू. गवई व बबनराव मेटकर यांनी यासाठी मोलाचे सहकार्य केल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. ते म्हणाले, २० डिसेंबर १९८८ हा तो दिवस होता. गाडगे बाबांवरील पोस्टाची तिकिटे त्यादिवशी प्रसारित करण्यात आली. ती तब्बल सात लाख होती.

पुण्य नगरी

# विद्यापीठात शहीददिनानिमित्त व्याख्यानमाला



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनानिमित्त 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, वक्ता म्हणून प्रा. मधुकर जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य नितीन टाले, कैलास चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. नीलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते. विषयाची मांडणी करताना प्रा. मधुकर जाधव म्हणाले, शहीदांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल, तर देशहिताचे कार्य करावे लागेल. राष्ट्रीय एकात्मता, देशाची विविधता जपावी लागेल. वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवावा लागेल आणि त्यासाठी बुद्धिप्रामाण्यवादी व्हा, अनुकरण करा, पण अंधानुकरण नाही, असे ते म्हणाले. यावेळी नितीन टाले, कैलास चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. संत गाडगेबाबा, शहीद भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर, संचालन भगवान किनाके तर आभार प्रदर्शन डॉ. नीलेश कडू यांनी केले.

# आंतर विद्यापीठ खो-खो (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती**-स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे २ ते ०६ एप्रिल, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा भूषण गेडाम, कुणाल शिखरे, यश सदाशिव, कौशिक गेहलोत व प्रथमेश माहोरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचा रोहण बरकरे, आदित्य राऊत, सुबोध धंदर व राधेय अकर्ते, स्व. एन.ए. देशमुख महाविद्यालय, चांदुरबाजारचा मयुर खंडारे, स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचा अंकुश शिरसाट, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगांवचा ओम देशमुख व तेजस भालेराव, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूरचा सुफियान खान पठाण व रोहण मेश्राम, महात्मा फुले महाविद्यालय, अमरावतीचा आदित्य नागदिवे, कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकळचा आयुष बोरखडे, कला महाविद्यालय, बुलडाणाचा ज्ञानेश्वर चिमकुरे, आर.ए. महाविद्यालय, वाशिमचा साहील राऊत आणि जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा अशोक नागले याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूचा प्रशिक्षण वर्ग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे २१ ते ३० मार्च, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

आपली मातृभूमि

# विद्यापीठ सुध्दा कर्मचाऱ्यांच्या ऋणात राहील

## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन

**आम्हा प्रतिनिधी/२७ मार्च**

**अमरावती :** अमरावती : निष्ठा हा कर्मचाऱ्यांना विद्यापीठाशी जोडणारा एक भक्कम धागा असून, प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या आयुष्याची प्रदीर्घ वर्षे या संस्थेसाठी वाहिली आहेत. समर्पण, त्याग आणि प्रामाणिकपणाच्या बळावर कर्मचाऱ्यांनी दिलेली ही अखंड सेवा विसरता येणार नाही. या निष्ठेबद्दल विद्यापीठ प्रशासन त्यांचे नेहमीच ऋणी राहील, असे मनोली भिडणारे उद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित 'कर्तव्यपूर्ती' सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी व्यासपीठावर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. वी. एम. नागरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख आणि जनसंपर्क अधिकारी विलास नांदुरकर उपस्थित होते. डॉ. बारहाते पुढे म्हणाले की, कर्मचाऱ्यांच्या अशाच



चिकाटीमुळे त्यांच्या कुटुंबाची आणि पाल्यांची प्रगती झाली आहे. याप्रसंगी अनिल काळबांडे, अनिल काळे, माधव बारके, मुरलीधर चिलुरकर आणि किशोर गजधुमे यांचा शाल, श्रीफळ व गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पत्नींचाही साडी-चोळी व सौभाग्यलेणे देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. वी. एम. नागरे यांनीही कर्मचाऱ्यांच्या निष्ठेचे कौतुक केले. डॉ. नितीन कोळी, मंगेश वरखेडे, शशिकांत रोडे, डॉ. सुलभा पाटील आणि अजय देशमुख यांनी सत्कारमूर्तींच्या कामाची प्रशंसा केली. सत्कारमूर्तींनी आपल्या मनोगतातून विद्यापीठातील स्नेहभावाबद्दल आभार मानले. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने भागभांडवलाचे धनादेश व पुस्तके देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. विलास नांदुरकर यांनी सूत्रसंचालन आणि डॉ. धनंजय पाटील यांनी आभार मानले.

तरुण भारत

# तरुणांनो, कौशल्य आत्मसात करा : डॉ. देशमुख

## विद्यापीठात पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**अमरावती, २८ मार्च**

वाढत्या तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही, तर कौशल्य अधिक महत्त्वाचे आहे. तरुणांनी रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात केल्याशिवाय प्रगती शक्य नाही, असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच. आर. देशमुख यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी,



मार्गदर्शन करताना डॉ. एच. आर. देशमुख व उपस्थित अन्य

उपायुक्त द. ल. ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, डॉ. प्रशांत विघ्नेकर, टीसीएसचे समन्वयक राहुल पटेल व प्रतिक अग्रवाल उपस्थित होते.

रोजगार मेळाव्यामध्ये ४७७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी २८८ विद्यार्थ्यांनी अॅप्टिट्यूड टेस्ट दिली. यामधून ३८ विद्यार्थ्यांची रोजगाराकरिता निवड करण्यात आली. मार्गदर्शन करताना डॉ. एच. आर. देशमुख म्हणाले, भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी युवकांनी विविध कौशल्ये आत्मसात करण्याची खरी गरज आहे. रोजगारक्षम होण्याकरिता आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी प्राप्त करावी, असेही ते म्हणाले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी जागतिक परिस्थितीवर भाष्य केले.

ते म्हणाले की, जागतिक स्तरावर युद्धाची परिस्थिती आणि आर्थिक अनिश्चितता असतानाही भारत आपली स्थिरता टिकवून आहे. ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. विशेषतः बी. ए., बी. कॉम, बी.एस्सीसारख्या पारंपारिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या मेळाव्याच्या माध्यमातून नामवंत कंपन्यांमध्ये करीअर घडवण्याची मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरुणांनी उद्योजक होण्याचे स्वप्न पाहावे, असे उपायुक्त द. ल. ठाकरे यांनी सांगितले.

(तभा वृत्तसेवा)

# फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथे मराठी जनसाहित्य व्याख्यानमाला उत्साहात




**ता.प्रतिनिधी / अमरावती दर्शन**

**पुसद, २० मार्च :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जनसारस्वत सुदाम सावरकर स्मृतिप्रीत्यर्थ मराठी जनसाहित्य व्याख्यानमाला' कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानवीय विज्ञाशाखा अधिष्ठाता डॉ. मोनाताई चिमोटे होत्या. प्रमुख वक्ते म्हणून अमरावती येथील प्रा. डॉ. अनिल प्रांजळे यांनी मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी डॉ. सुभाष सावरकर यांच्या नाटकातील स्त्रीपात्रांचे विद्रोहमूल्य व जीवनजिगीषा यांची जनसाहित्यदृष्टीनं चिकित्सा या विषयावर सखोल विवेचन केले. त्यांनी स्त्रीपात्रांच्या संघर्षशीलतेवर, सामाजिक जाणीवेवर आणि जीवनाकडे पाहण्याच्या सकारात्मक दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती निर्मला सुभाष सावरकर (दानदाते प्रतिनिधी), महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. प्रल्हाद वावरे, उपप्राचार्य डॉ. संजय भोयर, प्रा. प्रणव कोलते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख वक्ते यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद वावरे यांनी दिला. कार्यक्रमाचे दमदार सूत्रसंचालन डॉ. अनिल दुधे तर आभारप्रदर्शन प्रा. प्रसन्ना देशमुख यांनी केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ मोनाताई चिमोटे यांनी जनसाहित्याच्या जतन व संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. या व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांना आणि साहित्यप्रेमींना जनसाहित्याची समृद्ध परंपरा, त्यातील सामाजिक आशय आणि स्त्रीपात्रांचे वास्तववादी चित्रण यांची नव्याने ओळख झाली असे मत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान प्रा. निरंजन अंजनकर यांनीही आपले मत व्यक्त केले.

# श्री क. रा. इन्नाणी महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या संशोधन कार्यावर व्याख्यान संपन्न



कारंजा लाड दि. ३० : स्व. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, कारंजा लाड येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेल्या संशोधनाच्या शताब्दी निमित्त धर्माचा वैदिक साहित्यातील उगम आणि विकास या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी ज्येष्ठ मराठी प्राध्यापक, प्रख्यात लेखिका व अभ्यासू संशोधक मा. डॉ. अलका गायकवाड यांनी सुमारे तासभर प्रभावी व्याख्यान देत डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्व व कार्याचा परामर्श घेतला. त्यांनी डॉ. देशमुख यांना एक दूरदर्शी समाजसुधारक, भारताचे पहिले कृषिमंत्री आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रणेते म्हणून गौरविले. वैदिक साहित्यातून धर्माची संकल्पना कशी विकसित होत गेली, तसेच या विषयाशी संबंधित डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या डॉक्टरेट संशोधनाचा संदर्भ त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. पाटील होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचे स्मरण करून, शेतकरी, शेतमजूर तसेच समाजातील वंचित व उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा विशेष गौरव केला. शिक्षण, कृषी व सामाजिक न्याय या क्षेत्रांतील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. भैय्या मेटकर हेही प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. आर. एम. पाटील यांच्या हस्ते डॉ. अलका गायकवाड व डॉ. महेंद्र मेटे यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनुप नांदगावकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एन. जी. जाधव यांनी केले. या विशेष व्याख्यानासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभागृह खचाखच भरलेले होते आणि उपस्थितांनी व्याख्यानाचा लाभ उत्स्फूर्तपणे घेतला.

**देशोन्नती**

# श्री क. रा. इन्नाणी महाविद्यालयात संशोधन कार्यावर व्याख्यान उत्साहात

देशोन्नती वृत्तसंकलन

कारंजा : 'धर्माचा वैदिक साहित्यातील उगम आणि विकास' विषयावर डॉ. अलका गायकवाड यांचे प्रभावी प्रतिपादन कारंजा येथील स्व. से. श्री क. रा. इन्नाणी महाविद्यालय येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात सादर केलेल्या पीएच.डी. संशोधनाच्या शताब्दी वर्षानिमित्त नुकतेच विशेष व्याख्यान पार पडले.

'धर्माचा वैदिक साहित्यातील उगम आणि विकास' हा व्याख्यानाचा विषय होता. या प्रसंगी ज्येष्ठ मराठी प्राध्यापक, प्रख्यात लेखिका व अभ्यासू संशोधक डॉ. अलका गायकवाड यांनी सुमारे तासभर अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रभावी व्याख्यान देत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्वाचा व कार्याचा सखोल परामर्श घेत, त्यांना दूरदर्शी समाजसुधारक, देशाचे पहिले कृषिमंत्री तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्रणेते म्हणून गौरविले. वैदिक साहित्यातील धर्म संकल्पनेचा उगम व तिचा कालानुरूप झालेला विकास त्यांनी स्पष्ट



करताना डॉ. देशमुख यांच्या डॉक्टरेट संशोधनाचा संदर्भ सुसंगतपणे मांडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. पाटील होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचे स्मरण करून शेतकरी, शेतमजूर तसेच वंचित व उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला. शिक्षण, कृषी व सामाजिक न्याय या क्षेत्रांतील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत कार्यरत केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. भैय्या मेटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. आर. एम. पाटील यांच्या हस्ते डॉ. अलका गायकवाड व डॉ. महेंद्र मेटे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अनुप नांदगावकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एन. जी. जाधव यांनी केले. या विशेष व्याख्यानासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खचाखच भरलेल्या सभागृहात उपस्थितांनी व्याख्यानाचा लाभ घेतला. (वा. प्र.)



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री जिष्णू देव वर्मा**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ